# माणूस

९ डिसेंबर १९६७

चाळीस पैसे




मारेकरी दोघेही..
सत्ताधारी
आणि
विरोधी

# ललितकलादर्श

## हीरक महोत्सव

□□

दि. २२ डिसेंबर ६७

ते

दि. ६ जानेवारी ६८

□□

साहित्य संघ मंदिर

रवींद्र नाट्य मंदिर

शिवाजी मंदिर

□□

मुंबईत या तिन्ही ठिकाणी
एकाच वेळी सुरू होत आहे.

□□

या हीरक महोत्सवात
ललितकलादर्श
सहर्ष सादर करीत आहे

□□

*प्रथम प्रयोग*

विजय तेंडुलकर लिखित

**झाला अनंत हनुमंत**

दिग्दर्शक : अरविंद देशपांडे

शुक्रवार दि. २९ डिसेंबर
रात्रौ ८॥ वाजता.

□□

ग. दि. माडगुळकर लिखित

**गीत सौभद्र (संगीतिका)**

संगीत दिग्दर्शक : वसंत देसाई

गुरुवार दि. ४ जानेवारी
रात्रौ ८॥ वाजता.

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : सातवे : अंक : अठ्ठाविसावा

वार्षिक वर्गणी : वीस रुपये

परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

स. न. नोव्हेंबर, २४

दिवाळी अंक साजरा होताच, पण काही खंडानंतर मिळालेला २५ नोव्हेंबरचा अंक पाहून निराशा झाली. कारण 'पुरंदरच्या बुरुजावरून' हे मुलांना आवडणारे सदर त्यात नव्हते. ते सदर नेहमी ठेवावे. त्यातील विष्णुबुवांचा ठेवा मात्र असामान्य आहे. परिस्थितनुरूप क्रांतिकारक विचारप्रवाह आमच्याही देशात वाहतात त्याचे ते उदाहरणच होय. **देशमुख, मूर्तिजापूर.**

स. न. नोव्हेंबर, २५

आपल्या २५ नोव्हेंबरच्या अंकातील सौ. शकुंतला फडणीस यांची 'स्मारक' ही गोष्ट फार आवडली. त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन. **पु. वा. ऐनापुरे, मुंबई.**

स. न. नोव्हेंबर, २४

दि. २५ नोव्हें. अंक वाचला. त्यातील 'विष्णुबुवा ब्रह्मचारी' यांचेवरील लेख वाचून समाधान वाटले. लेखकाबरोबरच समयसूचकता व कुशल संपादन याबद्दल आपले अभिनंदन. 'माणूस'ची परंपरा आजपर्यंत श्रेष्ठ वाटली. ती तशीच राहावी ही इच्छा. नावीन्य सांभाळून सत्त्व जोपासलं असं वाटतं. **दत्तात्रेय जोशी, निपाणी.**

मूल्य ४० पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

संपादक ' माणूस '
स. न. वि. वि.

गेल्या पंधरा ऑगस्टला ' माणूस प्रतिष्ठान ' कार्याचा संकल्प आपण जाहीर केल्यापासून, किंबहुना त्याच्या आधीपासून, ' बाळ-बाळंतिणीची ' सारी उन्नती घरातल्या माणसासारखी पाहण्याचे भाग्य मला लाभले. विशेषतः, हे सारे कोडकौतुक पुरवीत असताना आपल्या कृतिनिष्ठेचे आणि अलिप्तपणाचेही कौतुक करणे अनावश्यक असले तरी या प्रसंगी अनुचित ठरणार नाही.

# पुढे काय?

आमच्या गावात आपण हा सारा पसारा मांडीत असताना प्रथमप्रथम असणारी जनतेतील ' सरकारी काम ' म्हणूनची उदासीनता आता ओसरली आहे. ही निराळीच भानगड, विशेषतः, आम्ही ग्रामीण मंडळी जिला ' खाज ' म्हणतो ती, आता थोडीफार लोकांच्या डोक्यांत शिरू लागली आहे. आता ते विचारतात, ' पुढे काय ?'

खरंच ' पुढे काय ' हा प्रश्न दोन शब्दांत संपत असला तरी त्याला शाळकरी पोरांसारखे कागदावर उत्तर देऊन भागणार नाही. आमच्या भागातल्याच नव्हे तर भारतीय शेतकऱ्यांच्या समस्यांनी साऱ्या राष्ट्राचेच भवितव्य अंधारलेले असल्यामुळे येथून पुढे ही लावलेली दिवटी घेऊन अशीच वाटचाल करावी का ? का यात आता काही सुधारणा करणे आवश्यक आहे ? ' माणूस प्रतिष्ठान'च्या या पद्धतीच्याच कार्याचा व्याप अधिक वाढवावा काय ? वाढवावयाचा झाल्यास हा परिसर निश्चित करावा काय ? या कामातील भलेबुरे अनुभव गाठीशी बांधून ' माणूस प्रतिष्ठान '-ची उमेद खचणार नाही ना ? असल्या अनंत प्रश्नांचे कोंडाळे स्वतःभोवती निर्माण होत जाते. यातून मार्ग निघेल असा आत्मविश्वास मनात तर खूप आहे. वाटते ही सारी काळजी बाळ रांगते होईपर्यंतच करावयाची. पुढे या कार्याची धुरा कोणीतरी उचलली पाहिजे. खरं तर हे आव्हानच आहे. त्यात पुन्हा हे तोंडपाटीलकीचे नाही. ' माणूस'च्या वाचकांनी या प्रश्नावर काही विचार केला असल्यास कळावा म्हणूनच हा पत्राचा प्रपंच.

रतनलाल भंडारी, सुपे.



**सप्रेम नमस्कार**

पुढे काय ? हा प्रश्न आपल्याला पडला आहे तसाच तो मलाही गेले ४–६ महिने फार सतावतो आहे. गेल्या दिवाळीला आपण विहिरीचे काम सुरू केले. नाताळात विद्यार्थ्यांचे श्रमशिबिर घेतले. त्यानंतर महिनाभर विहिरीचे काम जोमाने सुरळीत चालू राहिले. जानेवारीच्या मध्यापासून मात्र हळूहळू खंड पडू लागला. निवडणुका हे एक कारण. दुसरे कारण बाहेरच्या व आपण देत असलेल्या मजुरीतील तफावत. बाहेरचे दर वाढले होते व साहजिकच माणसे आपल्याकडे येईनाशी झाली. असे घडू नय, मजुरांनी बाहेरच्या आकर्षणामुळे विहिरीचे काम अर्धवट टाकून जाऊ नये म्हणून आपण काळजी घेतली होती. सुरुवातीलाच वाढते दर दिले होते व चार महिन्यांत, बाहेरचे दर कमीजास्त झाले तरी, यात कुठलाही बदल होणार नाही, कोणी काम सोडून जाता कामा नये, हे चार वडील मंडळींच्यादेखतच स्पष्ट केले होते. पाडव्याच्या दिवशीची, वाडीवरची ती सकाळची बैठक, त्यातल्या वाटाघाटी, ती घासाघीस अजूनही माझ्या चांगली स्मरणात आहे. तात्याबांसारखे काही थोड आपला शब्द पाळणारे होते, पण बरेचसे दोन-चार आण्यासाठी दुसरीकडे जाऊ लागले. त्यात पुन्हा आपली अपेक्षा होती तेवढे पाणी लागणार की नाही, याचीही शंका उत्पन्न झाली. या अनिश्चिततेत पुढचे आणखी १–२ महिने गेले. मग आल्या जिल्हापरिषदेच्या निवडणुका. आपल्या कामाचा विपर्यास होऊ नये म्हणून या निवडणुकीच्या गडबडीत तर आपण मुद्दामच स्वस्थ राहण्याचे ठरवले. शेवटी हीही गडबड संपली. तुम्ही मोकळे झालात आणि पाण्यानेही आशा दाखवली. पुन्हा माणसे जमू लागली, काम मागू लागली. पण या वेळी लिमये जलसंशोधकांनी आप-

त्याला पाण्याचा निश्चित अंदाज दिला असल्याने आपण सावध होतो. पुन्हा काम सुरू करण्यापूर्वी थोडी मोजमापे घेणे अवश्य होते. ती मोजमापे आता घेऊन झाली आहेत. उन्हाळी बागायत काही या विहिरीवर तूर्तच्या परिस्थितीत होऊ शकणार नाही. पण दुष्काळ हटण्याला मदत निश्चित होणार. पावसाळी पिके शेवटच्या एक-दोन पावसांनी तोंड न दाखवल्यामुळे जी हातची जातात ती वाचणार, आजवर ओसाड पडलेल्या जमिनीत चार दाणे येणार एवढी शाश्वती आज निर्माण झाली आहे. यापेक्षा अधिक त्या भागात सुरुवातीलाच होणे अवघड आहे. सगळा भाग दुष्काळी. आहेत त्याच विहिरींना बारमाही पाणी नाही. तास-दोन तास मोटा जेम-तेम चालतात. मग आपल्याच विहिरीला खूप पाणी लागणार तरी कसे ? त्यासाठी ओहोळ अडवून काही ठिकाणी बंधारे बांधण्याचे काम हाती घ्यायला हवे, तर सर्वच विहिरींतील पाण्याची उंची थोडीफार वाढेल. जमिनीचा ओलसरपणाही टिकेल. पण आज हे काम आपल्या कक्षेच्या बाहेर आहे. पहिल्या विहिरीवरील काम आता आटोपते घेऊन आपण दुसऱ्या विहिरीच्या तयारीला लागणे चांगले. बांधबंधाऱ्याच्या कामासंबंधी चार ठिकाणी बोलत राहणे एवढेच तूर्त आपल्या हाती आहे. ते आपण करतोच आहोत.

पण एवढ्याने आपले समाधान होत नाही हेही खरे. आपण अडखळलो आहोत दोन कारणांसाठी. एक: पहिली विहीर झाली, दुसरी झाली, तिसरी झाली आणि असेच पुढे तुटक काम करून वर्षा–दोन वर्षांनंतर आपण एक दिवस थांबलो– हे आपल्याला प्रशस्त वाटत नाही. आपल्याला बेरीज नको आहे, गुणाकार हवा आहे. जे काही आपले पैसे येथे खर्च होत आहेत ते मांडवल ठरावे, त्यातून सुप्याच्या दुष्काळी भागाच्या परिवर्तनाची काहीतरी कायम सोय होत राहावी अशी आपली दृष्टी आहे. आपल्याला दानधर्म मुळीच अभिप्रेत नाही. विकास हवा. यासाठी कामाची घडी कशी बसवावी, आर्थिक व्यवहार कसे आखावेत हे अद्याप आपले ठरत नाही. ज्यामुळे तुमच्यासारख्या तेथे कामावर प्रत्यक्ष लक्ष ठेवणाऱ्या व्यक्तींचाही मेहनताना सुटावा, एका विहिरीमुळे वाढणाऱ्या उत्पन्नातील काही भाग नवीन विहिरी बांधण्याकडे वळविता येऊन बाहेरच्या पैशाची आवक ठराविक वेळेला थांबावी व आवक झालेली सर्व रक्कम आपल्यापेक्षाही अविकसित भागाकडे पुन्हा पाठविण्याची शक्यता व प्रवृत्ती वाढावी–एवढे सर्व आपल्याला घडायला हवे आहे. आपल्या कामाचे मोल गुणात्मक असले पाहिजे. नाहीतर सरकार ही सगळी कामे करीतच आहे. आपण कुठवर पुरे पडणार ! आपले निराळेपण, योजकता ती काय दिसणार ? आपले श्रम व पैसा तेथेच अडकून राहता कामा नये. तो सतत फिरला पाहिजे, वाढत राहिला पाहिजे अशी काही व्यवहाराची मांडणी लवकर साधणे अगदी अवश्य आहे.

[पृष्ठ ६१ वर]

# लोकशाहीचे मारेकरी; पण कोण ?

पश्चिम बंगालमध्ये गेल्या आठवड्यात जो प्रकार घडला त्यात अनपेक्षित असे काहीही नव्हते. संयुक्त आघाड्यांचे राजकारण खेळून प्राप्त झालेली सत्ता हातातून जाताक्षणी कम्युनिस्टांनी त्या शासनयंत्रणेविरुद्ध बंड पुकारावे, याचा काही भोळ्याभाबड्यांना खेद वाटत असला तरी येनकेन प्रकारेण असंतोष खदखदत ठेवून त्याच्या धगीवर आपली पोळी पिकवून घेण्याच्या लाल तंत्राची ज्यांना माहिती आहे, त्यांना यात धक्का बसण्याजोगे काहीही नव्हते.

डॉ. प्रफुल्लचंद्र घोष यांनी संयुक्त आघाडीतून बाहेर पडून आपला सवतासुभा स्थापन केल्यानंतर अजय मुखर्जी यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या संयुक्त मंत्रिमंडळाचे भवितव्य ठरून गेले होते. परंतु विधानसभेची बैठक बोलावून बहुमत आपल्या पाठीशी आहे का नाही याची शहानिशा करण्यासाठी अजय मुखर्जी टाळाटाळ करीत होते, तर शक्य तितक्या लवकर विधानसभेची बैठक बोलवा असा राज्यपाल श्री. धर्मवीर यांचा आग्रह होता. एखाद्या राज्याच्या संसदीय राजकारणात राज्यपालाने एवढा रस घेतल्याचे हे बहुधा पहिलेच उदाहरण असावे ही गोष्ट खरी आहे. मध्यप्रदेशात गोविंद नारायण सिंग यांनी द्वारकाप्रसाद मिश्रा यांची साथसंगत सोडून संयुक्त विधायक दलाशी मधुचंद्र सुरू केल्यानंतर मिश्राजींच्या मंत्रिमंडळाचे भवितव्य ठरून गेले होते. परंतु या घटनेची मध्यप्रदेशाच्या राज्यपालांनी आपण होऊन दखल घेतली होती असे दृश्य दिसले नाही. उलट बहुमत टिकविण्यासाठी मिश्राजींना कारवाया करण्यास वेळ मिळावा म्हणून त्यांनी बराच घोळ घातला होता.

मध्यप्रदेशासारखीच हरियानामध्ये परिस्थिती निर्माण झाली असताना तेथील राज्यपालांनीही, राव बीरेंद्रसिंग यांना सत्ता आपल्या हाती टिकविण्याची संधी सापडावी म्हणून दररोज हेलकावे खाणाऱ्या त्यांच्या मंत्रिमंडळाविरुद्ध तडकाफडकी उपाययोजना केली नाही. अखेरीस बीरेंद्रसिंगांनी आपले बहुमत निश्चित रीतीने गमावले आहे याची खात्री झाल्यानंतर व भागवत दयाल शर्मा यांना पुनश्च मुख्यमंत्रीपदी आरूढ करण्याची शक्यता नाही असे आढळून आल्यानंतर, हरियानाच्या राज्यपालांनी बीरेंद्रसिंग मंत्रिमंडळ बडतर्फ करून राष्ट्रपतींची राजवट आणली.

या दोन उदाहरणांच्या पार्श्वभूमीवर धर्मवीर यांनी अजय मुखर्जी यांचे मंत्रिमंडळ बडतर्फ करताना घाई दाखविली, हा विरोधकांचा आरोप काँग्रेस-श्रेष्ठांना नाकारता येणार नाही. मूळ कार्यक्रमानुसार पश्चिम बंगाल विधानसभेची बैठक डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात सुरू होणार होती. बैठक लवकर बोलविण्याची आपली मागणी मुख्यमंत्री मान्य करीत नाहीत असे आढळून आल्यानंतर राज्यपाल

डिसेंबरचा तिसरा आठवडा उजाडपर्यंत थांबले असते तर काहीही विघडण्यासारखे नव्हते. बरे, धर्मवीरांसारखा जुना सनदी नोकर मुखर्जी मंत्रिमंडळाविरुद्ध उपाययोजना करण्यास उतावीळ झाला आहे हे कळल्यानंतर केंद्रीय सरकारने त्यांना सबुरीचा आदेश द्यायला हवा होता. कारण राजकारणाच्या अवघड वळणांशी धर्मवीरांसारख्या सनदी नोकराची जानपहचान नसली तरी प्रधानमंत्री इंदिरा गांधी वा गृहमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण त्या वळणांवर चांगले रुळलेले आहेत.

## काँग्रेसचा डाव

ही घाई अकारण होती याचे मुख्य कारण हे आहे, की कम्युनिस्टांच्या संगतीमुळे अजयबाबूंचे मंत्रिमंडळ कितीही बदनाम झाले असले आणि स्वत: अजयबाबूही या सोयरिकीला कंटाळले असले तरी पश्चिम बंगालमध्ये काँग्रेस पक्ष केवळ कचेरीबाहेरील पाटीव्यतिरिक्त अस्तित्वात नाही हे केंद्रीय नेत्यांना माहीत आहे. श्री. अतुल्य घोष हे बंगालच्या राजकारणातले 'दादा' असले तरी बंगालमध्ये त्यांची किंचितही प्रतिष्ठा राहिलेली नाही, हे गेल्या निवडणुकीत आपल्या इतर सहकाऱ्यांबरोबर स्वत: अतुल्यबाबूंनी जो दणदणीत पराभव खाल्ला त्यावरून स्पष्ट झालेले होते. या सर्व घटना ध्यानात घेतल्यानंतर पश्चिम बंगालमधील लोकसत्ताक राज्ययंत्रणा टिकविण्यासाठी आपल्याला हे पाऊल टाकावे लागते हा केंद्रस्थित काँग्रेसश्रेष्ठांचा दावा लटका पडतो.

वस्तुस्थिती अशी आहे, की प्रफुल्लबाबूंसारखा विरोधी पक्षांतील योद्धा पुढे करून त्या आधारावर पश्चिम बंगालमधील शासनयंत्रणा आपल्या ताब्यात घेण्यासाठी काँग्रेस–श्रेष्ठांनी हा एक धाडसी प्रयोग करून पाहण्याचा निर्णय केला. 'धाडसी' म्हणण्याचे कारण असे की येथे त्यांना कम्युनिस्टांशी मुकाबला करायचा होता. गुरुनामसिंग किंवा बीरेंद्रसिंग यांची काँग्रेस-श्रेष्ठ सहज उपेक्षा करू शकत होते. परंतु बंगालमधील मामला यापेक्षा निराळा आहे. आणि गेल्या बुधवारी पश्चिम बंगाल विधानसभेची जी काही पाच–दहा मिनिटे बैठक भरली होती, तीत या निराळ्या मामल्याची प्रचीतीही आली. ही बैठक सुरू होऊ द्यायची नाही, असा निर्धार करूनच संयुक्त आघाडीने सारा बनाव रचला होता. सभापती श्री. विजयकुमार बानर्जी या आघाडीचे सदस्य असल्यामुळे त्यांनी स्वत:चे निवेदन वाचून दाखविल्यानंतर ही बैठक स्थगित झाल्याचे जाहीर केले. या बैठकीचे कामकाज व्यवस्थितपणे सुरू झाले असते तर काँग्रेसपक्षीय सदस्यांच्या पाठिंब्यामुळे नवे मुख्यमंत्री डॉ. प्रफुल्लचंद्र घोष यांना बहुमताचा कौल घता आला असता आणि मग 'राज्यपालांनी लोकशाहीची मुस्कटदाबी केली,' असा संयुक्त आघाडीवाल्यांना कांगावा करता आला नसता.

आणि हा प्रसंग टाळण्यासाठीच संयुक्त आघाडीचे सदस्य बाह्या सरसावीत सभागृहात येऊन दाखल झाले होते. हा सारा बनाव इतका पूर्वनियोजित होता

की सभापती सभागृहातून बाहेर पडताच मुख्यमंत्र्यांच्या रोखाने टेबलावरचा लाकडी ठोकळा व शाईची बाटली भिरकाविण्यात आली. इतकेच नव्हेतर प्रेक्षकांच्या गॅलरीतूनही विटेचा तुकडा खाली आला.

## लोकशाहीचा उमाळा

विधानसभेत हा जो प्रकार झाला त्याचे वर्णन करताना डावे कम्युनिस्ट नेते श्री. ज्योति बसू यांनी 'लोकशाहीसाठी सुरू झालेला महान लढा' असे वर्णन केले आहे. माओचा अनुनय करण्यात धन्यता मानणाऱ्या ज्योति बसू यांच्या तोंडी जशी शांततेची भाषा शोभत नाही तशीच लोकशाहीची. कम्युनिस्टांचा आणि लोकशाहीचा कधी आणि कोठे संबंध आला आहे हे ज्योति बसू किंवा त्यांचे गावोगावचे साथीदार सांगू शकतील काय? दुबळ्या लोकशाहीचा घास गिळूनच लाल राजवट प्रस्थापित होत असते या अनुभवाला एखादा तरी अपवाद आहे काय? केरेन्स्कीच्या दुबळ्या लोकशाहीला भिरकावून टाकून लेनिनने जी बोल्शेव्हिक राजवट प्रस्थापित केली त्या राजवटीत विरोधकांची काय गत झाली हा इतिहास जुना झाला असला तरी विसरता येण्याजोगा नाही. आज माओचे अनुयायी चीनमध्ये जे काही करीत आहेत त्याचा लोकशाहीशी काडीमात्र तरी संबंध आहे का? प्रच्छन्न विरोधकांची गोष्ट तर सोडाच, पण ख्रुश्चेव्ह किंवा लिऊ शाओ चि हे आजच्या लाल राज्यकर्त्यांचे पूर्वसुरी कोणते जीवन जगत आहेत त्याची गंधवार्ता तरी कोणाला कळत आहे काय?

अन् म्हणूनच 'लोकशाहीवर अत्याचार झाला हो', असा आक्रोश करण्याचा कम्युनिस्टांना किंचितही अधिकार नाही. परंतु मला त्याचे आश्चर्य वाटत नाही. मघाशी म्हटल्याप्रमाणे ते त्यांचे ठरीव तंत्र आहे. निर्मलचंद्र चतर्जी यांच्यापासून मधू लिमयांपर्यंतचे राष्ट्रवाद आणि लोकशाही यांवर विश्वास असणारे नेते जेव्हा कम्युनिस्टांच्या सुरात सूर मिळवून गळा काढतात तेव्हा भोंगळ काँग्रेसविरोधाच्या नावाखाली आपण कोणाशी साथसंगत करीत आहोत, याचे त्यांना भान उरत नाही ही माझ्या दृष्टीने खेदाची गोष्ट आहे. कम्युनिस्टांना या देशात उघडउघड अराजक निर्माण करायचे आहे. त्यांना जसा राष्ट्रवाद मंजूर नाही तशीच लोकशाहीदेखील. इतर विरोधकांना हाताशी धरून सत्ताधारी पक्षाला नेस्तनाबूत करावयाचे व त्यानंतर या विरोधकांची मुस्कटदाबी करून आपली एकतेची राजवट प्रस्थापित करायची ही कम्युनिस्ट वाटचाल चतर्जी–लिमयांना माहीत नाही असे कसे म्हणता येईल? स्वतःच्या दौर्बल्यामुळे अगतिक झालेले विरोधी पक्ष काँग्रेसला सत्तेवरून खाली खेचण्यासाठी लोकशाहीच्या आणि देशाच्या शत्रूशी हातमिळवणी करीत आहेत हीच खरी चिंतेची बाब आहे. इतर देशांतही असे घडलेले आहे. आज भारतात त्याची पुनरावृत्ती दिसत आहे इतकेच.

**—सदाशिव पेठकर**



# एक स्मरण

....अठ्ठावीस एकोणतीस साल !... नूतन मराठी शाळा !... इंग्रजी पाचवीचा वर्ग, इतक्या वर्षांनी अजून मला तो दिसतो आहे.

वर्गात पस्तीस-चाळीस मुले असतील पण त्यांतही दोन मुले उठून दिसत. एक ' वामन बापट ' आणि दुसरा अनंत लागू ! त्या दिवसांत खादीचे प्राबल्य पुण्यातील सामाजिक जीवनात विशेष नव्हते. परंतु बापट आणि लागू या दोघांचेही पोशाख शुभ्र खादीचे असत. खादीच्या त्या वस्त्रांत ते दोघे इतर वर्गापेक्षा निराळे दिसत. लागू श्रीमंताचा मुलगा होता. परंतु त्याच्या वागण्यात खानदानीची ऐट नसे. बापटबद्दल मात्र जास्त कुतूहल वाटे. तो सेनापती बापटांचा मुलगा आहे हे सर्व शाळेला माहीत होते. त्याचे वडील त्या वेळीही तुरुंगातच होते. वकील-डॉक्टरांची किंवा कारकून, शाळामास्तरांची आम्ही इतर मुले होतो. तुरुंगात असणाऱ्या देशभक्ताचा मुलगा वर्गात असणे हे नावीन्य होतं. स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल त्या वेळी मनात फार प्रेम असे... सिंहगडचा पोवाडा...मार्सेलिस बंदराजवळ बोटीतून टाकलेली उडी ... अंदमानची अंधेरी ! ... कितीतरी गोष्टी !...सावरकरांइतके बापटांचे व्यक्तिमत्त्व रंगदार वाटत नसे, परंतु तरीही औत्सुक्य वाटे हे नक्की. मुळशी सत्याग्रहाच्या वेळच्या कितीतरी हकीकती वडील-माणसांच्या तोंडून ऐकू येत...त्या दिवसांत चित्रशाळेने एक चित्र प्रकाशित केले होते. मुळशीचे धरण फुटले आहे आणि त्याचे पाणी, खाली पद्मासन घालून बसलेल्या सेनापती बापटांच्या अंगावर चोहोबाजूंनी पडत आहे... वामन बापटकडे बघितलं की मला त्या चित्राची हटकून

श्री. ज. जोशी

आठवण येई. त्या दिवसांत बापट आमच्या वर्गाचा पुढारी होता. सत्याग्रहाबद्दल, स्वातंत्र्याबद्दल, तो खूप बोले. ते ऐकण्यात मजा वाटे.

आम्ही मॅट्रिकच्या वर्गात होतो तेव्हा कायदेभंगाची चळवळ सुरू झाली. तुरुंगात जाण्याविषयी बापटने सेनापतींची आज्ञा ते तुरुंगात असतानाच विचारली. अभ्यास सोडून तुरुंगात जाऊ नये, असे त्यांचे पत्र आले होते. बापटने वडिलांची आज्ञा मानली नाही. मॅट्रिकच्या परीक्षेची तमा न करता बापट आणि लागू हे दोघेही सत्याग्रहात सामील झाले. त्या दिवसांत काँग्रेसची सायक्लोस्टाईल केलेली गुप्त बुलेटिन्स निघत. छाती धडधडत असताना घराच्या वरच्या माळ्यावर अगदी एकट्याने ती वाचण्याचे शौर्य मी दाखवीत असे. एका बुलेटिनमध्ये सेनापती बापटांचे पत्र आणि त्याला वामन बापटने लिहिलेले उत्तर वाचल्याचे मला आठवते " देश संकटांत आहे...मातृभूमीची हाक ऐकू येत आहे. अशा वेळी मॅट्रिकचा अभ्यास करीत बसणे मला शक्य नाही. मी चळवळीत सामील होत आहे, " असे वामनने लिहिले होते. पाच-सात महिन्यांनी ते दोघे सुटून आल्यावर मी मुद्दाम केसकर विठोबाच्या मंदिरांतील वामनच्या बिऱ्हाडात 'युद्धस्य वार्ता' ऐकण्यासाठी गेलो होतो. सेनापतींचे सर्वच जीवन तुरुंगात गेले असल्याकारणाने बहुतेक सर्व वॉर्डर आणि अधिकारी त्यांच्या परिचयाचे होते. त्यांना वामनचे फार कौतुक वाटे. ती मंडळी त्याला काही-बाही खायलाही आणून देत. एखाद्या चुलत्याच्या किंवा मामाच्या घरी सुटीला जावे त्याप्रमाणे वामनचे झाले.

आम्ही कॉलेजात असताना सेनापतींची मुक्तता झाली. आणि ते आपल्या बिऱ्हाडी राहावयास लागले. मला औत्सुक्य होते म्हणून मी त्यांना बघण्यासाठी वामनकडे गेलो. त्या वेळीही त्यांच्यावर वार्धक्याची कळा होती. उंची सामान्य होती. रूपामध्येही आकर्षक असे काही नव्हते. विशिष्ट असे एक हास्य मात्र त्यांच्या चेहऱ्यावर होते. त्या हास्याची फोड करता येत नाही...तत्त्वज्ञान्याचे ते हास्य होते का ?... पंडिताचे होते का ?...सतीचे वाण घेतलेल्या देशभक्ताचे जसे असावे तसे ते होते का ?...त्या हास्याची जात ती नव्हती. लहान मुलानं निर्भरपणानं हसावं तसं ते होतं. परंतु लहान मुलाच्या हास्यापेक्षाही त्या हसण्यात आणखी काहीतरी होते. अशा तऱ्हेचे हास्य महात्मा गांधींव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही महापुरुषाच्या चेहऱ्यावर मी आजतागायत बघितलेले नाही. पुण्यातले अनेक देशभक्त मी त्यांच्या त्यांच्या घरी बघितले होते. प्रत्येकाचा विशिष्ट दरबार असे. बोलण्याची पद्धत बाह्यत: मोकळेपणाची असली तरी त्यात काही संकेत असत. बापटांकडे तसे काही दिसले नाही. एखादा पेन्शनर बाप ज्या सहजतेने मुलाच्या बिऱ्हाडात वावरतो तसे त्यांचे वागणे होते.

त्या दिवसांत पुण्यात हिंदुसभेचा जोर होता. गांधी-तत्त्वज्ञानाची टिंगल होई. सेनापती त्या टिंगलीच्याही पार असत. तुरुंगातून सुटल्यावर एक-दोन दिवसांतच

त्यांनी रस्ते सफाईचा कार्यक्रम हाती घेतला. पहाटेच्या वेळी हातात झाडू घेऊन लकडीपूल स्मशानाकडील रस्ता ते स्वतः, बाळूकाका कानिटकर, वा. वि. साठे वगैरे मंडळी साफ करीत असताना मी बघितले आहे. त्या वेळी प्रभात-गीतेही म्हटली जात.

" आम्ही काय कुणाचे खातो रे ।
श्रीराम आम्हाला देतो रे ।। "
किंवा
" हे घनश्याम श्रीराम, मदात्माराम ।
भू जपानची नटविली । ...स्वातंत्र्ये ।
इटलीही तशी हसविली । ...स्वातंत्र्ये
मग आम्हांलाच का पारतंत्र्य कर्दमी कोंडिले राम ।। "

ही त्या वेळी ऐकलेली पदे अजूनही गुणगुणावीशी वाटतात.

ते अडतीस-एकोणचाळीस साल असावे. युद्ध नुकतेच सुरू झाले होते. काँग्रेस मंत्री-मंडळाने राजीनामा दिला होता. युद्धाबद्दलची वर्किंग कमिटीची भूमिका अजून ठरलेली नव्हती. देशातील वातावरण भयंकर अस्थिर होते.

त्या दिवसांत मी कल्याणला शाळामास्तर होतो. कशातच माझे मन रमत नव्हते. मला कुणी मित्रही नव्हते. सकाळ-संध्याकाळ मन रमविण्यासाठी कल्याण स्टेशनवर जाऊन गाड्या बघत बसणे हा माझा छंद होता.

एकदा सकाळी नऊ साडेनऊच्या सुमाराला मी असाच प्लॅटफॉर्मवर सिगरेट ओढीत उभा होतो. इतक्यात मुंबईकडून येणाऱ्या लोकलमधून सेनापती बापट आणि आता खासदार असलेले बिडेश कुलकर्णी उतरताना मला दिसले. बापटांनी अंगात गरम बंडी घातली होती. खांद्यावर खादीची पिशवी होती. कमरेत ते थोडेसे वाकले होते. कसल्या तरी विचारात ते दोघे असल्यासारखे दिसत होते.

मला काय वाटले कुणास ठाऊक ! पण मी हातातली सिगरेट टाकली आणि पुढे जाऊन तात्यांना नमस्कार केला. त्यांच्या वयस्कर डोळ्यांनी मला न्याहाळले. मी एक-दोनदाच पूर्वी त्यांच्याकडे गेलो होतो. ते मला ओळखणे शक्यच नव्हते.

मी माझं नाव सांगितलं व म्हटलं, " मी वामनच्या वर्गात होतो. "

बिडेश कुलकर्णी मला चांगले ओळखत होते. ते जवळ आले आणि पाठीवर हात ठेवून म्हणाले " तू इथे कसा ? "

मी सांगितल्यावर तात्या एकदम गडबडीने म्हणाले, " मग तर कामच झालं... चल ..आम्ही तुझ्या खोलीत येतो. "

मी संभ्रमात पडलो. माझी खोली बरेच दिवस झाडलेली नव्हती. सिगरेटची थोटके इतस्ततः पसरलेली होती. तशा ठिकाणी त्या साधुतुल्य माणसाला घेऊन जाणे मला बरे वाटत नव्हते.

पण त्यांना उसंत नव्हती. लहान मुलाप्रमाणे ते पुढे चालायलाच लागले.

खोलीत आल्यावर तिथल्या एका घाणेरड्या सतरंजीवर ते बसले. त्यांनी सांगितले, " उद्या मुंबईस संध्याकाळी चौपाटीवर फॉरवर्ड ब्लॉकची सभा आहे. मी अध्यक्ष आहे. युनियन जॅक मी तिथे जाळणार आहे...परंतु आजच मला पोलीस कमिशनरने हुकूम काढून मुंबई बेटाच्या बाहेर हद्दपार केलं आहे."

मी ऐकतच राहिलो. क्रांतिकारकांच्या अनेक गोष्टी मी ऐकल्या होत्या. मला कादंबरीत असल्यासारखे वाटत होते.

त्यांनी भुवया वक्र केल्या व ते त्वेषाने म्हणाले, " उद्या मला तेथे गेलंच पाहिजे. ...एखाद्या खाजगी मोटारीतून गेलो तर पोलिसांना चुकवता येईल. या गावातले कुणी प्रतिष्ठित गृहस्थ तुझ्या ओळखीचे असले तर मला घेऊन चल."

बापूसाहेब ओक हे श्रीमान सावकार माझ्या थोडेसे परिचयाचे होते. त्यांना मी सांगितले व त्यांच्या भव्य वाड्यात सेनापतींना घेऊन गेलो. दिवसभर तीच चर्चा चालली होती. मोटार द्यायला कोणी तयार नव्हते. कानजी गोविंद या नावाचे एक विटांचे कारखानदार तिथे होते. त्यांनी स्वतःच्या मोटारने हार्बर लाईनवरील एखाद्या स्टेशनवर पोचविण्याची शेवटी हमी घेतली व तो दिवस पार पडला.

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे तात्या उठले, तेव्हा घरातले सर्व लोक झोपेतच होते. सेनापतींनी तिथलाच एक झाडू घेतला आणि अंगणओसरी साफ करून टाकली व मोरीत जाऊन खराट्याने फरशी घासण्यास सुरुवात केली.

घरातील सर्व मंडळी अवाक् झाली व त्यांनी बापूसाहेबांना उठविले. एक ऋषितुल्य साधुपुरुष आपली मोरी साफ करीत आहे, हे दृश्य पाहून बापूसाहेब फार खंतावले. ते खाली आले व हात जोडून म्हणाले, " आपण मला असं लाजवू नका. ही शरम मी जन्मोजन्म विसरणार नाही."

सेनापतींना मात्र त्याचे काहीच वाटले नाही. ते हसत म्हणाले, "अरे, लवकर जागा झालो म्हणून हे काम करतो आहे."

दुपारी बारा साडेबारा वाजता आम्ही तिघांनी तिथेच थोडेसे जेवण केले. कानजी गोविंद यांनी घराच्या मागच्या बाजूला मोटार आणून उभी केली. पोलिसांची टेहळणी कदाचित् असावी. कारण मागच्या भिंतीवरून उडी मारून आम्ही तिघे बाहेर आलो व मोटारीत बसलो. मोटार सुरू झाली आणि तात्यांनी डोक्यावरून घोंगडे पांघरले. पोलिसांची सक्त नजर जी. आय. पी. च्या स्टेशनांवर होती. आम्ही दुसऱ्या मार्गाने चाललो होतो. फक्त एकाच ठिकाणी आठ–दहा पोलीस उभे होते. त्यांनी मोटारची पाहणी केली व घोंगडे डोक्यावर घेतलेल्या तात्यांकडे बोट दाखवून विचारले, " हे कोण आहेत ?"

विडेश कुलकर्णींनी सांगितले, " हे माझे वडील आहेत...डोळ्यात मोतीबिंदू झालाय्. डॉक्टरकडे घेऊन चाललोय."

पोलिसांनी मोटार जाऊ दिली. मोटारनं हार्बर लाईनवरच्या एका स्टेशनवर आम्हांला पोचवलं. तिथून तिकिटे काढून आम्ही चौपाटीवर आलो.

सेनापतींना हद्दपार केल्याची बातमी त्या दिवशी सगळ्या वर्तमानपत्रांत ठळक अक्षरांत आली होती. सभेला ते येतील अशी कोणाचीही कल्पना नव्हती.

आम्ही सभास्थानावर पोचलो तेव्हा तिथे अफाट जनसमुदाय होता. पहिली भाषणे सुरू झाली होती. तिथे गेलो आणि तात्या व विडेश कुलकर्णी झपाट्याने व्यासपीठावर गेले. मी अर्थातच मागे राहिलो. आग्र्याहून सुटलेल्या शिवाजीप्रमाणे. तात्यांना पाहून सर्वांना वाटले. लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. तात्या एकदम उभे राहिले व दोन-तीन वाक्यांत त्यांनी ब्रिटिश साम्राज्यशाहीचा धिक्कार केला त्यांच्या खिशात युनियन जॅक होते. ते त्यांनी बाहेर काढले व त्यावर त्वेषाने लत्ता-प्रहार केला. सभेत एकच गोंधळ उडाला. पोलिसांना प्रथम काही आकलनच झाले नाही. मग मात्र त्यांनी जोराचा लाठीहल्ला केला व सेनापतींना अटक केली.

गर्दीत उभा राहून मी ते सर्व बघितले आणि रात्रीच्या गाडीने कल्याणला आलो. पोलिस मला पकडतील या भयाने मला घेरले व दुसऱ्याच दिवशी रात्री कोणालाही काहीही न कळवता चंबूगबाळे आवरून मी पुण्यास आलो. पुढेही कित्येक दिवस पोलिसांच्या भीतीने माझी झोपमोड होत होती.

एखाद्या वेळी हसू येते. मी कोण ?...कुठला ? माझी लायकी काय ? त्या महापुरुषाच्या सान्निध्यात मला नाट्यपूर्ण प्रसंगात वावरायला मिळाले. त्यानंतर मी त्यांना भेटलो नाही. एकदा डेक्कनक्वीनने मुंबईला जात असताना थर्डक्लासच्या डब्यात ते माझ्यासमोर बसले होते. ओळख देण्याचा प्रश्नच नव्हता. लोणावळा स्टेशनवर गाडीत्ला नेहमीचा नकला करणारा माणूस आला. त्याने अनेक नकला केल्या. दोन मांजरे भांडत असल्याची त्याची नक्कल इतकी चांगली झाली की, इतर लहान मुलांबरोबरच तात्याही खूप हसायला लागले. नकला संपल्यावर त्यांनी आपल्या बटव्यातून दोन आणे काढून त्या माणसाला दिले. मी चित्रकार नाही याबद्दल मला तेव्हा खरे खरे वाईट वाटले. सुरकुत्या पडलेल्या चेहऱ्यावरचे ते निर्मळ हास्य चित्रांकित करायला हवे होते.

परवा सेनापतींच्या निधनाची बातमी ऐकल्यावर या जुन्या आठवणी मनात जाग्या झाल्या. आज सर्वच जमाना बदलला आहे. देशभक्ती, त्याग, सत्याग्रह, आत्मशुद्धी इत्यादी अनेक शब्द वापरून वापरून पार झिजून गेले आहेत. सांडपाण्याला दुर्गंधी यावी तसे त्या शब्दांचे झाले आहे. परंतु तरीही वाटते की मुळापाशी गंगा शुद्ध होती. त्या पावित्र्याचे प्रतीक तात्या होते.

आजचे चळवळीचे स्वरूपही बदलले आहे. पण एखाद्या सुंदर प्रभातकाळी शुभ्र वस्त्रे घातलेली सत्वस्थ चार–दोन मंडळी रस्ता झाडताना दिसावीत आणि हे 'घनश्याम श्रीराम–मदात्माराम' हे पद कानावर पडावे, असे मात्र वाटते. ○

# मु क्ता फ ळे

## □ तो कसा हो तो कसा ?

श्रीप्रकाश यांना ओळखता ना मंडळी ? महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल होते पूर्वी. तेच ते-गृहस्थ. ब्रह्मचारी व शिवाय सज्जन. मुख्य म्हणजे लेखणी, वाणी चांगली, म्हणजे मोठाच योग या दिवसात. नाही का? तर असे हे श्रीप्रकाश यांना एक मात्र फार वाईट खोड आहे. काँग्रेसला मानवणार नाहीत, परवडणार नाहीत अशाही गोष्टी हे अधूनमधून करीत असतात. आता पंडितजींनी त्यांना चांगले महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल नेमले. राज्यपालकी चांगली केली. विचाऱ्यांना पत्नी नसल्यामुळे मुंबईच्या कॉस्मोपॉलिटन स्त्रीसमाजात मात्र ते फारसे लोकप्रिय नव्हते. राज्यपालपद संपले, त्या दिवशी प्रथम तडक गेले आणि सावरकरांच्या पायांवर डोकं ठेवून आले. म्हणाले, "मी नुसता श्रीप्रकाश झाल्याबरोबर महाराष्ट्रात वास्तव्य करणाऱ्या या महापुरुषाच्या पायांवर मस्तक ठेवणे हे माझे काम होते." याचा अर्थ राज्यपाल असताना त्यांनी असे केले असते तर दिल्लीश्वर रागावले असते हे या सज्जन माणसाने सांगून टाकले. तसे ते भोळेच ! नुकतीच त्यांनी अशीच एक गंमत केली आहे. त्यांनी 'राष्ट्रीय सरकार' या मथळ्याखाली मुंबईच्या

'इंडियन एक्सप्रेस' या पत्रात दोन लेखांक लिहिले आहेत. यांत ते लिहितात, आजकाल आपण निधर्मीपणा व समाजवाद यांबद्दल सतत ऐकतो. ज्या महाभागांच्या तोंडून हे शब्द सतत 'गळत' असतात त्यांनादेखील कदाचित याचा अर्थ कळत नसावा."

अरे बापरे! काय हे बोलणे! वर्षातून पन्नास वेळा "देशके नाम संदेश देनेवाले" हेच शब्द सारखे वापरतात. त्यांनादेखील कळत नाही की काय याचा अर्थ? त्यांनादेखील कळत नाही, असे म्हणतात हे श्रीप्रकाश. पुढे वाचा–

"ज्यांना या शब्दाचे जनक म्हणता येईल त्या पंडित जवाहरलाल नेहरूंना मी अनेक वेळा विचारले की, या शब्दाचा नेमका अर्थ काय? जो माणूस स्वत:ला निधर्मी व समाजवादी मानतो तो जगतो कसा? वागतो कसा? उदरनिर्वाह करतो कसा? प्रत्येक वेळी नेहरू आपले गप्प. लगेच बोलणे दुसऱ्या विषयावर नेत. यामुळे मी स्वत:देखील त्यांना नेमके काय अभिप्रेत होते या संबंधी अज्ञानी राहिलो. परिणाम असा झाला की, मी आपला माझ्या पद्धतीने जगत राहिलो. आता माझा जीवनक्रम हा त्यांच्या आशाआकांक्षाप्रमाणे होता की नाही व मला निधर्मी व समाजवादी म्हणतात की नाही ते कुणास ठाऊक. बरे, मी पंडितजींचे जीवन जवळून पाहिले. त्यावरूनही या दोन शब्दांचा अर्थ लावण्यास मला काहीही मदत झाली नाही."

स्थितप्रज्ञाची लक्षणे सांगा असा अर्जुनाने गोड हट्ट धरला व भगवंतांनी लगेच लक्षणे सांगून टाकली. ते एक सोडा. समजा, भगवंताने लक्षणे सांगितली नसती व अर्जुनाने भगवंताच्या चरित्रावरून स्थितप्रज्ञ कसा असतो हे शोधून काढण्याचा प्रयत्न केला असता तर त्याला काय आढळले असते? जो १६००० लग्ने करतो, जो नदीकाठी आंघोळीला आलेल्या गोपींची वस्त्रे पळवतो, पांडवांना कुटिल नीती शिकवतो तो काय स्थितप्रज्ञ! सर्व राजकीय भगवंतांचे असेच असते. त्यांच्या चरित्रावरून काहीही समजत नाही. श्रीप्रकाशांनी असा प्रयत्न करणे हेच मुळात चुकले. हा निधर्मी, सेक्युलर शब्द निर्माण कसा झाला हे त्यांनी तपासायला हवे होते. भारतात मुसलमानांनी सवतासुभा मागितला. पाकिस्तान झाले. आता मागे उरले ते हिंदूंचे स्थान होऊ लागले. पंडितजींना याचा भयंकर राग आला. ते म्हणाले, हे हिंदूंचे स्थान नाही. हे निधर्मी स्थान. सगळे सेक्युलर झाले न् काय! यात काय समजायला कठीण आहे बुवा? समाजवादी म्हणजे काय हे श्रीप्रकाशांना समजत नाही? चेष्टा करता काय? समाजवादी म्हणजे ते आपले अशोक मेहता वगैरे. हा समाजवाद म्हणजे खूप काहीतरी चांगले!! निरभ्र आकाशासारखे मोकळे आणि सुंदर. प्रत्येकाने शांततेचे कबुतर पाळलेले. कबुतरे आपली उडताहेत उडताहेत!!! मग नुसते एकमेकांचे वाढदिवस करायचे. लग्न केव्हा करायचे, मुले किती व्हायची, पोटापाण्याचा व्यवसाय काय करायचा हे सगळे मग सरकार ठरवणार. सरकारने

सांगितले हसा–हसायचे. टाळ्या वाजवा–टाळ्या वाजवायच्या. हुंदके काढा–हुंदके काढायचे ! सरकार म्हणाले, अमक्या अमक्याचा जयजयकार करा– करायचा. पुतळा उभारा– उभारायचा. नंतर म्हणाले, तो दुष्ट होता– लगेच कबूल करायचे, पुतळे उखडून टाकायचे. असे सर्व संवादी सूर लागून जे नादब्रह्म उभे राहील तो सोहळा पाहायला श्रीप्रकाश तुम्ही असाल का हो ? तुमचा जन्मदिवस कोणता ? कितवं वर्ष चालू आहे तुम्हांला ? बघा तुम्ही जर भारतात समाजवाद यावा म्हणून अजून मंत्रीपदावर असता नं तर तुमचा वाढदिवस कुणी विसरले असते का ? पण निधर्मीपणा व समाजवाद यांचे अर्थ अजून न कळलेल्या तुमच्यासारख्यांना मंत्री तरी कसे ठेवायचे ? आता एक तरी करा. नेहरूंच्या काहीबाही गंमती सांगून आमचा आणखी गोंधळ तरी उडवू नका !

## ☐ राजाची मूळव्याध

जरा उशीरच झालाय दखल घ्यायला. पण बायकामंडळींपुढे केले असले तरी पुरुषार्थी असल्याने दुर्लक्ष करून चालणार नाही. राज्याचे उपमंत्री नेमके काय करतात हे सांगणे कठीण आहे. सार्वजनिक समारंभांतून भाषणे करण्यासाठी इतके खातेमंत्री असताना, उपमंत्र्यांची वर्णी लागणे कठीण जाते. परंतु जेव्हा जेव्हा अशी संधी त्यांना मिळते तेव्हा तेव्हा ते आपली चुणूक दाखविल्याशिवाय राहत नाहीत. श्री. दादासाहेब जगताप, दळणवळण–बांधकाम उपमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांनी गेल्या महिन्यात एक असेच तापट भाषण केले. जे दुःख आम्ही गेले वर्षभर भोगीत आहोत त्याला दादासाहेबांनी वाचा फोडली. प्रसंग काय ? कऱ्हाड येथील कमला नेहरू अध्यापिका विद्यामंदिराचे स्नेहसंमेलन ! इथ वास्तविक जमलेल्या बहुसंख्य स्त्रीसमुदायाला ते ' सुशील नाडकर्णी ' कशा सुखी झाल्या, दोनच मुले पुरे म्हणून सुशीलाबाईंनी, यजमानांनी, त्यांची एकच मुलगी व एकच मुलगा अशा चौघांनी एकत्र बसून कसा विचारविनिमय केला हे विस्ताराने सांगितले असते तरी चालले असते. ' दळणवळण ' ठेवून बांधकाम कसे टाळावे याचे वर्णन झाले असते तर कुटुंब नियोजनालाही हातभार लागला असता व अध्यापिकांचा दिवसही सार्थकी लागला असता. परंतु दुःख ठसठसते असले की ते वेळी अवेळी कुठेही बाहेर पडणारच. त्याला दादासाहेबांचा काय इलाज ! ते म्हणाले–

" महाराष्ट्रातील, विशेषतः पुण्यातील, वृत्तपत्रे समाजापासून दूर चालली आहेत. आमच्यामागे एकही वृत्तपत्र नाही. एक ' विशाल सह्याद्री ' होते. तेही पुणेरी लोकांच्या नादाने वाहवले आहे. आम्ही म्हणे भत्ते खातो. खाणार. आमच्या दिल्लीतील नेत्यांपासून तो गल्लीतील काँग्रेस कार्यकर्त्यांपर्यंत सर्वांना बदनाम करण्याचे वर्तमानपत्रवाल्यांचे धोरण समाज कधीही सहन करणार नाही." सकाळ

१७-१०-१९६७, केसरी-१७-१०-१९६७, तरुण भारत-१७-१०-१९६७.

पुण्यातील वृत्तपत्रे वाचणाऱ्या लोकांना, दादासाहेब, तुम्ही समाज समजता ? ज्या शहरात काँग्रेसचे उमेदवार पडतात तो काय समाज आहे ? इथल्या वृत्तपत्रांना आणि फडतूस संपादकांना, दादासाहेब, तुम्ही उगाच नसते महत्त्व देत आहात बरं ! जैन, गोएँका इत्यादी गरीब लोकांची मुंबईतील बहुसंख्य दैनिके ही विद्वान माणसे भाड्याने घेऊन दिवस-रात्र काँग्रेसचा प्रचार करतात तरी मुंबईला स. का. पाटील -पडलेच ! अमीन पडलेच ! डांगे, फर्नांडिस निवडून आले. पण दादासाहेब, तुम्ही मुंबईकर वर्तमानपत्रांवर कसे हो रागावला नाहीत ? असे अन्यांना घाबरू नका बुवा ! 'मार्मिक'ची काँग्रेसवाल्यांची व्यंगचित्रे तर समाजापासून इतकी दूर जाणारी असतात- बाकी पाहिलीच असतील तुम्ही म्हणा !

काँग्रेसच्या दिल्लीतील नेत्यांपासून गल्लीतील काँग्रेस कार्यकर्त्यांपर्यंत सर्वांना बदनाम करण्यासाठी पुण्याची वृत्तपत्रे झटत असतात हे शल्य आम्हांला सतत डाचत असते. यासाठीच आम्ही कटाक्षाने, फक्त त्यांचाच वेळी अवेळी अल्पमतीप्रमाणे गौरव करीत असतो. भत्ते खाणेच कसे आवश्यक आहे हे आम्ही विस्ताराने सांगतो. आमच्या मंत्र्यांनी कुठेही थोडे ज्ञानकण उधळले तर ते वेचून आधी लोकांपुढे सटीप ठेवीत असतो. स्वयंप्रज्ञा इंदिराजी, मौनीबाबा लुंगीवाले कामराजजी, देशाभिमानी स्वर्णसिंगजी, मदनफस्त मोरारजी, लूपभूषण डॉ. चंद्रशेखर, खडा मारणारे मोहन धारिया यांच्यावर आम्ही किती किती लिहिले आहे. तुळशीबागेत राहून काँग्रेसप्रेमाची भांग चढवणे किती कठीण आहे हे आपण जाणताच. दादासाहेब, आपण जर बाळासाहेब देसाई, शंकरराव चव्हाण, व्यंकटराव हिरे, वसंतरावदादा पाटील, विनायकराव पाटील यांच्यानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झालात नं, तर आम्हांला विसरू नका. आम्हांला पेन्शनच द्या, असा आग्रह आम्ही धरत नाही. परंतु मागे बाबुराव अर्नाळकरांना २०,००० रुपये दिले ना, तसे थोडसे दिलेत तरी या सेवेचे चीज होईल. सुखाचे पुढे पाहू. तूर्त तरी तुमचे आमचे दुःख एकच आहे. राजाची मूळव्याध आम्ही आधी ओळखली यातच आम्हांला समाधान आहे.

## □ पुणेरी हवा

पुण्याची वृत्तपत्रे काँग्रेसविरोधी का ? या प्रश्नाचा नेहमीप्रमाणे खोलात जाऊन विचार करता आम्हांला असे आढळून आले की, इथली हवाच चमत्कारिक असली पाहिजे. आता हरिभाऊ पाटसकरांचेच पाहा. केंद्रीय मंत्री होते, भारताच्या पंतप्रधानांच्या कृपेने राज्यपाल होते, तेव्हा असे भयंकर कधी बोलत असत ? निदान आमच्यातरी वाचनात नाही. हेच पाटसकर पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू झाल्यापासून किती हिंसक आणि काँग्रेसविरोधी बोलत आहेत पाहा. २२ ऑक्टोबरला

महाजन कमिशनवर बोलताना त्यांनी वृत्तपत्र प्रतीनिधींना सांगितले, "सरकारने किंवा पक्षाने आपल्या हातून सत्ता जाईल म्हणून न्यायाचा मार्ग सोडता कामा नये. न्याय मिळवणे हेच सर्वांत महत्त्वाचे आहे." श्री. पाटसकरांनी हेच तत्त्व या वेळी का सांगावे हे कळत नाही. फक्त हिंदूंना एकपत्नीत्वाचा कायदा लावणे हे निधर्मी राज्यात न्यायाचे होते का ? महाराष्ट्रापासून मुंबई वेगळी काढणे न्यायाचे होते का ? जवानांनी रक्त सांडून हिसकलेली हाजीपीर सोडणे न्यायाचे होते काय ? पुनश्च आक्रमण करणार नाही असे आश्वासन नसताना ताश्कंद करार करणे न्यायाचे होते काय ? स्वजनांना न्याय देणे त्यांनाच शक्य असते जे परकीयांकडून न्याय मिळवून दाखवतात ! आपण सतत करीत आहोत तो सत्तेच्या खुर्चीचा व्यवहार. महाराष्ट्रात कॉंग्रेस पक्षाने या वेळी मात्र न्यायाचा आग्रह धरून महाराष्ट्रातील कॉंग्रेसची सत्ता आपण होऊन आपल्या हाताने उखडावी अशी का पाटसकरांची इच्छा आहे ? ते शक्य नाही. कालत्रयी शक्य नाही. न्याय गेला खड्ड्यात ! खुर्ची जागेवर हवी. राग आला तर मौन पाळू. खुर्चीत बसून पाय हलवू जमतील तेवढे. २३ ऑक्टोबरला तर पाटसकरांनी कहरच केला. पुणे विद्यापीठात लष्करी अध्यासन विभागाच्या एका सेमिनारचे उद्घाटन करताना ते म्हणाले,

"परकीय देशाने आपल्यावर अणुअस्त्र सोडू नये यासाठी संरक्षणाला आवश्यक म्हणून भारताने अण्वस्त्रे पैदा केलीच पाहिजेत." अरे बापरे ! अण्वस्त्राने संरक्षण कसे काय होणार बुवा ? आपल्या टाळक्यावर चीन किंवा पाकिस्तानने अणुबॉंब टाकला तर फार फार तर अण्वस्त्रे असली तर आपण त्यांच्या टाळक्यावर टाकू इतकेच. हे काय संरक्षण झाले ? ही झाली हिंसेची दुपटी ! संरक्षक अण्वस्त्रे करायची तर चीन–पाकिस्तानपेक्षा जबरदस्त अस्त्रे आपण पैदा केली पाहिजेत. पाटसकरांनी हे सांगावे हे पाहून तर आम्हांला धक्काच बसला. रेशनवर भरपूर साखर आली असती किंवा मोहन रानडे यांच्या सुटकेसाठी डॉ. झाकिर हुसेन यांनी पोप व आगाखान वापरले असते तर आम्हांला एवढा धक्का बसला नसता.

'उपकुलगुरू' पाटसकरांसारखे सज्जन कॉंग्रेसभक्त जर या पुणेरी हवेत असे काहीबाही बोलतात तर 'कुल'क्षयाची वाट पाहणाऱ्या इतरांना दोष कसा द्यावा ?

**— ग्यानबा**



# विचार वारे

*— समीर*

## □ जर्मन दृष्टीतून भारत

थोड्या दिवसांपूर्वी पौंडाचे अवमूल्यन झाले तेव्हा चलनाच्या अवमूल्यनाने देशाची आर्थिक समस्या सोडविता येते की नाही हा रुपयाच्या अवमूल्यनाने अत्यंत गाजलेला प्रश्न आपल्याकडे पुन: पुढे आला आहे. या प्रश्नावर थोड्या दिवसांपूर्वी भारतात येऊन गेलेले तज्ज्ञ पश्चिम जर्मन पत्रकार इमॅन्युएल बिटन्बॉम म्हणाले, " रुपयाचे अवमूल्यन झाल्याने इतर देशांना फायदा झाला आहे, पण भारताला काही लाभ झालेला नाही. भारतात येणाऱ्या पर्यटकांना आता इतर देशांच्या मानाने अधिक स्वस्त भावाने वस्तू मिळतात. परंतु भारताची औद्योगिक प्रगती मात्र मंदावल्यासारखी दिसते. काही वर्षांपूर्वी भारत अधिक गतीने औद्योगिक युगाकडे वाटचाल करीत होता, आणि त्या काळात अधिक जोम दिसत होता. "

बिटन्बॉम हे पश्चिम जर्मनीची नवीन विदेश-नीती भारतीयांना समजावून सांगण्यासाठी आले होते : पश्चिम जर्मनी आता रुमानिया, युगोस्लाव्हिया इत्यादी साम्यवादी देशांसकट सर्व देशांशी मैत्रीचे संबंध वाढवू इच्छीत आहे आणि आर्थिक सहकार्य स्थापित करू पाहत आहे. " गेल्या पाच वर्षांत आम्ही कुठल्याही देशाला शस्त्रास्त्रे विकलेली नाहीत, आणि इराणने आपल्याला मिळालेली जर्मन शस्त्रास्त्रे पाकिस्तानला पुरविली या गोष्टीच्या आम्ही विरुद्ध आहोत. साम्यवादी आणि तटस्थ देशांशी अधिक सामंजस्य प्रस्थापित करणे ही पश्चिम जर्मनीची नवीन विदेश-नीती आहे. भारताचे तटस्थतेचे धोरण जर्मनीच्या मते यशस्वी झाले आहे.

## □ जपानी चित्रपट

गेल्या काही महिन्यांत निरनिराळ्या व्यवसाय-क्षेत्रांतले बरेच जपानी विचारवंत भारतयात्रा करून गेले, तेव्हा त्यातला एखादा तज्ज्ञ चित्रपट-क्षेत्रांतला असता व त्याने जपानी चित्रपटांची माहिती भारतात सांगितली असती तर नवल नव्हते. परंतु आश्चर्याची गोष्ट म्हणजे हे काम जपानमध्ये राहून जपानी चित्रपटांची समीक्षा करणारे अमेरिकन चित्रपट-समीक्षक डोनाल्ड रिची यांनी थोड्या दिवसांपूर्वी केले; तेव्हा त्यांनी जपानी चित्रपट-सृष्टीबद्दलचे बरेच लोकभ्रम दूर केले.

जपानी चित्रपटकार आंतरराष्ट्रीय चित्रपट-महोत्सवासाठी खास चित्रपट निर्माण करीत नाहीत. व्हेनिसच्या चित्रपट-महोत्सवात पहिले पारितोषिक मिळविणारा जपानी चित्रपट " राशोमॉन " हा जपानमध्येही यशस्वी झाला होता. प्रथम

तो थोड्या पैशात तयार करण्यात आला व " नवीन, आधुनिक, न समजणारा चित्रपट " अशी त्याची जाहिरात झाली. आर्थिकदृष्ट्या तो यशस्वी ठरला. " जपानी प्रेक्षक भारतीय प्रेक्षकांप्रमाणे रद्दी चित्रपटांची मुद्दाम मागणी करीत नाहीत, पण त्यांच्या वाट्यालाही रद्दी चित्रपट येतात." जपानमध्ये पाच मोठ्या चित्रपट कंपन्या आहेत, त्यांच्याशी संबंध नसलेल्या निर्मात्याला किंवा दिग्दर्शकाला स्वतःचा चित्रपट काढणे पूर्वी फार कठीण होते, पण आता ही परिस्थिती बदलली आहे. शिवाय गेल्या चार-पाच वर्षांत एक हजार ते दोन हजार खुर्च्यांची चित्रपट-गृहे बांधण्यात आली असून तेथे उत्कृष्ट चित्रपट दाखविण्यात येत आहेत. मात्र जपानमध्ये नवीन पद्धतीचे चित्रपट निघत असले तरी चित्रपट-तंत्रात नवनवीन प्रयोग करण्याच्या बाबतीत अमेरिका सर्वांत पुढे आहे.

## □ भारतीय कलेचा प्राचीन प्रवास

" कृण्वन्तो विश्वमार्यम् " म्हणजे भारतीय संस्कृतीचा व कलेचा परदेशांत प्रसार असा उच्च अर्थ घेऊन प्राचीन भारतीयांनी बऱ्याच देशांत, विशषतः, दक्षिण आशियात, आपला ठसा कसा उमटविला याची ओझरती ओळख सुशिक्षित भारतीयाला आहे. परंतु भारतीय कलेन प्राचीन काळी मध्य आशियातही किती दूरवर प्रवास केला होता याची माहिती भारतीय कलेचे एक अमेरिकन जाणकार बेन्जामिन रोलँड यांनी परवा भारत-भटीत दिली.

भारतीय कला भिक्षू, व्यापारी आणि इतर प्रवाशांनी अफगाणिस्तान व तुर्कस्तानमार्गे मध्य आशियात नेली. हा प्रवास इसवी सन दुसऱ्या शतकापासून दहाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत चालू होता. वास्तविक पाहता पारंपरिक मध्य आशियाई कला ही भारतीय कला व इराणी कला यांच्या मिश्रणाने तयार झाली आहे. भारतीय कलेच्या या ' यात्रे 'चा पुरावा अफगाणिस्तानातील बामियान दरीत सापडतो. या दरीत एक कडा पोखरून मैलभर लांबीचा बौद्ध विहार कोरण्यात आला आहे व त्या विहाराच्या दोन्ही टोकांना रक्षक म्हणून बुद्धाच्या मूर्ती उभ्या करण्यात आल्या आहेत. त्यांतली एक मूर्ती १२० फूट उंच असून दुसरी १७५ फूट उंच आहे. अभेद्य खडक पोखरून मूर्ती किंवा मंदिर कोरण्याची कल्पना मूळची भारतीय आणि " कल्पाच्या अखेरीस वाईट काळ येतो तेव्हा धर्माचे रक्षण व्हावे म्हणून धरतीमातेच्या अंगावर त्याला अमर रूप देणे, " हा त्या कोरीव कामाचा हेतू होता. बामियान दरीत बुद्ध मूर्तीच्या डोक्यावर पुष्पवर्षाव करणाऱ्या त्रिमूर्तींच्या रांगा दाखविल्या आहेत. त्यांचेदेखील गुप्तकालीन भारतीय शिल्पकलेत आढळणाऱ्या उडत्या देवतांशी खूपच साम्य दिसते. शिवाय बुद्ध-मूर्तीचा पेहराव बराचसा गांधार-प्रदेशीय वाटतो. मात्र मध्य आशियात जसजसे पूर्वेकडे जावे तसतसा चिनी प्रभाव अधिक दिसून येतो.

३७ वर्षांपूर्वी भारतात येऊन गेलेल्या या परदेशी कला-तज्ज्ञाचे एक मत : गेल्या चार दशकांच्या अवधीत भारतात व भारतीयांत ' कलेची जाण ' खूप वाढली आहे.

टोनी कळवळून तळमळून बोलत होता. समोरच मोठ्या कढईत सी. एस्. एम्. शिजत होते. खिडकीच्या फटीतून धुळीचे लोट येत होते व शिजणाऱ्या सी. एस्. एम्. वर त्याचे थर बसत होते. बाहेर अनेक निष्पाप बालके...

– – – – – – – –

# सी. एस्. एम्.

## एक राष्ट्रीय प्रश्न

– – – – – – – –

**ऑक्टोबर, ३०**
**बख्तियारपूर**

श्री. विजय परुळकर आणि मी, आमचे कॅमेरे घेऊन तिथल्या प्राथमिक शाळेत पोचलो. तेव्हा दुपार झाली होती. शाळेतील मुलांना माध्यान्ह-भोजन द्यायची तयारी सुरू होती. या माध्यान्ह-भोजनाच्या कार्यक्रमाचेच आम्हांला युनिसेफच्या वस्तुपटासाठी चित्रीकरण करायचे होते.

आणि त्याच वेळी आम्हांला कळले की हे बिहार-मधील मुलांचे शेवटचे माध्यान्ह-भोजन. दुसऱ्या दिवशी शाळांना रजा होती आणि एक तारखेपासून हा कार्यक्रम बंद करण्याचा निर्णय बिहारमधील सर्व प्राथमिक शाळांतील शिक्षकांनी घेतला होता. शिक्षकांच्या काही अडचणी होत्या. तक्रारी होत्या. त्यांतील काही खऱ्याही होत्या. पण, तरीदेखील असे व्हायला नको होते. कारण, त्यांच्या अडचणी आणि तक्रारी एवढेच, हा कार्यक्रम इरेला पेटून बंद करण्यामागचे कारण नव्हते. आणखीही काही तरी होते.



पुरेशा आणि सकस अन्नाच्या अभावाने रुग्णाईत होणाऱ्या मुलांची संख्या भारतात फार मोठ्या प्रमाणात वाढत आहे. इतकेच नव्हे तर निकृष्ट, निकस आणि निसत्त्व अन्नावर पोसल्या गेल्यामुळे भारतातील सुमारे दोन-तृतीयांशाहून अधिक मातांच्या दुधात आवश्यक तेवढे सत्त्व उरलेले नाही. या प्रश्नाचा पुढच्या पिढ्यांच्या दृष्टीने विचार होणे जसे अत्यावश्यक आहे, तसेच त्याबाबत काही तातडीची हालचाल करणेही अत्यंत निकडीचे झाले आहे. आज जर या प्रश्नाचे गांभीर्य न ओळखता त्याकडे दुर्लक्ष केले गेले तर भविष्यात अनवस्था प्रसंग ओढवल्यावाचून राहणार नाही.

निकृष्ट आणि निकस अन्नावर वाढणाऱ्या बालकांच्या भविष्याच्या दृष्टीने युनिसेफ या संघटनेने 'केअर' या अमेरिकन संघटनेच्या सहकार्याने भारतात प्राथमिक शाळांतील मुलांना माध्यान्ह भोजन देण्याची योजना सुरू केली.

दक्षिणेत गेलो होतो तेव्हा या कार्यक्रमाचे यश आम्ही डोळ्यांनी पाहिले. तिथल्या शिक्षकांचा उत्साह आणि विद्यार्थ्यांना वाटणारी रुची यांच्या तुलनेत बिहारमधील दृश्य अगदीच खेदजनक आणि निरुत्साही होते. शिक्षकांना या कार्यक्रमाबद्दल उत्साह नव्हता. विद्यार्थ्यांना ते खाणे आवडत नव्हते.

असे का व्हावे ? जे दक्षिणेतल्या बालकांना आवडते तेच बिहारमधील विद्यार्थ्यांना का आवडू नये ? जे दक्षिणेतले शिक्षक उत्साहाने आणि जबाबदारीच्या जाणीवेने करतात तेच बिहारमधील शिक्षक बंद का करतात ?

वसू भगत

बख्तियारपूर आणि तिथून आठ मैलांवर असलेल्या खेडयांतील शिक्षकांशी चर्चा केल्यावर आम्हांला या प्रश्नांची उत्तरे तर मिळालीच; पण आणखीही काही लक्षात आले. आणि हे जे काही लक्षात आले ते खेदजनक तर होतेच; पण चिंता करण्यासारखेही होते.

बिहारमधील शिक्षकांनी हा कार्यक्रम बंद करण्याचा जो निर्णय घेतला त्याची कारणे अशी–

१. या शिक्षकांना गेल्या चार महिन्यांचे पगार मिळालेले नाहीत. काँग्रेसच्या राजवटीतही हे घडत होते. पण, संयुक्त मंत्रिमंडळाच्या राजवटीत हे वारंवार घडते आहे.

२. या माध्यान्ह-भोजनासाठी तीनश विद्यार्थी असलेल्या शाळेला एक आणि त्याहून जास्त विद्यार्थी असणाऱ्या शाळांना दोन स्वयंपाकी देण्यात आले आहेत. या स्वयंपाक्यांचे वेतनही नियमित मिळत नाही.

३. सी. एस्. एम्. ची पोती आणण्यासाठी मिळणारा वाहतूक खर्च व इंधनासाठी मिळणारा खर्च हा प्रत्यक्ष लागणाऱ्या खर्चापेक्षा कमी आहे. शिवाय सी. एस्. एम्. चा कार्यक्रम म्हणजे शिक्षकांच्या डोक्यावर टांगती तरवार आहे. मिळणाऱ्या मालाच्या हिशेबात काही कमीजास्त आढळून आले तर त्यांची चौकशी होते, त्यांना दंड होतो. शिक्षा होते. हा नसता त्रास त्यांनी का करून घ्यावा ?

या कार्यक्रमाला शिक्षकांचा विरोध असण्याची ही मुख्य कारणे. मुख्य असे एवढ्याचसाठी म्हणतो की, तिथल्या शिक्षक संघानेही वृत्तपत्रांतून प्रसिद्ध केलेल्या निवेदनात हीच कारणे दिली आहेत.

पण, आणखीही काही कारणे आहेत. शिक्षकांशी झालेल्या चर्चेत त्यांनी मोठ्या आवेशाने ही कारणे पुढे मांडली :

१. सी. एस्. एम्. मध्ये अनेकदा अळ्या, किडे पडतात.

२. मुलांना त्याची चव आवडत नाही.

३. सी. एस्. एम्. परदेशांतून मदत म्हणून मिळते. आमची मुले आम्ही या भिकेच्या अन्नावर का वाढवावी ?

४. सी. एस्. एम्. पेक्षा दुधाची भुकटी मिळाली तर अधिक सोईचे होईल.

अगदी वरवर पाहिले तर शिक्षकांचे म्हणणे खरे वाटते; पण, थोडे खोलात शिरायचा प्रयत्न केला तर शिक्षकांच्या तक्रारींतील वैय्यर्थ्य कळून येते.

पगार न मिळाल्यामुळे रागावलेल्या शिक्षकांचे म्हणणे असे की, त्यांना असे विनावेतन काम करावे लागते. मग, विद्यार्थ्यांना शिकविण्याबरोबरच हे जास्तीचे काम त्यांनी का करावे ?

माध्यान्ह भोजन हे 'जास्तीचे काम' आहे का ? शाळेच्या वेळात शिक्षक शिकवत असतात. स्वयंपाकी सी. एस्. एम्. तयार करीत असतात. दोन वाजता मधली

सुटी झाली की मुलांना खायला देण्यात येते. यात मास्तरांवर जास्तीचे काम कुठे पडते? सी. एस. एम. शिजवायला पंधरा मिनिटांहून अधिक वेळ लागत नाही. पण या कामात तीन-तीन तास मोडतात, असेही एका शिक्षकाने निःसंकोचपणे आम्हांला सांगून टाकले.

शिक्षकांचे पगार का मिळाले नाहीत, हाही इतिहास मनोरंजक आहे. गेल्या जून-जुलै महिन्यात बिहारात दुष्काळ होता. या काळात वस्तुतः सुट्या असतात. पण, हा माध्यान्ह-भोजनाचा कार्यक्रम सुरू राहिला तर निदान शाळांतील आणि गावातील इतर लहान बालके आणि गर्भवती स्त्रिया यांच्यावर उपासमारीची पाळी येणार नाही, या हेतूने शाळांना सुट्या देण्यात आल्या नाहीत. म्हणून शिक्षकांनी या कालावधीचा पगार 'ओव्हर टाईम'च्या हिशेबाने मिळावा अशी मागणी केली. बिहार राज्य सरकार या मागणीचा विचार करीत आहे. आणि या भांडणात शिक्षकांचा पगार मागे राहिला आहे.

सरकारी खजिन्यात पैसे नाहीत म्हणून पगार मिळाला नाही, असे अनेक शिक्षकांनी अगदी आत्मविश्वासाने आम्हांला सांगितले. सरकारी निवेदनांत मात्र याचा काही उल्लेख नाही.

स्वयंपाक्यांचे पगार, सी. एस्. एम्. च्या वाहतुकीसाठी लागणारा खर्च, इंधन-खर्च या बाबतींत शिक्षकांचे म्हणणे अगदी बरोबर आहे. पण, हा कार्यक्रम म्हणजे शिक्षकाच्या डोक्यावर टांगती तरवार आहे, हे म्हणणे कुणालाच पटण्यासारखे नव्हते. शिक्षकांनाही त्याची जाणीव असावी. चार मुलांना चाळीस पौंड सी. एस्. एम्. लागले असे सांगितले तर कोणाला खरे वाटेल?

सी. एस्. एम्. मध्ये अळ्या, किडे पडतात म्हणून आम्ही ते आमच्या मुलांना देणार नाही, असाही एक मुद्दा शिक्षकांनी प्रतिपादन केला. इतक्या आवेशाने की, क्षणभर आम्हांलाही अमेरिकन भांडवलशाहीचा व युनिसेफच्या प्रतिगामित्वाचा राग आला. पण क्षणभरानेच लक्षात आले की कुठलेही धान्य कोठीत ठेवले, की त्यात किडे होतातच. घरच्या डब्यांतल्या तांदळात, कणकेत, पिठांत नाही का होत? मग, घरचे हे धान्य आम्ही फेकून देतो का? की ते उन्हात घालून, चाळून, साफ करून वापरतो? सी. एस्. एम्. परदेशांतून येते म्हणून ते फेकण्यात यावे का?

शिक्षकांचा रोख तोच होता. आवेश तसाच होता. या भिकेच्या अन्नावर आमची मुले का पोसली जावी, असा त्यांचा पुढचा प्रश्न होता.

या प्रश्नाचे उत्तर देणे तेवढे सोपे नव्हते. हा प्रश्न नाकारणाऱ्यांवर क्षणार्धात अराष्ट्रीयत्वाचा शिक्का बसल्यावाचून राहणार नाही. शिक्षकांचा आवेश सभासंमेलनात शोभून दिसणारा होता. वाक्ये टाळीची होती.

पण, एकूण वस्तुस्थिती काय आहे, हेही लक्षात घ्यायलाच हवे. आम्ही खात असलेल्या दर तीन चपात्यांमध्ये एक चपाती अमेरिकन आहे. आमची धरणे, पोलाद कार-

खान, उद्योग हे सारेच तर परकीय मदतीवर उभे आहेत. इतकेच नव्हे तर, बिहारांत लावण्यात आलेल्या ट्यूबवेल्समधल्या ९५ टक्के ट्यूबवेल्स परकीय आहेत. त्यांचे नटबोल्टस्सुद्धा भारतात तयार झालेले नाहीत. टाटा कंपनीचे जे काही पंप बसविण्यात आले आहेत, त्यांतले बहुतांश पंप नादुरुस्त आहेत. आम्हांला ही परदेशी चपाती चालते. हे कारखाने, उद्योग चालतात. परदेशी ट्यूबवेल्स चालतात. चालत नाही ते सी. एस्. एम्. ! का ? बरे, हे इतक्यावरच थांबत नाही. सी. एस्. एम्.च्या ऐवजी दुधाची भुकटी मिळाली तर ती चालणार आहे. असे का ?

हा प्रश्न केस पांढरे झालेल्या आणि घाटावर गोवऱ्या पोचलेल्यांचा नाही. लहान लहान बालकांच्या, उद्याच्या पिढीच्या सकस आहाराचा आहे. त्यांच्या हिताकडे दुर्लक्ष करण्यात, खोटया आणि तकलादू अहंकाराने त्यांचे हित नाकारण्यात कोणती राष्ट्रीय वृत्ती दाखविण्यात येते ?

पाटण्याला परत येताना केअरचा फिल्ड ऑफिसर टोनी डिसोझा कळवळून सांगत होता, "हे सगळं काय होते आहे ? आम्ही काय करतो आहोत ? कुठे जातो आहोत ? आमचे हित आम्हांलाच कळत नाही ?"

त्याच्या प्रश्नाला उत्तरे नव्हती.

तो सांगत होता...

"हे लोक अतिशय निष्काळजी आहेत. या पावसाळयांतली गोष्ट. दुधाच्या भुकटीची दहा पोती उघडयावरच ठेवली होती यांनी. पाऊस आला. पोती भिजली. इतकी भुकटी वाया गेली."

आज हे सी. एस्. एम्. नको म्हणतात. तीन महिन्यांपूर्वी मात्र या सी. एस्. एम्. साठी हे लोक मारामाऱ्या करायला निघत होते. नुसत्या बालकांना व गर्भवती स्त्रियांनाच का; साऱ्या गावालाच सी. एस्. एम्. द्या म्हणून शाळांतील शिक्षकांवर काठया उगारत होते.

दुधाच्या भुकटीत भयंकर गोंधळ होतो. मुलांसाठी देण्यात येणारी भुकटी काळया बाजारात जाते. जयपूरला तर ६० कन्साईनमेंटस् बघता बघता गायब झाल्यात. शाळांतून गायब झालेली भुकटी प्लॅस्टिकच्या पिशव्यांतून बाजारात जाते. तीन-साडेतीन चार रुपये पौंडापर्यंत तिला भाव येतो. हे बंद व्हायला हवे. मुलांसाठी आलेले अन्न काळया बाजारात का जाते ? कसे जाते ? बाजारात ही भुकटी कुठून येते याचा शोध घेतला तरी त्याच्या मागची विकृत माणसे सापडू शकतील पण, हे होत नाही.

महाराष्ट्रातही मुलांसाठी भेट म्हणून देण्यात आलेली दुधाची भुकटी राजरोसपणे काळयाबाजारात जाते. हॉटेलांतून चहासाठी सर्रास भुकटीचे दूध वापरले जाते. ह्यांना ही भुकटी कुठून मिळते ?

शाळेतल्या मुलांना सी. एस्. एम्. आवडत नाही, असे शिक्षक म्हणतात. खाण्या-

चीही मुलांना रुची निर्माण करावी लागते. हे वाईट आहे, भिकेचे आहे, असे त्यांना सतत सांगत राहिलात तर त्यांना ते आवडायचे कसे? शिवाय हे लोक सी. एस्. एम्. शिजवतातही अत्यंत निष्काळजीपणे. जे तेलात शिजवायचे ते तसेच शिजवून त्यात वरून कच्चे तेल घालतात. साहजिकच तेलाचा उग्र वास येणारच. अनेकदा सांगूनही अनेक शिक्षक ऐकत नाहीत. त्यांना कसे समजावून द्यायचे? कुणी समजावून द्यायचे.

सी. एस्. एम्. शिजवताना हे लोक स्वच्छतेची काळजी घेत नाहीत. कोठी अत्यंत अस्वच्छ असते. कितीही जीव तोडून समजावून सांगितले तरी ते ऐकत नाहीत.' त्यांना सत्तेचा आदेशच पाहिजे.

टोनी डिसोझा कळवळून, तळमळून बोलत होता. आणि आमच्या डोळ्यांसमोर बख्तियारपूरची शाळा उभी होती. सरपणाने भरलेल्या खोलीत एका चुलीवर मोठ्या कढईत सी. एस्. एम्. शिजत होते. एक माणूस फड्याने खोली झाडत होता. उघड्या असलेल्या दारांतून, बंद असलेल्या खिडकोच्या फटींतून धुळीचे लोट बाहेर पडत होते. शिजणाऱ्या सी. एस्. एम्. वर धुळीचा थर बसत होता आणि बाहेर, शाळेच्या अंगणात अनेक निरागस निष्पाप बालके आणि दहा-पाच टपोरलेल्या पोटाच्या स्त्रिया आपापल्या थाळ्या घेऊन रांगेने बसल्या होत्या. ○


आगामी प्रकाशन

# पुरंदऱ्यांची नौबत

ब. मो. पुरंदरे

मूल्य साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २

# माणूस खाणारी कोंबडी

मुकुंद कोठारे ❧ ☙ बबन प्रभू



छाया : राजदत्त

# रा त रा णी

— — —

विजय तेंडुलकर

— — —

**युनायटेड थिएटर्सची ही सलामीची कोंबडी. काही जागी ती फडफडून उडाली, उधळली, तर काही जागी खुडूक होऊन बसून राहिली.**

कोंबड्या खाणारी माणसे काही सर्रास भेटत नाहीत. काही नुसतीच अंडी खातात. किंवा काही पालेभाज्या खातात. किंवा आणखी काही पैसेसुद्धा खातात. काहींना खाण्यासाठी अधून मधून शिव्या नसल्या तर चुकल्या-चुकल्यासारखे वाटते. पण 'माणूस खाणारी कोंबडी' ही आणखीच एक चमत्कृती मानावी लागेल. हे प्रकरण तरी काय असेल म्हणून मुंबईतल्या रवींद्र नाट्यगृहात मध्यंतरी गेलो. ही फार्सिकल कोंबडी आत्माराम भेंडे यांच्या युनायटेड थिएटर्स नामक नव्या संस्थेची होती. तिचे लेखक होते बबन प्रभू. दिग्दर्शक भेंडे आणि प्रमुख भूमिकांत या दोघांची नावे प्रामुख्याने झळकलेली होती. विनोदी चित्रपटात किंवा नाटकात एकाने जे होत नाही ते कित्येकदा दोघे मिळून करून दाखवतात. प्रतिभाशाली आणि लोकोत्तर विनोदवीरांनाही दर वेळी एक जोडीवाला लागतोच. तसे मराठी रंगभूमीवर 'फार्स' म्हटला की प्रभू-भेंडे एकदम नजरेसमोर येतात. किंचित्काळातच तिसरा एकजण त्यांत येऊन घाईघाईने उभा राहतो-हा मुकुंद कोठारे. या

तिघांनी मिळून ' झोपी गेलेला जागा झाला ' आणि ' दिनूच्या सासुबाई राधाबाई या आधीच्या दोन गाजलेल्या फार्सेसमध्ये धमाल करून टाकली होती. युनायटेड थिएटर्सच्या नव्या नरभक्षक ' कोंबडी 'त हे तिघेही आहेत म्हटल्यावर या कोंबडीने पोटाला हसून हसून तडस लागणार याची गॅरंटी होती.

प्रत्यक्षात ही अपेक्षा सफल झाली पण अपेक्षेपलीकडेही एक गोष्ट घडली. हसू न आल्याने काही जागी या कोंबडीने तितकाच कंटाळा आणला. काही वेळा ती फड-फडून उडाली आणि उधळली तर काही जागी खुडुक होऊन बसून राहिली ती काही केल्या हलेच ना.

ही कोंबडी मूळची अमेरिकन. ' मॅचमेकर्स ' हे अमेरिकन रंगभूमीवर अत्यंत गाजलेले प्रहसन; ' माणूस खाणारी कोंबडी ' या नव्या नावाने युनायडेड थिएटर्सने तेच मराठी रंगभूमीवर आणले.

मराठी रंगभूमीवर आणले म्हणजे त्याचे संवाद मराठी होते आणि पात्रांची नावे मराठी होती. बाकी सर्व सर्रास पाश्चात्त्यच होते. कारण एक तर त्याचे खऱ्या अर्थाने सर्वस्वी मराठीकरण अशक्य होते आणि त्याची तशी गरजही नव्हती. फार्स किंवा प्रहसनाची दुनिया वास्तवाहून निराळीच आणि वेडी असते. तिचे तर्कशास्त्र वेगळे असते, तसे रंगरूपही अ-वास्तव आणि अद्‌भुत असू शकते. आरंभीच्या काही मिनिटांत या वेडया दुनियेशी आमच्यातल्या हास्योत्सुक वेडया वाऱ्याचा सांधा जमला की झाले. मग एखाद्या भिरभिऱ्यासारखे ती आणि आपण हसवीत–हसत उंच जातो.

दाजी सामंत हा तरवारी आणि झेंडयासकट गणवेष घालून वावरणारा विधुर संघटनाप्रेमी किराणा–भुसार व्यापारी, त्याची सुंदर पण खुळचट भाची शीला दुकानातला ' हेडक्लार्क ' बाज्या बजरंग, अॅप्रेंटिस डंब्या रसरंग, अक्षरश: दोन पोती सर्टिफिकिटे घेऊन येऊन नोकरीला राहिलेला, पटका उडालेल्या ' एअर इंडिया 'च्या महाराजासारखा दिसणारा चतुर नशाबाज रावण दशमुखे, आणि ' मावशी ' या संबोधनाने दाजी सामंताच्या घरात वावरणारी, विवाह जमवून देण्याचा धंदा कर-णारी मध्यमवयस्कर ' कोंबडी ' ही या फार्समधली महत्त्वाची पात्रे. दाजी सामंताचे मावशीकरवी वधुसंशोधन आणि बाज्या आणि डंब्या यांची गुप्त साहसे अशा दोन सूत्रांनी हा फार्स उलगडत जातो. ही दोन्ही सूत्रे पुढे एकमेकांत गुंततात आणि रावण त्यात आणखीच गुंता स्वभावगत उत्साहाने आणि मुलायमपणे माजवतो. यातच दोन अफलातून पोरी, पोरगी पळवू पाहणारा एक प्रेमवीर, व्हिक्टोरिया-वाल्याच्या पोषाखातला कोकणी मुसलमान टांगेवाला, वस्त्यांव–किस्त्यांव ही गोवेकर वेटराची जोडी, एक वैफल्यवादी बाई सुधाताई सुलाखे, अशी भर पडत राहते. शेवटी दाजी मावशीशीच लग्न करतो आणि सर्व तरुण मंडळींची ईप्सिते पूर्ण होऊन फार्स संपतो– जरा उशीराच संपतो. निदान मी पाहिला त्या प्रयोगाला

प्रेक्षकांना उशीर जाणवला आणि ते फार्समध्ये सहभागी होऊ बघू लागले.

## अभिनय

फार्समध्ये प्रेक्षकांना हसविण्यासाठी काय करावे आणि काय करू नये याला धरबंध नसतो. सदभिरुचीपूर्ण फार्स हा अहिंसक मद्यासारखाच शब्दप्रयोग आहे. मद्य महत्त्वाचा. अहिंसा जास्तीची. तसा फार्समध्ये फार्स अत्यावश्यक असतो. अभिरुचीची मोठीशी गरज नसते. त्याहून आवश्यक असते रंगत. ही मुख्यतः वेगवान आणि वाढत्या गुंतागुंतीच्या घटनांनी येते. या 'कोंबडी'त या घटना पुरेशा वेगवान वाटल्या नाहीत. गुंतागंत ठरीव ठशाची वाटली. तिलाही वेग असता तर हे तेच-ते-पण तेवढे जाणवले नसते. खरी रंगत आली या काहीशा साचेबंद, स्थूल आणि मंदगती घटनांत प्रभू (बाज्या), भेंडे (रावण), कोठारे (डंब्या) आणि काही अंशी विनायक पै (दाजी सामंत) आणि मीना जोशी (सुरेखा) या मंडळींनी भरलेल्या विविध चेष्टांच्या तपशिलाने. भूमिकांचा वेडेपणा आणि निरागसपणा या सर्वांनी स्वतंत्रपणे आणि एकमेकांत चांगला सांभाळला आणि काही घटनांत विलक्षण रंग भरला. तुलनेने उरलेल्यांना हे एवढे जमले नाही. उदाहरणार्थ 'मावशी' झालेल्या हंसा वाडकर. या फार्समध्ये त्या नाटकातला खेळकर अभिनय करीत होत्या. तेच सुधाताई सुलाखे या 'फ्रस्ट्रेटेड' प्रौढेच्या व्यंगचित्राची भूमिका करणाऱ्या लता म्हापसेकरांचे. फार्सला हवा तो मुक्त अभिनय त्यांना साधला नाही आणि मग जे रंगमंचावर दिसले ते हास्योत्पादक न होता हास्यास्पद झाले. जोडीला मंदगती कथानकाची जोड मिळून उत्तरोत्तर ही 'कोंबडी' जड, स्थूल होत गेली. हवा गेलेला फार्स 'फार्स' न राहता पोरकटपणा वाटतो आणि तुरळक हशात संपतो, तसे या फार्सचे शेवटी झाले.

फार्समध्ये मूलतः अभिप्रेत नसलेले एक लोभस वैशिष्ट्य या फार्समध्ये होते. एखादे पात्र फार्सिकल घटनेच्या ऐन धावपळीतून मध्येच अच्चळ बाहेर, रंगमंचाच्या पुढे येऊन प्रेक्षकांशी गप्पा करीत होते. त्या निमित्ताने आपापले जीवनाविषयीचे हुशार तत्त्वज्ञान आणि जगण्याचे चतुर हिशेब ऐकवीत होते. उदाहरणार्थ, रावण दशमुखे वऱ्यापैकी प्यायलेल्या अवस्थेत प्रेक्षकांना विश्वासात घेऊन म्हणाला की, 'मंडळी, माणसाला एक ना एक व्यसन पाहिजेच असे आपले मत आहे. का पाहिजे? तर माणसाला एखादे व्यसन असले म्हणजे लोक त्याच्याविषयी काय बोलतात ते ऐका. अरेरे! माणूस बुद्धिमान, स्वभावानेसुद्धा फार भला, शिवाय गुणी तितकाच, पण काय करणार! त्या एका अमूक तमूक व्यसनाने वाया गेला. म्हणजे मला सांगा, व्यसन नसले तर त्याच्या गुणांविषयी कुणी असे दिलदारपणे आणि मनमोकळेपणे बोलले असते का? व्यसनाने माणसाचे गुण सर्वांच्या नजरेत भरतात. म्हणून आपल्या गुणांचे चीज व्हावे असे वाटत असले तर एक ना एक पण व्यसन हवेच. पण एका वेळी दोन किंवा अधिक व्यसन मात्र वाईट. त्यांनी अन-

पेक्षित घोटाळे होतात. म्हणून मी काय करतो ; दर वेळी एकच व्यसन करण्याचा माझा नियम आहे...' इ. या प्रकारच्या स्वगतांनी या फार्सची लज्जत वाढली. पण या प्रकारची फार्सिकल स्वगते रंगमंचावरून साजेशा निष्पाप आणि मनमोकळ्या इरसालपणे टाकणे सोपे नव्हते. आपल्या तमाशातल्या सोंगाड्याचे गुण त्यासाठी नटाकडे हवेत. प्रभू–मेंडेनी हे काम उत्तम जमवले. तुलनेने इतरांना हे साधले नाही आणि परिणामी कथानकाच्या गतीत खीळ पडल्यासारखे काही स्वगतांमुळे वाटले.

थोडक्यात, आकाराने हा फार्स जरूर त्याहून दीर्घ वाटला आणि या नाट्यप्रकाराला न्याय देणारी काही नट मंडळी आणि हा नाट्य प्रकार न पेलणारी काही नटमंडळी यांच्या गंगाजमनी सांघिकतेतून काही भागात हा तुफान हसवू शकला, काही भागात नुसताच हसत ठेवू शकला आणि काही भागात हास्यास्पद आणि कंटाळवाणा वाटला.

शिवाय फार्सला वास्तवतेचे बंधन नसले तरी अनुवादातल्या काही अडचणी खटकल्या. उदाहरणार्थ मूळच्या नाटकातल्या दारूचे, अननसाचे सरबत करून ते पुन्हा पुन्हा पिऊन रंगमंचावरची पात्रे धमाल उडवतात तेव्हा संदर्भाने ती मुळात काय पीत असतील हे कळले तरी समोरचे दृश्य फार्सिकल म्हणूनही खटकत राहते. पाश्चात्त्य पद्धतीची नृत्येदेखील, विशेषत:, रंगमंचावरची प्रौढ पात्रे सर्रास नाचू लागतात तेव्हा विरस करतात. किंबहुना सर्वच पात्रांचे पिंड परदेशी आणि नावे, गावे आणि भाषा देशी हे फार्सच्या रंगतीत एक बारीकसे उणेपणच सातत्याने राहून जाते. घटनांना वेग आणि रंगत राहते तेव्हा हे कमी जाणवते किंवा कदाचित् जाणवेनासेही होते पण हा वेग आणि रंगत उतरली की हे उणेपण रंगमंचाचा कब्जा घेते. ' कोंबडी ' मध्ये हा अनुभव आला.

थोडा बोध, थोडे अश्रू, थोडा विनोद अशा बेतशीर कृत्रिम खोटया मिश्रणांच्या सध्याच्या काळात भरपूर आणि निखळ हसविणारी निकोप विनोदी नाटके हवीच आहेत. या दृष्टीने युनायटेड थिएटर्सचे अभिनंदन करणे जरूर आहे. या संस्थेची ही सलामीची ' कोंबडी ' अपेक्षेइतकी रुचकरठरली नाही म्हणूनच हळहळ. □

## अमर आत्मा, उन्नत मस्तक

अमेरिकेतल्या न्यूयॉर्क शहरच्या लिव्हिंग थिएटर कंपनी नामक प्रायोगिक नाट्यसंस्थेची ही हकीकत मुद्दाम वाचा.

१९६३ च्या ऑक्टोबरमध्ये अमेरिकन सरकारच्या अंतर्गत महसूल खात्याने या संस्थेकडे थकलेली वेग-

वेगळ्या करांची सुमारे २८,००० डॉलर्सची रक्कम वसूल करण्याकरिता संस्थेचे मालकीचे फोर्टीन्थ स्ट्रीट थिएटर जप्त केले. प्रायोगिक आणि प्राय: लोकप्रिय होऊ न शकणाऱ्या, परंतु आपल्याला पटणाऱ्या नाट्यकृतींचेच प्रयोग करण्याच्या संस्थेच्या आग्रहामुळे संस्थेची आर्थिक परिस्थिती त्या पूर्वीच डबघाईस आलेली होती. त्यात अमेरिकन सरकारास अप्रिय अशा काही नाटकांचे प्रयोग संस्थेने केले. हे संस्थेवरच्या सरकारी रोषाचे एक अप्रत्यक्ष कारण देण्यात येते. सरकार थिएटर जप्त करणार हे कळल्यावर ते सुखासुखी जप्त होऊ देण्याचे नाकारून संस्थेच्या सदस्यांनी मोहीम उभारली. अमेरिकन रंगभूमी आणि साहित्य, राजकारणादि क्षेत्रातल्या अनेकांनी या प्रकरणी सरकारने उदार दृष्टिकोन घ्यावा म्हणून रदबदली केली, परंतु सरकारी धोरण कायम राहिले. संस्थेचाही निश्चय पक्का राहिला.

सरकारी अधिकारी जप्तीसाठी आले, तेव्हा संस्थेच्या सदस्यांनी बैठा सत्याग्रह केला. त्यांना सक्तीने थिएटरबाहेर काढण्यात येऊन जप्ती हुकमाची अंमलबजावणी करण्यात आली. संस्थेचे हक्काचे थिएटर गेले.

मग संस्थेने फॉर्टी सेकंड स्ट्रीटवरच्या एका छोट्या सभागारात आपले प्रयोग लावले. आधीच्याच आर्थिक तंगीत गर्दीअभावी ते प्रयोग थांबवणे भाग पडले.

सरकारी जप्ती हुकमाची तामिली करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांच्या कामात अडथळा निर्माण केल्याच्या आरोपावरून संस्थेच्या संस्थापकांवर सरकारने खटला भरला होता. या खटल्यातच कोर्टाच्या बेअदबीचा नवा आरोप या मंडळींवर ठेवण्यात आला. ज्युडिथ मालिना आणि ज्युलियन बेक या दोन संस्थापकांना अनुक्रमे तीस आणि साठ दिवसांच्या तुरुंगवासाच्या सजा झाल्या. तथापि कंपनी लंडनला जाऊ घातली होती आणि तिच्याबरोबर जाणे पूर्वीच ठरलेल्या कार्यक्रमानुसार व्यावसायिक दृष्ट्या संस्थापक-द्वयावर बंधनकारक होते हे मान्य करून कोर्टाने त्या दोघांना युरपला जाण्याची मुभा दिली. मात्र शिक्षा भोगण्यासाठी त्यांनी परत यावयाचे होते.

कंपनी लंडनला गेली. चार आठवडे आपल्या 'दि ब्रिग' या प्रायोगिक नाटकाचे प्रयोग तिने तेथे केले. थिएटरशी सहा आठवड्यांचा आधीचा करार होता, पण चार आठवड्याअखेरी मेर्मेड थिएटरच्या चालकांनी कंपनीला प्रयोग बंद करण्याला लावले. कारणे देण्यात आली नाहीत, पण अमेरिकन सरकारकडून अप्रत्यक्षपणे सूत्रे हलली असा प्रवाद बोलला गेला. त्यानंतर कंपनी लंडन सोडून युरपमध्ये गेली. सप्टेंबर १९६४ पासून आजतागायत जेथे प्रयोग लावता येतील तिथे कंपनी फिरत आहे. युरपभर तिचे असे सतत अखंडित भ्रमण चालू आहे. होईल त्या उत्पन्नात प्रयोगाचा खर्च भागवून जे उरेल ते सर्वांनी सारखे वाटून घ्यायचे आणि होता होईल तितके काटकसरीन राहायचे असा रिवाज आहे. पॅरिस, ब्रुसेल्स, अॅण्टवर्प, रॉटरडॅम, बाल, बर्लिन, व्हिएन्ना, हेलेसिंकी, रोम, नेपल्स, टुरिन, मिलान, ट्रीस्ट,

फ्लॉरेन्स, बोलोग्ना, व्हेनिस अशी देशोदेशींची गावे घेत कंपनी एकसारखी फिरत आहे.

दरम्यान ६४–६५ च्या हिवाळ्यात संस्थापक-द्वयाने आपल्या वाटणीचा तुरुंगवास अमेरिकेत येऊन भोगला. या काळात कंपनीचे प्रयोग बंद राहिले. बेल्जममध्ये एका ओसाड वाडीवर मुक्काम टाकून कंपनीच्या नटवर्गाने या काळात एका चित्रपटात कामे करून पोटापुरते मिळवले. रोममध्येही अशीच बारीक बारीक कामे या नटवर्गाला 'बायबल' या रंगीत इंग्रजी चित्रपटात मिळाली, ती करून मंडळीने निर्वाह केला. रोममध्येच एका तरुण चित्रपट व्यवसायीने या कंपनीवर एक छोटा डॉक्युमेंटरी चित्रपट घेतला. त्याचे शीर्षक 'लिव्हिंग अँड ग्लोरिअस' (अमर आत्मा, उन्नत मस्तक) असे होते. बर्लिनमधल्या एका दिग्दर्शकाने कंपनीच्या एका नाटकातला पुरुष नटांनी केलेल्या स्त्रीभूमिकांचा भाग चित्रीत करून आपल्या चित्रपटात वापरला. दरम्यान कंपनीच्या ध्येयवादाचा बोलबाला होऊन युरमधल्या शेकडो नियतकालिकांतून कंपनीविषयी लेख-मुलाखती इत्यादी प्रसिद्ध झाल्या.

इतके होऊनही कंपनी आज कशीबशीच आपला प्रपंच चालवीत आहे. स्वतःचे थिएटर नाही, वास्तव्यासाठी कुठे हक्काचे ठिकाण नाही. तीन जुनाट 'व्होक्स वॅगन' बसेसमधून कंपनीचा प्रवास चालतो. आज इथे तर पुढल्या आठवड्यात कुठे असू हे कुणालाच माहीत नसते. शेकडो मैल अंतरे तोडून रातोरात प्रयोग संपवून जावे लागते. अनेकदा उत्पन्ने होत नाहीत. प्रयोग रद्द होतात. उघड्यावर राहावे-झोपावे लागते. प्रयोगाविना आणि अन्नाविना दिवस जातात. वारंवार येणाऱ्या या अवस्थेमुळे सहनशक्तीचा अंत होऊन कंपनीचे एकोणतिसातले नऊ सदस्य कंपनीला रामराम ठोकून गेले. पण कंपनी चालू आहे. नवी मंडळी उत्साहाने या निर्धन, भटक्या कंपनीत येऊ मागत आहे. आज कंपनीत सत्तावीस माणसे आहेत. अधिक एक पाच वर्षांचे मूल आणि दोन तान्ही अर्भके. प्रयोगाच्या- नाटकाच्या गरजेनुसार गावोगाव स्थानिक माणसे तात्पुरती कंपनीत घेण्यात येतात किंवा उपलब्ध माणसांप्रमाणे प्रयोगातले भाग ठेवले किंवा कापले जातात.

## नाटकाचे स्वरूप

ही कंपनी कोणत्या प्रकारची नाटके करते? 'मिस्टरीज अँड स्मॉलर पीसेस' म्हणून अलीकडे कंपनीने बसवलेला एक नाट्यप्रयोग आहे. ते लिखित स्वरूपाचे नाटक नसून रंगभूमीवर काही प्रवेशांच्या रूपाने हा प्रयोग उभा राहतो. हे प्रवेश नटवर्गानेच आपापसांत कल्पना काढून, चर्चा करून आणि तालमी करून बसवले आहेत. यांना कथानक नाही. परंतु रंगभूमीच्या तांत्रिक आणि दृश्य सामर्थ्याचा प्रभावी उपयोग करून प्रेक्षकांना हे वेगवेगळ्या प्रकारांनी झपाटून टाकतात आणि या माध्यमाद्वारे एका गूढ, वेदनामय, विविध भावयुक्त चैतन्याचा थरारून टाकणारा अनुभव देतात. पॅरिसमध्ये या निर्धन कंपनीला एका संस्थेने तालमीसाठी विनाभाडे जागा दिली पण बदल्यात कंपनीने काही करून दाखवावे अशी अट घातली. फार

जमवाजमव वा विचार करण्याला सवड नव्हती. अशा वेळी कंपनीच्या नटवर्गाने आपल्याला सुचलेले आणि येणारे जे काही करून दाखवले त्यातून हा अभिनव नाट्यप्रयोग काही नियोजनानंतर उभा राहिला. कंपनीत जात्या येत्या सदस्यांच्या बदलांनुसार या प्रयोगातही काही गळत, नवे अंतर्भूत होत गेले. अत्यंत हलाखीच्या स्थितीतही असा चैतन्यदायी नवा नाट्यानुभव प्रेक्षकांना सादर करणाऱ्या या देशोवडी लागलेल्या, कंपनीच्या कलेविषयीच्या निष्ठेबद्दल युरपमधले समीक्षक आदर प्रकट करीत आहेत.

आपल्याकडल्या बहुसंख्य नाट्यव्यवसायींचे व्यावसायिक अनुभव याहून सुखाचे, स्वास्थ्याचे असतील असे मुळीच नाही. त्यांचे कलाप्रेम या अमेरिकन मंडळींहून हिणकस असेल असेही नाही. फरक एकच : आपले नाटकवाले ज्या निष्ठेने प्रेक्षकांना हवा तो मालमसाला त्या त्या परिस्थितीत शक्य तेवढ्या कसोशीने सादर करतात त्याच निष्ठेने हे 'लिव्हिंग थिएटर'चे कलाकार स्वतःला महत्त्वाचे वाटते आणि पटते ते रंगभूमीवर प्राण ओतून मांडतात. त्यातून निव्वळ रंजन करीत नाहीत तर चैतन्याचा प्रभावी साक्षात्कार एका जिद्दीने अर्धपोटी, उपाशीपोटी राहून घडवतात. कारण रंगभूमी हा त्यांचा नुसता व्यवसाय नाही तर ते त्यांचे अस्तित्व आहे, त्यांचे जीवनसर्वस्व आहे.

ही हकीकत वाचली आणि वाटले की, आपल्याकडल्या रंगभूमीविषयक निष्ठेतून असे नवे, रसरशीत चैतन्यदायी अनुभव रंगभूमीवर केव्हा झळाळून उठतील? रंगभूमीमागच्या हालअपेष्टांना, संपन्न अनुभवांना, नाट्य-प्रेमाला आणि निष्ठेला रंगभूमीवर कधी कलापूर्ण रूप लाभू लागेल?

खऱ्याखुऱ्या निष्ठेने खोट्या खोट्या अश्रूंचे आज वाहणारे पूर, लटके-लटके चालणारे ठरीव ठशाचे रंजन, यातून असा एखादाच अस्सल नाट्यानुभव जरी रंगभूमीवर आला तरी मराठी रंगभूमीचे ते मोठे वैभव ठरेल. ○


परसूच्या पशुकथा वसंत सबनीस

सहा साहसे दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.

जग्गी या क्षणी फारच आनंदात होती. मंत्रीपद मिळाले असते तरी तिला इतका आनंद झाला नसता. रेशनच्या दुकानासमोर जो भयानक लांब क्यू लागला होता त्यात जग्गीचा नंबर पहिला होता. काल जग्गीचा अडतिसावा होता व सदतिसाव्या नंबरा-वरच रेशनवाल्यानं बगला उंच करून स्टॉक संपल्याची ग्वाही फिरविली होती. भुश्याच्या पोत्यासारखं पोट असलेला दुकानदार दुकान बंद करून निघून गेला तरी जग्गी दोन तास दुकानासमोर उभी राहून शिव्यांचा भडीमार करीत होती. शेवटी थकून ती मुकाटयानं घरी आली व चार ग्लास पाणी पिऊन झोपून गेली. दुसऱ्या दिवशी सकाळी ती भल्या पहाटेच उठली, व गुळाचा चहा ढोसून वेगानं घराबाहेर पडली व रेशनच्या दुकानासमोर येऊन धम्मदिशी बसली. सुरकुतलेल्या तोंडाची, विस्कटलेल्या विटक्या साडीची व फिस्कारलेल्या पांढऱ्या केसांची जग्गी त्या अर्धवट अंधारात एखाद्या भुतासारखी दिसत होती.

---

# अद्भुत आत्याची गोष्ट

## लीला श्रीवास्तव

---

निवडणुकीत जिकलेला उमेदवार मतदारांवर जशी तुच्छ नजर टाकतो तशी जग्गीनं क्यूमधल्या अन्य लोकांवर एक नजर टाकली. तिच्या मागेच एक अकरा-बारा वर्षांचा मुलगा उभा होता. त्यानं नुसती बनियनच घातली होती जिचा रंग कैक वर्षांपूर्वी कदाचित पांढरा असावा. त्याचे गाल पिचकलेले होते व तो मोठ्या चवीनं विडी ओढीत होता. जग्गीनं त्याच्याकडे पाहिलं व तिच्या चेहऱ्यावरच्या सुरकुत्या आणखी वाढल्या. जग्गीनं त्याला प्रेमानं म्हटलं, " बेटा, एवढ्या कच्च्या वयात विडी पिऊ नये. "

हे ऐकून पोराचे गाल आणखी पिचकले. तो ओरडून म्हणाला, " ए बुढ्ढे, तू आपलं काम कर. या साल्या बुढ्ढ्या लोकांना दुसऱ्यांना उपदेश द्यायची मोठी हौस असते. "

जग्गीनं खांदे उडवीत मनातल्या मनात अलीकडच्या पिढीला दोन-चार अश्लील शिव्या दिल्या.

दुसऱ्या नंबरावर एक बाई होती. तिचं पोट घोब्यानं बांधलेल्या कपडयांच्या



ढिल्या गाठोड्यासारखं दिसत होतं. एखाद्या आठवड्यातच या गाठोड्यातून एक खाणारं तोंड बाहेर येणार हे जग्गीला कळलं. ती कणवेनं म्हणाली, " अरी वहू, किती तास उभी राहणार तू या धक्काबुक्कीत ? दुसऱ्या कुणाला पाठवायचं होतंस."

" कुणाला पाठवू अम्मा ? मोठी पोरगी आठ वर्षांची आहे. तिचा काय पाड लागणार या गर्दीत. धनी कामावर गेलाय. आज कमावलं नाही तर उद्या खाणार काय ?" बोलतानाही तिला कष्ट होत होते.

चौथ्या नंबरावर उभा असलेला लाल पिवळ्या डोळ्यांचा माणूस भरपूर झोकून आला होता व उभ्याउभ्या झोकांड्या खात होता. त्याच्या दोन्ही हातांत चार मोठाल्या पिशव्या होत्या. एवढ्या मोठ्या, की जणू मवल्या साऱ्या लोकांचं रेशन तो एकटाच घेणार होता.

पाचव्या नंबरावर उभा असलेला माणूस शिकलेला बाबू दिसत होता. कारण त्याची पॅन्ट व शर्ट फाटकी असूनही परीटघडीची दिसत होती. खिशात पेन, हातात पेपर व चेहऱ्यावर पापुद्रे होते. जग्गीनं त्याला आदरानं विचारलं, " बाबू, पेपरात काय लिहिलंय ?"

शिकलेल्या माणसानं अतिशय गंभीर आवाजात उत्तर दिलं, " व्हिएटनाममध्ये बाँबवर्षाव, हाँगकाँगमध्ये उपद्रव, यू ए आर व इजराएलमध्ये तनातनी."

जग्गीनं दंतविहीनं तोंडाचा आं वासला. विएटनाम, हाँगकाँग, यू ए आर, इजराएल हे मोठाले शब्द ऐकून तिला दम लागला. ती अज्ञानीपणे म्हणाली, " पण ह्याच्याशी आम्हांला काय करायचंय बाबू ? आपल्या देसाची खबरबात सांगा. "

" मी सांगतो. " सहाव्या नंबरावर उभा असलेला एक नवजवान पुढे सरसावला. चुस्त पॅन्ट, ताणलेल्या भुवया, डोळ्यांत अशांती, आवळलेले ओठ ...... कॉलेजचा विद्यार्थी दिसत होता. तो त्वेषानं म्हणाला, " या देशाची अर्धी जनता निकटच्या

भविष्यकाळात अन्नाकरता तडफडून मरणार आहे."
जग्गी कळवळून म्हणाली, "अशुभ नको बोलूस रे."
"खोटं नाही ते अम्मा. माझी पोरं पंधरा दिवस अर्धपोटी राहतात. रेशनच्या दुकानांवर पुरेसं धान्य मिळत नाही, ब्लॅकमध्ये मिळतं पण खरेदी करायला एवढा पैसा कुठून आणू?" गरोदर बाई बोलली. तिला आता उभं राहणंच अशक्य झालं होतं. ती अस्ताव्यस्तपणे खाली बसली व फाटक्या पदराने निस्तेज डोळे पुसू लागली.

आठव्या नंबरावरचा पेन्शनर बोलला, "निवडणुका होत्या तेव्हा लोकांनी काय काय आश्वासनं दिली. रोज घरी खेपा घालून घालून आम्हांला मतांसाठी भंडावून सोडलं होतं. आता कुठं गेले सारे?"
विद्यार्थ्यानं उसळून उत्तर दिलं, "त्यातले काही खुर्चीवर जाऊन बसले आहेत. ह्या जादूच्या खुर्चीवर बसल्यावर माणूस जमिनीवर चालत नसतो. अन् जे खुर्चीवर बसू शकले नाहीत ते बसलेल्यांना खाली ओढायच्या चिंतेत आहेत. या ओढाताणीत विचारे रात्रंदिवस व्यस्त असतात. आमच्याकडे पाहायला फुरसत आहे कुणाला?"
बाबूनं आपल्या घड्याळात पाहिलं. तो पुटपुटला, "साडेआठ वाजले. अजून दुकान उघडायचा पत्ता नाही. मला ऑफीसमध्ये जायला उशीर होईल. अजून शेव्ह करायची आहे."
दुसऱ्या नंबरावर उभ्या असलेल्या अकरा वर्षांच्या पोरानं नवी सिगरेट शिलगावली व बाबूला डोळा मारीत त्याने दात विचकवले. "दाढी अजून चिकणी आहे बाबूजी." अन् खूपसा धूर त्यानं जग्गीच्या पोकळ तोंडावर फक्दिशी सोडला. जग्गीनं दहा शिव्या हासडल्या.
पोरगा ही ही हसत म्हणाला. "बुढिया, शिव्या तर तुला एकाहून एक बढिया येतात. हाय! शिव्या देताना मोठी मारू दिसतेस! जवानीत माशाल्ला राहिली असावीस तू."
पेन्शनर पुटपुटला, "ही आमच्या देशाची नवी पिढी!" उन्हं राक्षसीपणे वाढत होती. जग्गीचा गळा कोरडा झाला होता. ती काल रात्री उपाशीच झोपली होती, वर ही तहान. तिला वाटत होतं, आतली आतडी ओल्या कपड्यांसारखी पिळली जात आहेत. क्यू सारखा वाढत होता. थोड्याच वेळात तो क्षितिजाला जाऊन पोचला असता.
शेवटी दुकानदार किल्ल्यांचा जुडगा सुदर्शन चक्रासारखा फिरवीत येऊन पोचला. खादीच्या शुभ्र नेहरू शर्टमधून त्याचं भलं मोठं पोट थुलथुल हलताना दिसत होतं. पावसाळ्यातल्या गांडुळाकडे पाहावं तसं दुकानदारानं क्यूमधल्या माणसांकडे पाहिलं व स्वर्गाचं दार उघडण्याच्या ऐटीत त्यानं दुकानचा दरवाजा उघडला.
दुकानदाराला पाहून क्यूमधली गांडुळं प्राण परत आल्यासारखी वळवळू लागली.

प्रत्यक्ष ईश्वर प्रकट झाल्यावर झाला नसता एवढा आनंद दुकानदार प्रकट झाल्यावर झाला.

" आला......आला......आला......" सगळीकडे मंत्रोच्चार झाला.

दुसऱ्या नंबरावरचा पोरगा खेकसला, " बुढ्ढे, पुढे हो लवकर. आधीच उशीर झाला आहे. मेमसाहेब माझी चामडी उधडून ठेवील आणखी उशीर झाला तर."

विद्यार्थी उंच आवाजात म्हणाला, " पोरा, तुझ्या साहेबाला पाठव एक दिवस इथं. म्हणजे कळेल." पोरानं तोंडातली विडी काढली, पहिल्यांदाच अन् तो खो खो हसू लागला. हसता हसता त्याच्या डोळ्यांत चिपड जमू लागला.

" साहेब कशाला येईल इथं ? त्याला जरूरत काय ? दळदार माळवी गव्हाची अन् वारीक तांदळाची पोतीच्या पोती येतात मागच्या दारानं बंगल्यात. बाबांनो, हे रेशनचं धान्य आम्हां नोकरांकरता अन् पाळलेल्या कुत्र्याकरता आहे, समजलं ?"

दरवाजाच्या फळ्या उघडल्याबरोबर जग्गीनं आपलं कार्ड आत सरकवलं.

दुकानदार एकदम ओरडला, " थांब ग बुढ्ढे. श्वाससुद्धा घेऊ देत नाहीत लेकाचे. दुकानाचा दरवाजा उघडला रे उघडला की झाले छातीवर सवार."

जग्गीनं कडू थूक गिटकला.

आत धान्याच्या पोत्यांचा ढीगच्या ढीग होता: एका कोपऱ्यात खूप सारे गहू पडले होते. एवढं सारं धान्य ! अन् तरीही आम्ही एक एक किलोकरता तासन् तास उन्हातान्हात तडफडत उभं राहतो. जग्गीचा कोरडा पडलेला गळा भरून आला.

मागच्या लोकांनी आपापली कार्डे पटापट पुढे सरकवली.

जग्गी आनंदानं न्हाऊन निघत होती की तिचं कार्ड सर्वांत वरती आहे.

तहानेनं ती आता व्याकुळ झाली होती. कुणी तरी पुऱ्या ताकदीनं गळा दाबीत असल्यासारखं वाटत होतं तिला.

दुकानदार तराजू ठीक करू लागला. जग्गी मोठ्या उत्साहानं आपली मळकी पिशवी घेऊन पुढं सरसावली.

दुकानदारानं कार्डावरचं नाव वाचून पुकारा केला, " घासीराम. "

आणि चौथ्या नंबरावर उभा असलेला माणूस आपले मोठाले थैले घेऊन पुढं आला.

ह्या चमत्कारावर जग्गीचा क्षणभर विश्वासच बसेना. पहिला नंबर तिचा होता. सकाळी चार वाजता उठून ती इथं आली होती. भूक, तहान, घाम, थकव्यानं ती व्याकुळ झाली. उभं उभं राहून तिची सारी गात्रं शिणली होती.

मग हा चौथ्या नंबरावरचा माणूस पहिल्या नंबरावर कसा आला ?

त्या माणसाच्या अगदी कानाजवळ कान नेऊन दुकानदार काही तरी कुजबुजत होता व तो माणूस दोन्ही दोन्ही हातांनी मोठाल्या पिशव्यात धान्य भरीत मान हलवीत होता.

दुसऱ्या क्षणीच प्रलय येऊन ठेपल्यासारखी जग्गी किंचाळली, "माझा पहिला नंबर......" आणि 'आहे' म्हणायच्या आतच खाली कोसळली. क्यू सोडून कुणीही धावलं नाही. साऱ्यांना नंबर जायची भीती वाटत होती.

जग्गीच्या तोंडून फेस बाहेर येत होता. कोमल, मुलायम पांढरा शुभ्र फेस. उंचीहून उंची साबणालाही येणार नाही असा फेस......

फक्त तो नौजवान विद्यार्थी पुढं आला. जग्गीनं क्षणभर निरखून पाहिल्यावर तो वेगानं परत फिरला. " मरू दे बिचारीला. दोन-तीन दिवसांत तसं मरावंच लागेल तिला भुकेनं. हे धान्य जे मोठाल्या पिशव्यांत भरलं जात आहे ते संध्याकाळपर्यंत काळ्या बाजारात पोचेल अन् दुप्पट दामानं विकलं जाईल. म्हातारी काही खरेदी करू शकणार नाही ते." विद्यार्थ्यानं स्पष्टीकरण दिलं.


चार-पाच दिवसांनंतर वर्तमानपत्रांत एक बातमी झळकली--

" मुख्यमंत्र्यांनी ठासून सांगितलं आहे, प्रांताची धान्य वाटप व्यवस्था फार उत्तम असल्याने भूकमृत्यू होणं शक्य नाही. आम्ही एकही भूकबळी होऊ देणार नाही. जग्गी नामक वृद्धा भुकेनं मेल्याची बातमी खोडसाळ आहे. तपासाअंती हे सिद्ध झालं आहे की वृद्धेचा मृत्यू भुकेनं नव्हे. न्यूमोनियाच्या आजारामुळे झाला. "

O

## तटस्थतेचे प्रकार


तटस्थतेचे प्रकार किती ? तीन. अरब लीग ऑफ् स्टेटस्चे दिल्लीतील प्रतिनिधी डॉ. क्लोव्हिस मकसूद यांनी इंडियन कौंसिल ऑफ् वर्ल्ड अफेअर्सच्या विद्यमाने नुकत्याच केलेल्या एका भाषणात हे तीन प्रकार सांगितले— संस्थात्मक तटस्थता लढाऊ तटस्थता व दडपणाखालची तटस्थता. तटस्थतेचा संस्थात्मक प्रकार सर्वमान्य झाला असून त्याला कोणी फारसा विरोध करीत नाही. उलट लढाऊ तटस्थता स्वीकारली की तिच्या प्रभावामुळे निरनिराळे प्रवाह वाहू लागतात. इंजिप्तची तटस्थता ही लढाऊ असून ती क्रांतिकारक व सुस्पष्ट आहे. हिंदुस्थानाची तटस्थता दडपणाखालची, म्हणजे निरनिराळ्या प्रवाहांच्या अनिवार्य दडपणामुळे स्वीकारली गेलेली आहे.



# भारतांतील शेतीव्यवसायाचा कायापालट...

भारतांतील शेती ही गेलीं हजारों वर्षे परंपरागत पद्धतीनें केली जात होती; पण आतां या प्रचंड व्यवसायाचा कायापालट होत आहे. किर्लोस्कर लोखंडी नांगर हे या क्रांतीच्या प्रारंभाचें प्रतीक होय. त्यानंतर विविध प्रकारचे सोयिस्कर नांगर, पेरणी यंत्र, पाणी पुरवठा करणारे अनेक प्रकारचे सेंट्रिफ्युगल पंप आणि विविध यांत्रिक साधनांची निर्मिति करून किर्लोस्कर कारखान्यानें शेती व्यवसायाच्या आधुनिकीकरणाला जोराची गती दिली आहे.

**किर्लोस्कर**



**किर्लोस्कर ब्रदर्स लि.,**
किर्लोस्करवाडी, जि सांगली.

# ' १२ नोव्हेंबरच्या रात्री




वि. स. वाळिंबे

विंटर पॅलेस क्रांतिसेनेच्या हाती आल्याची बातमी स्मोल्नीमध्ये येऊन पोचेपर्यंत पहाटेचे साडेतीन वाजून गेले होते. एका दिवसात बरेच काही साध्य झाले होते. दिवसभराच्या श्रमाने सारेजण खूप थकले होते. सोव्हिएट प्रतिनिधींची कामे नुकतीच आटोपली होती आणि जो तो निजण्याच्या तयारीला लागला. स्मोल्नीमध्ये निवांत झोप मिळणार नाही म्हणून लेनिन बाँख–ब्रुयेव्हिच या आपल्या मित्राच्या घरी गेला. लेनिन ज्या खोलीत झोपला होता त्या शेजारच्या खोलीत बाँख-ब्रुयेव्हिचने आपली पथारी टाकली. मध्येच त्याला जाग आली तेव्हा लेनिनच्या खोलीतला दिवा अद्यापही जळत असल्याचे आढळून आले. बाँख-ब्रुयेव्हिच आपल्या मित्राच्या हालचालींची चाहूल घेऊ लागला. लेनिन खोलीत येरझारा घालीत होता. मधूनच तो पाय न वाजवता खोलीचे दार किलकिले करून घरातले सारेजण झोपले आहेत याची खात्री करून घेई. बाँख-ब्रुयेव्हिच झोपेचे सोंग घेऊन, लेनिन काय करीत असावा याचा अंदाज घेऊ लागला. लेनिन टेबलापाशी बसून काही तरी लिहित होता. मधूनच कागद फाडल्याचा आवाज

# 'आमचा विजय निश्चित झाला '—ट्रॉटस्की

बाँख-ब्रुयेव्हिच्या कानांवर येई. लेनिन एकच गोष्ट पुनः पुन्हा लिहीत असावा. सहाच्या सुमारास लेनिनने दिवा मालवला आणि तो विश्रांतीसाठी अंथरुणावर टेकला. अद्यापही त्याच्या डोक्यात विचारांचे काहूर माजले होते. हाती आलेली सत्ता स्थिर कशी करता येईल या विचाराने त्याला व्यग्र केले होते.

आठ वाजता बाँख-ब्रुयेव्हिच उठला आणि घरातील प्रत्येकाला हळू आवाजात सांगू लागला, ' लेनिन रात्रभर जागा होता. त्याला आता निवांत झोप मिळाली पाहिजे. त्याची झोपमोड होईल असं आपण काहीही करता कामा नये. ' एवढ्यात स्वतः लेनिनच तेथे आला. कालच्या थकव्याची त्याच्या चेहऱ्यावर पुसटती निशाणीही दिसत नव्हती. अतिशय उत्साहाने बाँख-ब्रुयेव्हिचचा हात हातांत घेत लेनिन म्हणाला, ' समाजवादी क्रांतीचा आज पहिला दिवस आहे आणि म्हणून मी तुझं अभिनंदन करतो. '

' खरं म्हणजे आम्ही सर्वांनी तुझंच अभिनंदन करायला हवं, ' बाँख-ब्रुयेव्हिच कृतज्ञतेच्या स्वरात म्हणाला.

एवढ्यात क्रुपस्कायाही तेथे आली. मेजाभोवती बसून सर्वांचा चहापानाचा कार्यक्रम सुरू झाला. लेनिनने काल रात्री लिहिलेला मजकूर वाचून दाखविला. शेतकऱ्यांसाठी समाजवादी राजवटीने काढलेला तो पहिला जाहीरनामा होता. जाहीरनामा वाचून दाखविल्यानंतर लेनिन म्हणाला, ' शेतकऱ्यांना दिलासा देणारी ही घोषणा करणे आवश्यकच आहे. या जाहीरनाम्याने आपण जमीनदारी नष्ट करणार असून शेतकऱ्यांना मिळणारी जमीन आता कोणीही हिरावून घेऊ शकणार नाही. क्रांती यशस्वी होण्यासाठी आपल्याला ही गोष्ट केलीच पाहिजे. आजपासून शेतकरी आपल्या जमिनीचे मालक झाले आहेत. '

## २५

बाँख-ब्रुयेव्हिच म्हणाला, ' पण केवळ हा जाहीरनामा प्रसिद्ध करून भागणार नाही. काही ठिकाणी जमीनदार खचित दंगे सुरू करतील, कदाचित रक्तपातही होईल. त्याचाही आपल्याला विचार करायला हवा. '

परंतु बाँख-ब्रुयेव्हिचच्या अंदाजात लेनिनला मुळीच तथ्य

वाटले नाही. तो उत्तरला, ' या जाहीरनाम्याने आपण शेतकऱ्यांची मागणी पूर्ण करीत आहोत. त्याविरुद्ध आवाज उठविण्याचं कोणाच्याही अंगात सामर्थ्य नाही. '

कोणीतरी म्हटले, 'परंतु शेतकऱ्यांचे प्रतिनिधी सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी पक्षाचे आहेत. ते आता असा प्रचार करतील की बोल्शेव्हिकांनी आमच्या कार्यक्रमाची मुद्दामच उसनवारी सुरू केली आहे.'

लेनिन हसला. तो म्हणाला, ' कोणाला काय म्हणायचं असेल ते म्हणू द्या. आपण जमीनदारीविरुद्ध गेले कित्येक दिवस आवाज उठवीत होतो, ही गोष्ट शेतकऱ्यांना माहीत आहे. आता आपण शक्य तितकं शेतकऱ्यांच्या जवळ जायला हवं. त्यांच्या अपेक्षा जाणून घेऊन त्या पूर्ण करायला हव्यात. असं करताना काही मूर्ख आपल्याला हसले तर हसू देत बिचारे. शेतकऱ्यांचं नेतृत्व सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी पक्षाकडे आहे ही गोष्ट आपण कधीच अमान्य केलेली नाही. परंतु आता दलित जनतेची हुकूमशाही प्रस्थापित करताना आपण शेतकऱ्यांना आपलंसं करून घेतलं पाहिजे. '

आपला हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यानंतर शेतकरी वर्ग आपल्या राजवटीला पाठिंबा देईल याबद्दल लेनिनला मुळीच शंका नव्हती. तो सांगू लागला, 'या जाहीरनाम्याच्या मी आता पन्नास हजार प्रती छापून घेणार आहे. लढाईवरून परतणाऱ्या प्रत्येक सैनिकाच्या हाती या जाहीरनाम्याची प्रत पडेल अशी व्यवस्था केलीच पाहिजे. हे सैनिक आपल्या गावी परतल्यानंतर या जाहीरनाम्यासंबंधी चर्चा करू लागतील. आपण वृत्तपत्रातही हा जाहीरनामा प्रसिद्ध करू, म्हणजे साऱ्या देशाला तो माहीत होईल. आपण एकदा जमीनदारांकडून जमीन काढून घेऊन ती शेतकऱ्यांना वाटली की सारा शेतकरी वर्ग आपली स्तुतिस्तोत्रं गाऊ लागेल. हा जाहीरनामा शेतीवाडीवर परतणाऱ्या सैनिकांना आपण नीट समजावून सांगितला पाहिजे. जर जमीनदारांनी जमीनी ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला तर त्यांना तेथून हुसकावून लावा असं आपण शेतकऱ्यांना बजावलं पाहिजे. ठिकठिकाणी शेतकरी-समित्या स्थापन करून त्यांच्यामार्फत शेतांची कामं व्हायला हवीत. '

हा जाहीरनामा घेऊन लेनिन सहकाऱ्यांना भेटण्यासाठी स्मोल्नीमध्ये गेला. रशियाची सत्ता आता बोल्शेव्हिकांकडे गेली आहे ही बातमी सर्व वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेली होती. परंतु सत्ता हस्तगत करण्याच्या इराद्याने केरेन्स्की पेट्रोग्रोड-पासून काही मैलांवरच उभा आहे या वस्तुस्थितीकडे बोल्शेव्हिक नेत्यांना दुर्लक्ष करता यण्यासारखे नव्हते. त्यातच बोल्शेव्हिकांनी सर्व समाजवादी पक्षांना घेऊन संमिश्र सरकार स्थापन केले नाही तर आपण संपावर जाऊ अशी रेल्वे कामगारांनी धमकी दिलेली होती. पेट्रोग्राडमधील धान्यसाठा संपत आला असल्यामुळे ताबडतोब धान्य-पुरवठ्याकडे लक्ष देण्याचीही गरज निर्माण झाली होती. या सर्व प्रश्नांपेक्षाही बोल्शेव्हिकांपुढे आणखी एक महत्वाचा प्रश्न उभा होता. तो म्हणजे सगमीकडचे

सैन्य आपल्याकडे वळवून घेण्याचा.

स्मोल्नीमध्ये जमलेल्या बोल्शेव्हिकांपुढे बोलताना लेनिन म्हणाला, ‘ युद्धामुळे श्रमिक जनतेला अपार कष्ट सहन करावे लागतात हे आपण अनुभवले असल्यामुळे तत्काळ युद्ध थांबविण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. लोकांना आता शांतता हवी आहे हे ओळखून आपण तावडतोब युद्धाविराम केला पाहिजे. या युद्धकाळात जर्मनी, ब्रिटन, फ्रान्स आणि इटली येथील कामगारवर्गही जागृत झाला असल्यामुळे रशियाच्या पाठोपाठ तेथेही समाजवादी क्रांती होईल असा माझा कयास आहे. ’

जमीनदारी नष्ट करण्याबाबतचा लेनिनचा जाहीरनामा संध्याकाळी प्रसिद्ध करण्यात आला. लहानसहान शेतकऱ्यांजवळील जमीन वगळता इतर सर्व जमिनीवरील खाजगी मालकी आता संपुष्टात आली आहे असे या जाहीरनाम्यात म्हटले होते.

सोव्हिएट प्रतिनिधींची बैठक संध्याकाळी पुढे सुरू होताच या बैठकीपुढे लेनिनचे भाषण झाले. तो म्हणाला, ‘ आता आपल्याला नवे सरकार स्थापन करायचे आहे. लेनिनची ही घोषणा ऐकताच बैठकीमध्ये नव्या सरकारबाबत चर्चा सुरू झाली. सरकारी यंत्रणेत स्वतःला गुंतवून घ्यायला प्रारंभी लेनिनचा विरोध होता. पक्षाच्या मध्यवर्ती समितीची सूत्रे आपण सांभाळू असे त्याने सांगितले. परंतु नव्या सरकारचे नेतृत्व लेनिननेच केले पाहिजे असे या बठकीत अनेकांनी सांगितल्यानंतर लेनिनने सत्तास्वीकार करण्यास मंजुरी दिली.

त्यानंतर नव्या सरकारच्या सदस्यांना काय संबोधावे या संबंधी विचारविनिमय सुरू झाला. लेनिन म्हणाला, ‘ मिनिस्टर हा शब्द मला मुळीच आवडत नाही. ’

‘ आपण या सदस्यांना कोमिसार म्हणावं. जनतेचे कोमिसार,’ ट्रॉटस्कीने सूचना केली.

‘ ठीक आहे, ’ लेनिन उत्तरला, ‘ जनतेचे कोमिसार हे नाव मला पसंत आहे. बरं, आपल्या सरकारचं नाव काय ठेवायचं ? ’

ट्रॉटस्की लगेच म्हणाला, ‘ सोव्हिएट ऑफ पीपल्स कोमिसार्स. ’

‘ वा, छान ! क्रांतीला अन्वर्थक असंच हे नाव आहे, ’ लेनिनने शिक्कामोर्तब केले.

८ नोव्हेंबर १९१७ रोजी पहिले बोल्शेव्हिक सरकार जाहीर करण्यात आले. घटना समिती अस्तित्वात येईपर्यंत या सरकारकडे रशियाची सर्व सूत्रे राहतील असे घोषणेत म्हटले होते. बोल्शेव्हिक सरकारचे नेतृत्व ओघानेच लेनिनकडे आले. लेनिनने स्वतःला प्रधानमंत्री म्हणवून न घेता, प्रेसिडेंट ऑफ दि सोव्हिएट ऑफ पीपल्स कोमिसार्स’ हा किताब धारण केला. त्यानंतर ‘ पीपल्स कोमिसार्स ’ व त्यांची खाती निश्चित करण्यात आली. लेनिनचे पहिले मंत्रिमंडळ पुढीलप्रमाणे होते—

परराष्ट्रमंत्री — ट्रॉटस्की
अर्थमंत्री — स्टेपनोव्ह

गृहमंत्री – रिकॉव्ह
शेतीमंत्री – मिल्युटिन
मजूरमंत्री – श्लियापनिकोव्ह
व्यापार–उद्योगमंत्री – नोगिन
संरक्षणमंत्री – अँटोनोव्ह–ओसेयेन्को, क्रायलेन्को, डायबेन्को
शिक्षणमंत्री – लुनाखरस्की
न्यायमंत्री – लोमोव्ह
पुरवठामंत्री – टेडोरोव्हिच
दळणवळणमंत्री – ग्लेबोव्ह
अल्पसंख्याकमंत्री – स्टॅलिन

हे मंत्रिमंडळ जरी पंधरा जणांचे असले तरी खरी सत्ता लेनिन आणि ट्रॉटस्की या दोघांच्याच हातांत राहणार आहे हे इतर सर्व मंत्र्यांना ठाऊक होते. आपण केवळ नामधारी मंत्री आहोत ही गोष्ट ते स्वतःच्या मनाशी समजून होते. त्यातही सर्वांत कमी महत्त्व होते ते स्टॅलिनला.

बोल्शेव्हिक सरकार तर प्रस्थापित केले, पण लोक आपली सत्ता मानतील की नाही यासंबंधी लेनिन आणि ट्रॉटस्की साशंकच होते. अजूनही लोकांचा आपल्यावर म्हणावा तसा विश्वास बसलेला नाही या वस्तुस्थितीचे त्या दोघांना भान होते.

बोल्शेव्हिकांचे एकपक्षीय सरकार प्रस्थापित झाल्याचे कळताच रेल्वे–कामगार व टपाल–तार खात्यातील कामगारांनी संप पुकारला. इतरही बऱ्याच सरकारी नोकरांनी या संपाला आपला पाठिंबा असल्याचे जाहीर केले. या सर्व प्रकारामुळे पेट्रोग्राडमधील नागरी जीवन पार विसकटून गेले होते. परिस्थितीचा नेमका अंदाज कोणालाच येत नव्हता.

केरेन्स्कीला पेट्रोग्राडबाहेर हुसकावून लावण्यात यशस्वी ठरलेल्या लेनिन–ट्रॉटस्कीला अद्याप लोकांची मने आपलीशी करता आलेली नव्हती. आता त्यांना तीच लढाई खेळायची होती.

नव्या बोल्शेव्हिक राजवटीने हुकूम काढण्याचे सत्रच सुरू केले. सर्व सरकारी नोकरांनी ताबडतोब कामावर रुजू व्हावे आणि व्यापाऱ्यांनी दुकाने उघडून नित्याचे व्यवहार सुरू करावेत असे पहिल्या हुकमात म्हटले होते तर दुसरा एक हुकूम काढून बोल्शेव्हिकांना विरोध करणारी सारी वृत्तपत्रे बंद करण्यात आली.

बोल्शेव्हिक राजवटीची ही वाटचाल जाणवू लागल्यानंतर लेनिन विरुद्ध केरेन्स्की या संघर्षात अंतिम विजय कोणाचा होतो याकडे लोक उत्सुकतेने पाहू लागले. केरेन्स्की जनरल क्रॅसनोव्हच्या मदतीने पेट्रोग्राडकडे यायला निघाला होता. केरेन्स्की–विरुद्धचा सामना आपण हमखास जिंकूच असा खुद्द लेनिन व ट्रॉटस्की यांनाही विश्वास वाटत नव्हता. पेट्रोग्राडमधील सैन्य आपल्या बाजूने कितपत उभे राहील

याची खात्री नसल्यामुळे फिनलंडमधील लष्कराला व बाल्टिक समुद्रातील नौदलाला आपल्या मदतीसाठी बोलावण्याची लेनिनची धडपड सुरू झाली. हेल्सिंगफोर्स सोव्हिएटचा अध्यक्ष शीनमन याला लेनिनने फोन केला—

लेनिन : फिनलंडमधील लष्कर आणि नौदल तुझं ऐकेल ना ?

शीनमन : होय.

लेनिन : मग तू ते लष्कर व नौदल ताबडतोब पेट्रोग्राडच्या संरक्षणासाठी धाडू शकशील काय ?

शीनमन : नौदलाबाबत त्या दलाच्या प्रमुखाशी बोलणं केलं पाहिजे. बरं, पेट्रोग्राडमधील परिस्थिती आता कशी काय आहे ?

लेनिन : केरेन्स्कीच्या फौजा पेट्रोग्राडच्या रोखाने निघाल्या असून त्यांनी गारचिना जिंकून घेतलं आहे. पेट्रोग्राडमधलं लष्कर थकलं असल्यामुळं आम्हांला ताज्या दमाच्या लष्कराची जरुरी आहे !

शीनमन : बरं, आणखी काय बातमी आहे ?

लेनिन : आणखी काय बातमी आहे असं विचारण्याऐवजी 'चला, मी तुमच्या मदतीला येतो' असं तू म्हणणील अशी माझी अपेक्षा होती.

शीनमन : ते पुनः पुन्हा सांगण्याची जरुरी आहे का ? तुम्हांला मदत धाडण्याचा आमचा निर्णय झाला असून त्यानुसारच सारं काही घडेल.

लेनिन : तुमच्याजवळ रायफली आणि मशीनगन्स किती आहेत ?

शीनमन : मला ते नेमकं माहीत नाही. मी लष्करी समितीचा अध्यक्ष मिखाईलेव्ह याला फोन देतो. फिनलंडमध्ये नेमकं किती सैन्य आहे हे तोच बरोबर सांगू शकेल.

मिखाईलेव्ह : तुम्हांला किती रायफली हव्या आहेत ?

लेनिन : आम्हांला जितकी मदत मिळेल तितकी हवीच आहे. मात्र सैनिक हुशार आणि विश्वासार्ह असले पाहिजेत. तुझ्यापाशी एकंदर किती सैन्य आहे ?

मिखाईलेव्ह : जवळ जवळ पाच हजार. ते सर्व मी एकदम धाडू शकेन आणि आमचं हे सैन्य लढेलही चांगलं.

लेनिन : हे सैन्य इथं किती तासांत येऊन पोचेल ?

मिखाईलेव्ह : उशीरात उशीरा चोवीस तासांत.

लेनिन : पायी ?

मिखाईलेव्ह : नाही. रेल्वेने.

लेनिन : या सैनिकांच्या अन्नधान्याची व्यवस्था करणे तुम्हाला शक्य होईल काय ?

मिखाईलेव्ह : हो. इथं आमच्याजवळ भरपूर धान्य आहे. आमच्याजवळच्या पंचवीस मशीनगन्सही धाडून देतो.

लेनिन : हे सैन्य तू ताबडतोब पेट्रोग्राडला धाडून दे असे सोव्हिएट सरकारच्या

वतीने मी तुला आवाहन करतो. पेट्रोग्राडमध्ये आपलं सरकार प्रस्थापित झाल्याचं तुमच्या लोकांना कळलं आहे ना? या राजवटीविषयी लोकांचं काय मत आहे?

मिखाईलेव्ह : नव्या सरकारसंबंधी वर्तमानपत्रांत जेवढं काही प्रसिद्ध झालं आहे तेवढंच आम्हांला कळलं आहे. रशियाची सत्ता सोव्हिएट सरकारकडे आली याबद्दल इथले लोक खूष आहेत.

लेनिन : तुमचं सैन्य ताबडतोब हेल्सिंगफोर्सहून रवाना होईल असं मी धरून चालतो.

मिखाईलेव्ह : अवश्य. मी आताच सैन्य रवाना करतो. त्याच्याबरोबर अन्नधान्य आणि दारूगोळा यांचा भरपूर साठाही असेल.

लेनिनने फिनलंडहून तातडीने सैन्य मागविले होते ते केवळ केरेन्स्कीशी मुकाबला करण्यासाठीच नव्हे. पेट्रोग्राडमध्ये सोव्हिएट सरकारविरुद्ध उठाव झाला तर तोही आपल्याला मोडून काढता यावा हाही मदत मागविण्यामागचा आणखी एक महत्त्वाचा उद्देश होता.

**लेनिन आणि ट्रॉटस्की यांच्या दृष्टीने गंभीर कालखंड सुरू झालेला होता. कामगारांनी क्रांती करून पेट्रोग्राड ताब्यात घेतले होते, अशी त्या वेळी मुळीच वस्तुस्थिती नव्हती. लेनिन आणि ट्रॉटस्की या दोघा क्रांतिकारकांनी आपल्या असीम निष्ठेच्या बळावर हा उठाव घडवून आणला होता. पेट्रोग्राडमधले लष्कर आणि लष्करी क्रांतिकारक समितीचे लालरक्षक त्या दोघांच्या बाजूने उभे राहिले म्हणून त्यांना या उठावात यश आले होते. त्यामुळे लोक आपल्याविरुद्ध प्रति-उठाव करतील की काय अशी लेनिन व ट्रॉटस्की यांना धास्ती वाटत होती. एखाद्या सेनानीने आपल्या हाताखालच्या सैनिकांच्या सामर्थ्यावर प्रस्थापित राजवट उलथून पाडून सत्ता आपल्या हातात घ्यावी असाच काहीसा हा प्रकार होता. सेनानीच्या उठावामागे केवळ वैयक्तिक महत्त्वाकांक्षेची प्रेरणा उभी असते–तर लेनिन आणि ट्रॉटस्की यांच्या या उठावाला दलितोद्धाराच्या ध्येयवादाची सोनकिनार लाभलेली होती हे मात्र मान्य करावयास हवे. उठावाच्या प्रारंभी आपल्याशी निष्ठा बाळगणारे सैन्य आपली सत्ता स्थिर होईपर्यंत आपल्याशी प्रामाणिक राहील काय अशी सेनानीला सदैव चिंता वाटत असते. तद्वतच ८ नोव्हेंबरच्या रात्री बोलशेव्हिक राजवटीची घोषणा केल्यानंतर पेट्रोग्राडमधील नागरिकांच्या उठावाच्या कल्पनेने लेनिन आणि ट्रॉटस्की यांना अस्वस्थ केले होते. आणि म्हणूनच ते दोघे फिनलंडहून येणाऱ्या सैन्याची प्रतीक्षा करीत होते.**

पेट्रोग्राडच्या नैर्ऋत्येला अवघ्या वीस मैलांवर असलेल्या गारचिनापर्यंत येऊन पोचल्यानंतर क्रॅसनोव्हचे घोडदळ घेऊन आपण लवकरच पेट्रोग्राडवर हल्ला करणार असल्याचे केरेन्स्कीने जाहीर केले. परंतु क्रॅसनोव्हचे घोडदळ आता लढाईला कंटाळले होते. इकडे पेट्रोग्राडमधील सेनेचा लेनिनलाही भरंवसा वाटत नव्हता.

स्वित्झर्लंडमधील वास्तव्यात लेनिनने थोडासा क्लॉझविट्झ वाचला होता. त्या व्यतिरिक्त लष्करी हालचालींची त्याला काहीही माहिती नव्हती. परंतु बिकट परिस्थितीमुळे गांगरून जाणे लेनिनच्या रक्तातच नव्हते. जसा जमेल तसा केरेन्स्कीशी लढा दिलाच पाहिजे या निर्धाराने तो उभा राहिला.

पेट्रोग्राडमधील लष्कराने केरेन्स्कीला तोंड देण्यासाठी गारचिनाच्या रोखाने जावे असा लेनिनने हुकूम दिला. परंतु लष्कर पेट्रोग्राड सोडायला तयार होईना. आमची इथेच गरज आहे, अशी सबब सांगून ते बाहेर पडण्याचे टाळू लागले. ७ नोव्हेंबरला याच लष्कराने पोडव्होइस्की, अँटोनोव्ह-ओसेयेन्को, क्रायलेन्को प्रभृतींचे आदेश मानले होते आणि आता अवघ्या दोन दिवसांच्या आतच हे लष्कर यांपैकी कोणालाही मानावयास तयार नव्हते. ही बदललेली परिस्थिती लेनिनच्या कानांवर घालण्यासाठी पोडव्होइस्की निराश मन:स्थितीत स्मोल्नीमध्ये आला.

या वेळी लेनिनशी आपले जे संभाषण झाले त्याची पोडव्होइस्कीने पुढील शब्दांत नोंद केली आहे–' एकही सैनिक पेट्रोग्राड सोडायला तयार नाही, हे मी लेनिनला घाईघाईने जाऊन सांगितले. '

लेनिन आवाज चढवीत मला म्हणाला, ' काहीही करून पेट्रोग्राड सोडायला लष्कराला तू तयार करायला हवंस. अगदी आत्ताच्या आत्ता. काय वाटेल ते होवो, आपलं सैन्य लढाईसाठी बाहेर पडलंच पाहिजे. '

मी सांगितलं, ' मीच काय पण क्रायलेन्कोनंदेखील खूप प्रयत्न केला. पण त्याचंही कुणी ऐकत नाही. आपल्याला आता काहीही करता येण्यासारखं नाही. '

माझे हे उद्गार ऐकताच लेनिन अतिशय संतापला. त्याचा चेहरा पार बदलून गेला होता. माझ्यावर डोळे रोखीत तो म्हणाला, ' सैनिक जर ताबडतोब शहराबाहेर पडले नाही तर मी तुला जबाबदार धरीन. मी काय म्हणतो ते समजलास ना? '

मी वेगाने लेनिनच्या कचेरीतून बाहेर पडलो आणि व्होलिनियन रेजिमेंटच्या बराकीत जाऊन दाखल झालो. मी सैनिकांना बाहेर बोलावून घेतले आणि त्यांना अखेरचे कळकळीचे आवाहन केले. माझ्या शब्दांत त्या वेळी काय जादू निर्माण झाली होती कुणास ठाऊक ! पण सैनिक मुकाट्याने उभे राहिले आणि पेट्रोग्राडबाहेर पडण्याची तयारी करू लागले. यानंतर इतर रेजिमेंटसही केरेन्स्कीवर हल्ला चढविण्यासाठी तयार होऊ लागल्या. '

संध्याकाळी मुसळधार पाऊस पडत असतानाही स्वत: लेनिन लष्करी कचेरीत गेला. अँटोनोव्ह,–ओसेयेन्को, पोडव्होइस्की आणि मेखोनोशिन लढाईचा नकाशा समोर घेऊन हल्ला कसा करायचा याची चर्चा करीत बसले होते. पोडव्होइस्कीने लेनिनला विचारले, ' तुमचा आमच्यावर विश्वास दिसत नाही. '

लेनिन उत्तरला, ' इथं विश्वास-गैरविश्वासाचा प्रश्नच उद्भवत नाही. पेट्रोग्राडच्या संरक्षणासाठी आपले लष्कर-प्रमुख काय करीत आहेत हे जाणून घेणे

शेतकरी-कामगारांच्या सरकारचे कर्तव्यच आहे.'

या प्रसंगाच्या संदर्भात पोडव्होइस्की लिहितो–'दलित जनतेच्या हुकूमशाहीचे सामर्थ्य मला या प्रसंगाने चांगलेच जाणवले.'

लेनिनने तेथे हजर असलेल्या पोडव्होइस्की प्रभृति लष्कर-प्रमुखांना लष्करी हालचालीसंबंधी प्रश्न विचारण्यास प्रारंभ केला. अँटोनोव्ह-ओसेयेन्को तर पूर्वी लष्करात अधिकारी होता. परंतु त्याच्या उत्तरानीही लेनिनचे समाधान होत नव्हते. एखाद्या लष्करी तज्ज्ञाच्या थाटात तो अँटोनोव्ह-ओसेयेन्कोवर प्रश्नांची सरबत्ती करीत होता–'अमक्या ठिकाणी मोर्चे का उभारले नाहीत? रेल्वे स्टेशनचे लष्करी महत्त्व तुमच्या ध्यानात आले आहे की नाही? क्रोन्सटाड्ट व हेल्सिंगफोर्स येथून मदत आली की नाही? लोहमार्गाच्या संरक्षणासाठी काय केलं आहे? लाल सैन्याजवळ पुरेशी रसद आहे का? पेट्रोग्राड-मॉस्को लोहमार्ग शत्रूने तोडू नये म्हणून तुम्ही काही उपाययोजना केली आहे की नाही? तोफखाना कुठं आहे? आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे या चढाईचा सेनानी कोण आहे?

'मी'–अँटोनोव्ह-ओसेयेन्को उत्तरला.

'पोडव्होइस्कीने ही जबाबदारी पत्करावी अशी माझी इच्छा आहे,' लेनिनने सांगितले.

लेनिन केवळ एवढी व्यवस्था करूनच थांबला नाही. लष्करी कचेरी स्मोल्नीमध्ये हलविण्याचा त्याने हुकूम दिला. सर्व लष्करी हालचाली आपल्या सूचनेनुसारच झाल्या स्पाहिजेत अशी त्याने सर्वांना सक्त ताकीद दिली. केरेन्स्कीचा पराभव होईपर्यंत आपल्याला स्वस्थ बसून चालणार नाही हे ओळखूनच लेनिनने या हल्ल्याची सूत्रे वत:कडे घेतली.

हेल्सिगफोर्सहून सैन्य येताच लेनिनने ते गारचिनाकडे रवाना झाले. कामगारांना बंदुका देऊन त्यांचीही आघाडीवर रवानगी करण्यात आली. जे प्रत्यक्ष बंदूक चालवू शकत नव्हते त्यांच्या हातात फावडी देऊन खंदक खणण्याचे काम त्यांना सांगण्यात आले.

१२ नोव्हेंबरचा दिवस उजाडला. केरेन्स्कीबरोबरच्या लढाईला आज दुपारी निर्णायक तोंड फुटण्याचा संभव असल्यामुळे सकाळपासून लेनिन लष्करी कचेरीत बसून होता. तो तेथून सर्वांना हुकूम सोडत होता. कारखान्यांना फोनवरून लेनिनने कामगारांकरवी दारूगोळा आणि तोफा आघाडीकडे पाठविण्याची व्यवस्था केली. हाताशी असलेली प्रत्येक व्यक्ती आणि प्रत्येक वस्तू या लढाईसाठी वापरण्याची त्याची पराकाष्ठा सुरू होती. अशा वेळी कोणीही प्रश्न विचारले तर ते त्याला आवडत नव्हते. लेनिनच्या या वर्तनाला कंटाळून पोडव्होइस्की म्हणाला, 'आपण स्वत: सारे करीत आहात, मग ते नामधारी सेनापतिपद तरी मी कशाला सांभाळू?'

लेनिन अगोदरच खवळलेला होता. त्यात पोडव्होइस्कीचे हे वाक्य ऐकताच तो

ओरडला, ' खबरदार ! एक शब्द बोलू नकोस. मी तुला पक्ष-न्यायालयापुढे उभं करीन आणि नंतर गोळी घालून ठार करीन. आता मी सांगेन तेवढंच ऐकायचं. उगाच मला त्रास देऊ नकोस. '

केरेन्स्कीचा पराभव करण्यासाठी लेनिन आघाडीवरची व्यवस्था करण्यात गुंतला असताना ट्रॉटस्की पेट्रोग्राडच्या संरक्षणाची तयारी करण्यात गढून गेला होता. प्रत्येक कारखान्यात जाऊन तो कामगारांना शहराच्या संरक्षणासाठी सिद्ध राहण्याचा आदेश देत होता. या वेळी काही सैनिकांनी उठाव करून लेनिन-ट्रॉटस्कींची सत्ता उलथून पाडण्याचा प्रयत्न करून पाहिला. परंतु ट्रॉटस्कीने त्या उठावाचा लागलीच बीमोड केला. त्यामुळे पेट्रोग्राडमध्ये सोव्हिएट राजवटीविरुद्ध पुन्हा उठाव होण्याचा संभव पूर्णपणे नाहीसा झाला होता. पेट्रोग्राड सोव्हिएटमध्ये जाऊन ट्रॉटस्की प्रत्येकाला सांगत होता, ' आता तुम्ही इथं क्षणभरही थांबू नका. सगळेजण आघाडी-वर जा. '

कोण्या एका खट्याळ गृहस्थाने विचारले. ' मग महाशय, आपण अद्याप इथं कसे आहात ?'

ट्रॉटस्कीच्या नसानसांतून क्रांतिकारकाचे रक्त वाहत होते. गंभीरपणाने त्याने त्या पृच्छकाला सांगितले, ' हा बघ मी निघालोच. ' आणि खरोखरच ट्रॉटस्की आघाडीवर जाण्यासाठी तेथून बाहेर पडला.

९ नोव्हेंबरपासून गेल्या चार दिवसांत लेनिन आणि ट्रॉटस्की यांची अहोरात्र धावपळ चालली होती. केरेन्स्कीशी अखेरची झुंज घेण्यासाठी ते दोघे अक्षरशः जिवाचे रान करीत होते.

पेट्रोग्राडच्या वेशीवरील पुल्कोव्हो या गावापर्यंत येऊन पोचलेल्या क्रॅसनोव्हच्या घोडदळावर लेनिन-ट्रॉटस्कीच्या सेनेचे जोरदार हल्ला चढविला. या हल्ल्यापुढे क्रॅसनोव्ह टिकाव धरू शकला नाही. 'तुम्ही जर शस्त्रं खाली ठेवून डॉन नदीच्या पलीकडे गेलात तर आम्ही तुम्हांला शिक्षा करणार नाही ' असे डायबेन्कोने आश्वासन दिल्यानंतर क्रॅसनोव्हच्या घोडदळाला केरेन्स्कीची बाजू घेऊन लढण्याचे कारणच उरलेले नव्हते. डायबेन्कोने घोडदळाच्या प्रमुखाकडून शरणागतीच्या कागदावर सही घेतली. मध्यरात्रीच्या सुमारास ट्रॉटस्की तेथे येऊन पोचला होता. केरेन्स्कीचे पाठीराखे शरण आल्याचे पाहून ट्रॉटस्की हरखून गेला. त्याने ही सारी घटना कागदावर लिहून काढून तो कागद खास दूताकरवी स्मोल्नीला धाडून दिला.

ट्रॉटस्की लिहितो—

पुल्कोव्हो, रात्री २–१० वाजता.

१२ नोव्हेंबरची ही रात्र ऐतिहासिक महत्त्वाची ठरली आहे. पेट्रोग्राड ताब्यात घेण्याचा केरेन्स्कीचा प्रयत्न संपूर्ण अयशस्वी ठरला आहे. सर्व सत्ता सोव्हिएट सरकारच्या हाती आली आहे, याची आता साऱ्या देशाला खात्री पटेल. आमची

सत्ता ही आता अपरिवर्तनीय वस्तुस्थिती झाली आहे. आता देश पुन्हा भूतकाळाकडे जाणार नाही. आमच्या मार्गातील अडचणी, संघर्ष आणि कष्ट संपले आहेत असे नव्हे; परंतु आता आमचा मार्ग मोकळा झाला असून विजय आमचाच आहे हेही आता निश्चित झाले आहे.

परंतु अद्यापही मार्ग मोकळा झालेला नव्हता.

बोल्शेव्हिक राजवट आता उलथून पडत नाही हे मान्य करावयास काही जणांची अद्यापही तयारी नव्हती. या संशयात्म्यांना वठणीवर आणण्यासाठी लेनिनने दडपशाहीचे हत्यार उपसले. कोठेही विरोध दिसला की त्याच्या खरेखोटेपणाची शहानिशा न करता तो विरोध मुळासकट उपटून टाकण्यासाठी कोणतेही क्रूरकर्म करावयास अनमान करायचे नाही असा आता लेनिनचा निश्चयच झाला होता. त्याला तडजोड माहीत नव्हती. आपल्याला विरोध करणारा क्रांतीचा शत्रू आहे असे मानून विरोधकांना चेचून काढायला त्याने प्रारंभ केला.

त्याच्या या दहशतवादामुळेच अंतर्गत यादवी अपरिहार्य ठरणार होती.

८ नोव्हेंबरला बोल्शेव्हिक राजवट प्रस्थापित झाली. ९ पासून १२ नोव्हेंबरपर्यंत केरेन्स्कीचा पराभव करण्यात लेनिनचे चार दिवस खर्ची पडले. आता यापुढे देशातला उरलासुरला विरोध नष्ट करून आपली एकतंत्री राजवट स्थिर पायावर उभी करण्याचा लेनिनला प्रयत्न करावयाचा होता आणि त्यासाठीच त्याने दहशतवादाचे सत्र सुरू केले.

लेनिनच्या या दहशतवादाविरुद्ध पहिला आवाज उठविला तो मॅक्झिम गॉर्कीने.

सारा रशिया रक्तमय करण्यावाचून बोल्शेव्हिक क्रांतीमागे दुसरे कोणतेच उद्दिष्ट नाही असे तो उघडपणे सांगू लागला. आपल्या 'नोव्हाया झिझ्न' या पत्राच्या २१ नोव्हेंबरच्या अंकात गॉर्की लिहितो– 'विवेकशून्य माथेफिरू आणि कोणत्याही मूल्यांची चाड करणारे साहसवादी, क्रांतीच्या तत्त्वाखाली अराजक निर्माण करण्याच्या उद्योगाला लागले असून या मार्गाने जाणारा लेनिन आणि त्याचे हस्तक कोणताही गुन्हा करण्याला आपल्याला परवाना मिळालेला आहे अशा थाटात हिंडत आहेत. पेट्रोग्राडमधील कत्तली, मॉस्कोमधील विध्वंस, मतस्वातंत्र्याची गळचेपी, बेगुमान धरपकडी अशी अमानुष कृत्ये करून लेनिन, प्लेव्ह आणि स्टोलिपिन यांचा वारसा चालवीत आहे. बहुसंख्य कामगारांचा पाठिंबा मिळविण्यात लेनिन यशस्वी झाला आहे, ही गोष्ट खरी आहे. परंतु कामगारवर्गाला आपलेसे करण्यासाठी लेनिनने जी भरमसाट आश्वासने दिली आहेत ती कृतीत येणे अशक्य आहे हे कामगारांना लवकरच कळून येईल. बाकुनिन आणि नचॅयेव्ह यांच्या शिकवणुकीने लेनिन भारावून गेला आहे. कामगारांचे रक्त सांडून तो आपले प्रयोग करीत आहे. परंतु लेनिन काही तरी चमत्कार करून दाखवील या भ्रमात कोणीही राहू नये. उलट त्याच्या सध्याच्या प्रयत्नांतून उपासमार, बेकारी आणि रक्तमय अराजक

यांचेच फलित हाती येईल. लेनिन हा कोणी सर्वसमर्थ नियंता नसून नजरबंदीचे प्रयोग करणारा तो चतुर जादूगार आहे असेच मी मानतो. दलितांच्या प्राणांविषयी वा प्रतिष्ठेविषयी त्याला कोणतेही ममत्व वाटत नाही. लेनिन आणि त्याचे साथीदार जे बेजबाबदार, अर्थशून्य आणि रक्तलांच्छित गुन्हे करीत आहेत त्यांचे पाप कामगारांनी आपल्या माथी घेऊ नये. कारण अखेरीस या गुन्ह्यांचा जाब कामगारांना द्यावा लागणार आहे, लेनिनला नव्हे.'

गॉर्की कोणत्याच पक्षाचा नसल्यामुळे व त्याच्यासंबंधी रशियात आदरभाव असल्यामुळे बोल्शेव्हिक त्याचा आवाज बंद पाडू शकले नाहीत. हा पहिला लेख प्रसिद्ध झाल्यावर दोनच दिवसांनी गॉर्कीने ' नोव्हाया झिझ्न 'मध्ये ' कामगारवर्गाला उद्देशून ' या शीर्षकाखाली आणखी एक लेख लिहिला.

गॉर्की म्हणतो–' लेनिनचे आत्मबल अनन्यसाधारण आहे. समाजवादाच्या विजयासाठी गेली पंचवीस वर्षे तो अव्याहत झुंज घेत आहे. नेतृत्वासाठी आवश्यक असणारे सारे गुण त्याच्यापाशी आहेत. पुढाऱ्याने नीति-अनीतीची चाड बाळगावयाची नसते. लेनिन या कलेत निष्णात आहे. शिवाय एकाद्या अमीर-उमरावाप्रमाणे सर्वसामान्य जनतेविषयी त्याच्या मनात एक प्रकारचा तिरस्कारही आहे.

' लेनिन कितीही हुशार असला तरी जीवनाच्या सर्वांगीण स्वरूपाचे त्याला ज्ञान नाही. आपण जिला जनता समजतो ती नेमकी कशी आहे हेही त्याला माहीत नाही. तो जनतेशी कधीच समरस झालेला नाही. क्रांतीसाठी जनतेला कसे प्रक्षुब्ध करावयाचे असते याचे ज्ञान त्याने पुस्तके वाचून मिळविलेले आहे! एखादा शास्त्रज्ञ ज्या प्रमाणे मातीवर प्रयोग करीत असतो, त्या प्रमाणे लेनिन आपल्या प्रयोगाचे साधन म्हणून जनतेला राबवीत आहे.'

'नोव्हाया झिझ्न ' चे प्रकाशन बंद पाडले जाईपर्यंत गॉर्की लेनिनच्या दहशतवादावर निर्भय टीका करीत होता. तो केवळ आपल्या एकट्याचेच मत व्यक्त करीत होता असे नव्हे. सत्ता हाती आल्यापासून लेनिन आणि ट्रॉटस्की यांनी जे राजकीय दहशतवादाचे सत्र आरंभिले होते ते पाहून त्यांचे सहकारीही थक्क झाले. होते. आपल्या कार्यक्रमाला ज्यांचा विरोध आहे त्यांना बडतर्फ करून लेनिनने प्रशासन यंत्रणेचे ' शुद्धिकरण ' सुरू केले. आपले आदेश मुकाट्याने पाळणारे कणखर लोक तो शोधत होता. बोल्शेव्हिक राजवट हळूहळू रशियाभोवती आपली पोलादी पकड निर्माण करू लागली.

लेनिनने आपली प्रतिज्ञा पुरी केली. त्याने इतिहासाला का धक्का दिला होता

## पूर्वार्ध समाप्त

# भिंतीच्या वेंबड्या

सुधाकर राजे

## □ फॅशनेबल हम्मा

काही फॅशनेबल पाश्चिमात्त्य स्त्रिया फॅशन म्हणून गळ्यात कुत्र्याचा पट्टा अडकवू लागल्याचे मागे वाचले तेव्हा कुत्र्याचे जिणे धन्य झाले असे वाटले होते. आता ही फॅशन कुत्र्या–मांजरापासून प्रवास करीत करीत गाई–म्हशीपर्यंत येऊन पोचलेली दिसते. कारण राजस्थानच्या वित्त मंत्र्यांनी एका भाषणात नुकतीच अशी माहिती दिली की, आपल्याकडे गाईंच्या गळ्यात अडकविण्यात येणाऱ्या छोटया छोटया घंटा पाश्चिमात्त्य बायका फॅशन म्हणून स्वतःच्या गळ्यात घालू लागल्या आहेत. घ्या ! प्राचीन–अर्वाचीनचा असा अगदी गोरज–मुहूर्तावर संयोग झालेला इतरत्र कोठे पाहायला मिळेल ? आता गाईच्या गळ्यांतल्या घंटा चपलाहार म्हणून वापरता येतात तर बकरीच्या गळ्यातल्या घुंगरांची मोहनमाळ व्हायला काय हरकत आहे ? काही काही कुंभार तर आपल्या गाढवांच्या गळ्यातही मोठया मोठया मण्यांच्या माळा बांधतात, तेव्हा त्या मण्यांची माहिती आपण पाश्चिमात्त्य स्त्रियांना पटवली तर त्यात बिलकुल गाढवपणा होणार नाही.

## □ नकली दाती तृण

स्टॅलिन–कन्या स्वेटलाना अमेरिकेच्या आश्रयाला गेली. तेव्हा अनेक अमेरिकन पुरुषांनी तिला लग्नाची मागणी घातली. त्यात एकाने विचारले आहे. "तुमचे दात खरे आहेत की खोटे ?" आता खायचे दात एक अन् दाखवायचे वेगळे असा प्रकार स्वेटलानाने केला आहे की काय याची कल्पना नाही, पण त्याचा वैवाहिक सुखाशी संबंध काय ? खरे म्हणजे एकदा लग्न झाले की पुरुषच दाती तृण धरून शरण जातो, तेव्हा त्याचेच दात तृण धरण्याइतके मजबूत आहेत की नाहीत हे पाहिले पाहिजे म्हणजे झाले. त्यातूनही वधूची चौकशी करायचीच असेल तर खोटे दात असल्यास ते सोन्याचे आहेत की नाहीत, याची खात्री करावी, म्हणजे कन्यादान सालंकृत आहे की नाही याची खातरजमा करता येईल. ते काही असले तरी दात पाहून लग्न करायची कल्पना आपल्याकडे पसरली तर टूथपेस्ट अन् दंतमंजनवाल्यांची चलती व्हायची, आणि मराठी भाषेतील सुरस व चमत्कारिक जाहिरातींनी वर्तमानपत्रांचे रकाने भरून जायचे– "माकडछाप नवरा मिळविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे माकड-छाप काळी टूथ पावडर." "कला आणि गोटया यांच्या

सुखी संसाराचे रहस्य—कोलगेट," "मक्या आणि लिना यांचा प्रेम-विवाह कसा जुळला? अर्थात मॅक्लीन्समुळे." लग्न-मंडपाचा सीन आणि एका बाजूला मुलीचे आई-बाप गहिवरलेल्या स्वरात म्हणत आहेत—" ही सर्व कोलिनसची करामत!"

## ☐ मिशाळ व्यक्तिमत्त्व

कारकुनी पेशाचा अन् ढेकूण-छाप मिशीचा काय परस्पर संबंध असावा याचा मला बरेच दिवस उलगडा झाला नव्हता. पण मिशा आणि मते यांचा जेवढा घनिष्ठ संबंध आहे तेवढाच मिशा आणि मने यांचाही असावा असे दिसते. कारण परवाच अशी बातमी वाचली की, फिलिपाईन्सच्या पोलीस-प्रमुखाने तेथल्या पोलिसांना मिशा ठेवायला बंदी केली आहे, का तर त्यांच्या मते मिशा ठेवणे ही "न्यूनगंडाची उघड उघड खूण" आहे. आता बोला! घरात ढेकूण जेवढ्या निर्दयपणे चिरडला जातो तेवढ्याच निर्दयपणे कारकून हापिसात चिरडला जातो म्हणूनच कारकून आणि ढेकूण-छाप मिशी यांचा समसमासंयोग झाला की नाही? पण हिटलर—स्टॅलिनच्या मिशा आणि त्यांना असलेला जबरदस्त अधिकगंड यांचा कसा मेळ बसवायचा? आणि तानाजी मालुसऱ्याच्या झुबकेदार मिशीत तर म्हणे दोन—दोन लिंबे लपायची, मग तानाजीला कोणता न्यूनगंड होता? हां, आले लक्षात. एवढा शिवाजीचा उजवा हात असूनही त्याला कोंडाण्याच्या आधी रायबाचे लगीन करता येईल असा भरंवसा वाटला नाही हा न्यूनगंड नाही तर काय?

## ☐ मोरारजी स्तोत्र

कोणे एके काळी कवी कविता करीत असत. आता ते जाहिराती लिहितात. परवाच एअर-इंडिया-जाहिरात-खातेविरचित पी—फॉर्म रद्द करण्यासाठी अर्थ-मंत्र्यांची आळवणी करणारे मोरारजी-स्तोत्र वर्तमानपत्रात वाचले. आता स्तवनाने देवदेखील पावतो, तेव्हा मोरारजी पावायला हरकत नाही अशी एअर-इंडियाची काव्यमय कल्पना असल्यास नवल नाही. अर्थात् पी-फॉर्म हा काव्याचा विषय आहे काय असा सवाल उभा करण्याचे धाडस माझ्यासारखा गद्य माणूसदेखील करू शकणार नाही. कारण प्रेयसीच्या गालावर फुललेल्या गुलाबापासून कषाय-पेय-पात्र-मग्न मक्षिकेपर्यंत सगळ्या विषयांवर काव्य झाले आहे, तेव्हा पी-फॉर्मने काय घोडे मारले आहे? उलट आधुनिक काळातल्या आधुनिक काव्याला आधुनिक विषयच हवेत. (—विषयच नसणे ही आधुनिकतेची शेवटची पायरी!) म्हणून एअर-इंडिया-कृत मोरारजी-स्तोत्रापासून काव्याच्या एका नवीन युगाला प्रारंभ होत आहे असे म्हणता येईल. याच्या पुढे पासपोर्टवर श्लोक, फॉरीन एक्स्चेंजवर भावगीत आणि टूरिझम्‌वर महाकाव्य रचले जाणार. टूरिझमवरून आठवण झाली—कालिदासाचे मेघदूत भोजराजाच्या टूरिस्ट डिपार्टमेंटनेच लिहून घेतले असावे असा मला फार संशय येतो. आज कालिदास जिवंत असता तर!—तर एअर-इंडियाच्या जाहिरात-खात्यात त्याला नक्की नोकरी मिळाली असती. ○

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी

सायनाचार्य

दि. ९ ते १५ डिसेंबर १९६७

**मेष :** मकरेचा मंगळ दशमात. अंतरिक्षातील ही ज्वलंत ग्रहस्थिती दोन वर्षांनंतर आताच तुमच्या वाटयास येत आहे. या अनन्यसाधारण योगामुळे तुमच्या कर्तृत्वाला धार चढेल, प्रज्ञा विकसेल, प्रतिभा बहरेल.

या आठवडयापासूनच आपल्या आशा-आकांक्षांची क्षितिजे विस्तारतील. साडेसातीने मरगळलेली मने प्रसन्नतेने टवटवीत बनू लागतील, नव्या आशा अंकुरायला लागतील, तुमचे कर्तृत्व दाही दिशा चौफेर उधळू लागेल.

सांपत्तिक पेचप्रसंग सुटू लागतील, नोकरीधंद्यातील नैराश्य मावळू लागेल. नव्या व्यवसायधंद्यासाठी अनेकांचे हार्दिक सहकार्य मिळू लागेल. तुमच्या प्रगतीचा आलेख उंचावू लागल्याचे दृष्टोत्पत्तीस यायला लागेल.

दि. १३ ते १५ या कालाची नोंद करा.

**वृषभ :** या कालातील गुरु-शुक्र लाभयोग, तुमच्या कित्येक दिवसांच्या व्यथा—विवंचनांवर पडदा टाकील.

मंगळ भाग्यात आल्यापासून तर तुम्हांला सर्वत्र उत्साही व प्रसन्न वातावरण दिसू लागलेले असेल. तुमची प्रगती रोखण्याचे साहस कोणीही करू शकणार नाही.

स्थानांतर-स्थित्यंतर-बदल हेच या वेळचे मुख्य कार्य. प्रगतीच्या मार्गातील

अनेक टप्पे ओलांडून पुढे जाल. आणि औद्योगिक क्षेत्रात नवा विक्रम संपादन कराल. कला-क्रीडा क्षेत्रातील व्यक्तींना याच्याइतका यशस्वी काल यापूर्वी क्वचितच अनुभवण्यास मिळाला असेल.

नजीकच्या भविष्य कालात घडून येण्याच्या भव्य-दिव्य घटना योग्य कालीच अंकुरायला लागतील.

दि. १० ते १३ या काली आपल्या बऱ्याचशा अपेक्षा सफल होतील.

**मिथुन :** सध्या आपणांस आठवा मंगळ आहे. पण त्यामुळे सारेच मुसळ केरात असं वाटून घेऊ नका. गुरू-सूर्य-शुक्र अनक समर्थ ग्रह तुमच्या पाठीशी उभे आहेत. ते तुमचा अपेक्षाभंग होऊ देणार नाहीत. निर्धार-निष्ठेचे व्रत पाळणाऱ्यांना तर कोणत्याही अनिष्टतेची बाधा होऊ शकत नाही आणि असे विरोधी वातावरण निर्माण झाल्याशिवाय तुमच्यातील सुप्त कर्तृत्वाला उत्थान तरी कसे मिळेल ?

साहित्य, कला, वृत्तपत्रीय व्यवसाय या क्षेत्रातील व्यक्तींना या वेळीच विशेष काही कार्य करून दाखविण्याची संधी लाभेल. आणि त्यामुळे पैसा जरी फारसा मिळाला नाही तरी प्रतिष्ठा अमाप पदरी पडेल. दूरच्या प्रवासाचे शक्यतो टाळा.

दि. १२ ते १५ अनेकांचे सहकार्य लाभेल. कार्ये गती घेऊ लागतील.

**कर्क :** मंगळ अनुकूल नाही याची मुळीच खंत बाळगू नका. दुसरा गुरू, पाचवा सूर्य तुमची सारी अनिष्टता ठोकरून काढायला समर्थ आहेत.

तरीसुद्धा हे दिवस वाटेल तसे स्वैर मनोवृत्तीने वागण्यासारखे नाहीत. कौटुंबिक कटुता, व्यावसायिक संघर्ष, वरिष्ठांची नाराजी इत्यादी प्रकार मधून मधून जाणवतीलही पण म्हणून काही तुमच्या अनिर्बंध प्रगतीला बाध येईल असं काही घडणार नाही. प्रतिष्ठेला तर यत्किंचितही धक्का लागू शकणार नाही.

क्षुल्लक कारणांवरून चिडू नका. वादविवादापासून सदैव चार हात दूरच राहा. आणि भागीदारीच्या व्यवहारात तर साऱ्या गोष्टी डोळ्यांत तेल घालून पाहत राहा. हे दिवस अपयशाचे नाहीत पण सावधानतेचे खासच आहेत,

दि. १३ ते १५ या काली अनेक योजना यशस्वी कराव्यात.

**सिंह :** मंगळ षष्ठात आला आणि आठव्या शनीच्या कृष्णकृत्यांना पायबंद बसला. आता तुम्हांला कुणाचीही डर नाही.

तुमचे घराणेच क्रांतिकारकांचे. जगाला हादरे बसण्यासारखे काही अघटित करावे आणि त्यामुळे सर्वांचे लक्ष्य बनावे या तुमच्या जहाल मनोवृत्तीला सर्वथैव अनुकूल अशी ग्रहस्थिती आताच निर्माण झालेली आहे. या संधीचा तत्परतेने लाभ उठवा.

व्यवसायधंद्याचे स्वरूप बदलेल. आचार विचारांत क्रांती घडून येण्याची प्रसादचिन्हे दिसायला लागतील. विरोधाची, अडीअडचणींची तमा न बाळगता निर्धाराने पुढे पाऊल टाका— अपेक्षेबाहेर यश मिळवाल. तुमच्या राशीतील गुरुला काही तरी आकर्षक, अलौकिक, अभिजात असे करून दाखवण्याची हीच एक संधी आहे.

दि. १२ ते १४ या कालात आपल्या साऱ्या योजना आकार घेऊ लागतील.

**कन्या :** कन्या राशीची माणसे धूर्त, कारस्थानी असतात, असा वृथा गैरसमज अनेकांनी करून घेतलेला आहे. सूर्य-बुध पराक्रमस्थानी आहेत तोपर्यंतच तुम्हांला काही महत्त्वपूर्ण कार्य करून तुमच्यावरील हे आरोप धुऊन काढता येतील.

कित्येक दिवसांनी इतके चांगले ग्रहमान तुमच्या वाट्यास येत आहे. त्याचा फायदा करून घेतलात तर नोकरीधंद्यात, सामाजिक क्षेत्रात तुमची प्रतिष्ठा निश्चि-तच उंचावेल.

सांपत्तिक ताण कमी होईल, कौटुंबिक वातावरण प्रसन्न बनेल, प्रगतीचे मार्ग निर्वेध निष्कंटक बनू लागतील. ग्रहांनी कौल अनुकूल दिलाच आहे. थोडाफार प्रयत्न केलात की, तुम्हांला हवं ते मिळवता येईल.

दि. १४, १५ पासून कालचक्र अनुकूल बनू लागल्याचे दिसू लागले.

**तूळ :** चौथ्या मंगळाचा काल फारसा चांगला असतो असं कुणी म्हणू शकणार नाही. तुम्हांलाही तसा प्रत्यय येणार नाही असं असूनसुद्धा अकरावा गुरू आणि लवकरच येणारा तिसरा सूर्य तुमचं फारसं कुठं नडूही देणार नाहीत. पैसा भरपूर मिळेल, प्रतिष्ठा खूप उंचावेल, नोकरीधंद्यातही तुमचा दबदबा वाढेल. फक्त एकाच गोष्टीची तीव्रतेने उणीव भासेल—ती म्हणजे स्वास्थ्य आणि स्वास्थ्य नसलं की, बाकी सर्व असूनही फुकट आहे.

अशा काली थोडंसं जपून वागण्याशिवाय आपल्या हाती दुसरं काय आहे ? "ठेविले अनंते..." वगैरे साधुसंतांच्या वाक्यांत काही अर्थ आहे हे अशाच वेळी पटते. आरोग्याची काळजी घ्या. फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलू नका.

दि. ११ ते १३ काहीसा अनुकूल काल.

**वृश्चिक :** वर्तमानकाळी सर्वत्र आघाडीवरच दिसू लागतील, वृश्चिक राशींचे लोकच. पराक्रमातील एकटा मंगळ तुमच्या साऱ्या आशाआकांक्षा सफल करील.

या काली स्थानांतराचे, बदली—बढतीचे योग स्पष्टपणे दिसू लागतील. सामान्यांपेक्षा काही वेगळे करून दाखवण्याच्या विचाराने झपाटल्यासारखी तुम्ही माणसे, याच वेळी काही अलौकिक, अनन्यसाधारण कार्य करू शकाल. इतकी चांगली ग्रहस्थिती पुन्हा कित्येक वर्षे तुमच्या वाट्यास येणार नाही. या संधीची दखल घेतलीत तर तुम्ही हवं ते करू शकाल.

स्थावराचा प्रश्न सुटेल, नव्या व्यवसायाचे निश्चित ठरेल, पैसा ही अनेकांच्या सहकार्यामुळे लाभू शकेल.

दि. १२ ते १४ या कालात अपेक्षित घटना घडाव्यात.

**धनू :** शनी मार्गी झाल्याने चौथ्या शनीचा हृदयपालट झाला, आणि अशाच वेळी भाग्यस्थ गुरुने मदतीचा हात पुढे केला. आता तुम्हांला कोणत्याही गोष्टीची चिंता करावी लागणार नाही.

आजवरच्या साऱ्या भंगलेल्या आशा–आकांक्षा आता सांधल्या जातील, वैचारिक संघर्ष मिटतील. साऱ्या स्थगित कार्यांना चालना मिळू लागेल, वरिष्ठांची कृपादृष्टी वळेल, राजकीय क्षेत्रातील गेलेले स्थान पुन्हा लाभेल. स्थावराचा, राहत्या जागेबद्दलचा वाद मिटेल.

या कालापासून प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टिक्षपात यायला लागतील. भाग्यस्थ गुरूचे मांगल्य प्रत्ययास यायला लागेल आत्ताच.

दि. १२ ते १४ या काळी आपल्या कार्यांना गती मिळेल.

**मकर :** तुमच्या राशीतील मंगळाच्या उपस्थितीमुळे अगदी आकाश कोसळून पडेल अशी भ्रामक समजूत करून घेऊ नका. मानसिक शांतता बिघडविणारे काही बारीक सारीक प्रकार घडतील, केव्हा केव्हा प्रकृती नरम गरम बनेल. यापेक्षा विशेष काही घडेल असे दिसत नाही. उलट हाच मंगळ तुमच्या कामाची गती वाढवील, फार मोठ्या जबाबदाऱ्यांचे ओझे लादील. जिवाचे रान करून स्थगित कामे निपटून काढावयास कार्यप्रवृत्त करील.

यांत्रिक–वैज्ञानिक क्षेत्रात नवा इतिहास निर्माण करण्यासारखे भरीव कार्य करण्यास हीच एक वेळ तुम्हांला लाभत आहे. अनेक संपन्न लोकांचे सहकार्य लाभेल. नोकरीधंद्यात पुढे पाऊल पडेल.

दि. १०-१२-१४ या काली आपल्या प्रगतीच्या घटना घडाव्यात.

**कुंभ :** शनी-मंगळांनी तुम्हांला खिंडीत गाठल्यासारखे झाले आहे. त्यांनी निर्माण केलेल्या या चक्रव्यूहातून चातुर्याने कसे निसटून जायचे याचे प्रात्यक्षिकच तुम्हांला जगाला दाखवावे लागेल.

तुम्ही तसे एकाकी नाही. गुरू-राहू तुमच्या पाठाशी खडे आहेत. ते पेचप्रसंग सोडवितील, साऱ्या अडीअडचणी दूर करतील. ऐन वेळी थोरांचे साहाय्य मिळवून देतील.

असे असले तरी या वेळी आपणांस काहीसे जपूनच वागायला हवे. वाढत्या खर्चाला आळा घालायचा शिकस्तीचा प्रयत्न करावा लागेल आणि भागीदारीच्या व्यवहारात सदैव जुळते मिळते घेण्याची प्रवृत्ती ठेवावी लागेल.

दि. १३ ते १५ अनुकूल काल.

**मीन :** साडेसातीच्या उग्र कालातून तुम्ही जात आहात हे मान्य करूनही मी असं म्हणू शकेन की, सध्याचे दिवस तुम्हांला प्रगतीकडे नेणारे आहेत. अनपेक्षित लाभ पदरी टाकणारे आहेत असं मी निश्चित म्हणू शकेन.

अजून महिनाभर तरी मंगळ तुमच्या लाभस्थानी आहे आणि नजीकच्या भविष्यकाळात शुक्रासारखा कलासंपन्न ग्रह तुमच्या भाग्यस्थानी येणार आहे. एवढी ग्रहस्थितीही तुमच्या कार्यात घवघवीत यश द्यायला समर्थ आहे.

साहित्य-नाट्य-कला-क्षेत्रांतील व्यक्तींना ही ग्रहस्थिती म्हणजे वरदानच ठरेल.

दि. १२ ते १५ या काली आपल्या योजना आकार घेऊ लागतील. ○




## दिल्लीची जागतिक कुस्ती स्पर्धा

दिल्ली येथे १२ ते १४ नोव्हेंबरपर्यंत जागतिक फ्री स्टाईल कुस्तीस्पर्धा भरविण्यात आल्या होत्या. त्यात एकूण १२१ कुस्तीगीरांनी भाग घेतला व वजनांच्या निरनिराळ्या आठ विभागात फक्त भारत, बल्गेरिया, इराण, मंगोलिया, तुर्कस्तान, अमेरिका व रशिया संघच तेवढे उतरले. इतर तेरा देशांमधून वरील आठ विभागांत १ (स्वीडन) ते ७ (जपान) पर्यंत स्पर्धकांनी आपले अस्तित्व दर्शविले. भारतातर्फे ज्या आठ कुस्तीगीरांनी भाग घेतला त्यांची नावे पुढीलप्रमाणे : शामराव साबळे (फ्लायवेट), बिशंभर सिंग (बँटमवेट), ओमप्रकाश (फेदरवेट) उदयचंद (लाईटवेट) कर्णधार, हुकुमचंद (वेल्टरवेट), सज्जनसिंग (मिडल्वेट), विश्वनाथ सिंग (लाईट-हेवीवेट) व भीमसिंग (हेवीवेट).

पहिल्या दिवशी पंधरा हजार प्रेक्षकांच्या उपस्थितीत भारताचे पाच कुस्तीगीर पराभूत झाले. साबळेंना रशियाच्या नाझर अल्बेरियन यांनी प्रथम जखमी व नंतर चीत केले. विश्वनाथ सिंग यांच्या बदली ऐनवेळी लढलेले खेडकर स्वित्झर्लंडच्या पीटर जुटझीलर यांच्याकडून ४३ सेकंदांत पराभूत झाले. बल्गेरियाच्या मुस्ताफोव्ह यांनी त्यांना दुसऱ्या फरीत ४ सेकंदांत चीत केले. सज्जनसिंग यांनी पहिल्या फेरीत स्वीडनच्या हूंस ऑटन्स्नवर गुणांनी विजय मिळविला. पण रुमानियाच्या एफ्. बोला यांनी त्यांच्यावर गुणांनीच मात केली. ही त्यांची दुसरी फेरी होती. मंगोलियाच्या एफ्. ऑल्झीसायशन यांनी भीमसिंगना दोन वेळा उचलले नंतर त्यांनी प्रतिकार केला खरा परंतु अंतिम यश त्यांना मिळाले नाही.

ओमप्रकाश यांनी इस्रायलच्या श्लोमो सायर यांना गुणांवर मारून भारताची सुरुवात तर छान केली. पण पुढच्याच फेरीत एम्. बावू (मंगोलिया) यांनी त्यांचा पराभव केला. बिशंभर आणि उदयचंद यांनी पहिल्या दोन लढती जिंकल्या. कोरि-

**मनोहर रेगे**

याच्या चांद होसंग यांचा उदयनी सहज पराभव केला. हुकुमसिंग यांनीही वेल्टर-वेट विभागात कॅरोलि बजके (हंगेरी) व केल्वी (अमेरिका) यांच्यावर गुणांनी विजय मिळविला.

दुसऱ्या दिवशी हुकुमसिंग, भीमसिंग, ओमप्रकाश, आणि सज्जनसिंग चीत झाले. पण बिशंभरसिंग यांनी एस्. बझार (मंगोलिया) यांच्यावर गुणांनी मात केली. तिसऱ्या व अखेरच्या दिवशी लाईटवेट उदयचंद यांचा मुव्हाहिड (इराण) यांनी सरळ सरळ पराभव केला, बँटमवेट विभागात मात्र बिशंभरसिंग यांनी रौप्यचषक पटकाविला. ए. तलेबी (इराण) आणि अलिव्ह (रशिया) यांच्या बरोबरच्या त्यांच्या दोन्ही लढती अनिर्णित राहिल्या. तलेबींवर त्यांनी विजय मिळविला असता तर भारताला एकुलते एक सुवर्णपदक लाभले असते.

तंत्र या दृष्टीने ही सतरावी जागतिक स्पर्धा पुष्कळच यशस्वी झाली. मॅटवरची कुस्ती म्हणजे केवळ नऊ मिनिटांचा शारीरिक आणि बौद्धिक खेळ. कमीतकमी अवधीत प्रतिस्पर्ध्यावर डावपेच रचण्याला गुण ठेवलेले असतात. त्यात कल्पकतेला, अंमलबजावणीला आणि चलाखीने केलेल्या हालचालींना किंमत असते. रशियाने ४१ गुण मिळवून तीन सुवर्णपदके व चार रौप्यपदके खिशात घातली. गेल्या वर्षीचा विजेता संघ तुर्कस्थान सहावा पडला. जपानने दुसरा क्रमांक मिळविला खरा पण त्यांना गुण मिळाले फक्त २२. वीस राष्ट्रांत भारताचा आठवा क्रमांक लागला. तुर्क आणि इराणी कुस्तीगीरांनी कैंची आणि पायांच्या विविध पकडीत असामान्य कौशल्य दाखविले. रशियाने कमरेवरच्या भागावर हल्ला चढवण्यातील प्रभुत्व दर्शविले. जुडोच्या अनुभवी जपानने कल्पकतेत सर्वांना चकित केले.

भारतीय कुस्तीत हळूहळू प्रगती होत आहे. त्या दृष्टीने आजचा पराभव ही उद्याच्या विजयाची पायरी होऊ शकेल. सामर्थ्य आणि ताकदीत भारताने प्रावीण्य दर्शविले. पण त्यांना मुख्य अडचण जाणवली ती वेळेची. कारण वेळ फक्त नऊच मिनिटे. त्या दृष्टीने परदेशी खेळाडूंच्या युक्त्याप्रयुक्त्याचा अभ्यास करून त्यावर नवीन तोडगा काढता आला पाहिजे. आखाड्यातील कुस्तीत दोन दोन तास घुमत राहण्याचे दिवस आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या दृष्टीने कमी होत चालले आहेत. कारण ऑलिंपिकचे सूत्रच आहे–की दर्जा दाखवा, गती द्या आणि सामर्थ्यवान बना.

---

## नाडकर्णी-देसाई, बोर्डेंची योग्य निवड

ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडला चार महिन्यांच्या दौऱ्यावर गेलेल्या भारतीय क्रिकेट संघात नाडकर्णी, देसाई आणि बोर्डे यांची निवड केल्याबद्दल निवड-समितीचे खरोखरीच अभिनंदन करावयास हवे. सोळा जणांच्या या निवडीत मात्र जयसिंहा, वेंकटराघवन् आणि रांजणे यांची निवड न झाल्याबद्दल वाईटच वाटते.

वेंकटराघवन् विशीतील तरुण. इंग्लंडच्या दौऱ्यावर सुब्रह्मण्यम् आणि सक्सेना बरोबर गेलेले. शिवाय प्रसन्न या ऑफ्-ब्रेक गोलंदाजाला साथ देणारे. हुशार आणि लायक गोलंदाज व फलंदाज. म्हणूनच भारताचे भवितव्य घडविण्यासाठी त्यांना संधी मिळणे आवश्यक होते. वसंत रांजणे यांच्या बाबतीतही अन्याय झाल्यासारखा वाटतो. कारण पुणे ते मुंबई या दोन दुलीप ट्रॉफी सामन्यांपर्यंत ते सतत १५ दिवस क्रिकेट सामने खेळत होते. त्यामुळे अंतिम सामन्यात त्यांचे पाय जडावले. क्षेत्ररक्षण नीट झाले नाही. पण त्यांचा दम, अनुभव आणि कर्तृत्व लक्षात घेता त्यांची निवड अपरिहार्य होती.

जयसिंहांना बेशिस्तीच्या बडग्याखाली वगळले, हे जर खरे असेल तर सबंध क्रिकेट कंट्रोल बोर्डाला स्वत:चे बाहुले बनविणाऱ्या पतौडींनाच या दौऱ्यातून डावलणे योग्य झाले असते. कारण हेमू अधिकारींऐवजी गुलाम अहंमद व्यवस्थापक हवेत नाहीतर आपण ऑस्ट्रेलियाला जाऊ शकत नाही असे प्रचंड नाटक त्यांनी केले. हा संघनायक की खलनायक असेच त्या वेळी वाटले. जयसिंहांनी दाखविलेला फॉर्म त्यांची निवड निश्चित करतो. पण रांजणे-जयसिंहांना कुणी वालीच उरला नाही, हेच खरे.

वेस्ट इंडिज संघ भारतात आला होता तेव्हा निवड-समिती रमाकांत देसाई यांना विसरली होती. आणि पहिल्या कसोटी सामन्यानंतर बापू नाडकर्णींची पद्धतशीर उचलबांगडी करण्यात आली. परंतु उभयतांनी सतत शारीरिक व मानसिक झीज सोसून भारतीय संघात पुन्हा आपले स्थान पक्के केले. कर्तृत्वाचा विजय झाला. चंदू बोर्डे यांच्या फलंदाजीतील आणि क्षेत्ररक्षणातील चमक मंदावली आहे. पण तरीही त्यांचे फलंदाजीचे तंत्र, अनुभव यांचा त्यांना या दौऱ्यासाठी उपयोग झाला. बोर्डे यांच्यापासून एक नव्या पिढीला पुष्कळच शिकण्यासारखे आहे. ते म्हणजे त्यांची वृत्ती आणि वागणूक. खेळाडू दहा तासच खेळत असतो. पदाधिकारी, प्रेक्षक, क्रीडा-प्रतिनिधी आणि आकाशवाणीवरील समीक्षकांना तो दूरवरून दिसतो. पण उरलेल्या अठरा तासांत त्याचे अनेक व्यक्तींशी संबंध येत असतात. त्या वेळी त्याचा स्वभाव जर तिरसट, बेछूट आणि बेफिकीर असेल तर त्याच्या खेळाविषयीचा आदर कमी होत जातो. भारतीय क्रिकेटमध्ये असे नग पुष्कळ आहेत. म्हणूनच देसाई-नाडकर्णींनी कर्तृत्वाची कास धरली आणि बोर्डे वागणुकीत पहिला क्रमांक मिळवून गेले. उदयोन्मुख खेळाडूंना निवड-समितीने हेच शिकविले नाही काय ?

○

## पुढे काय ? [पृष्ठ ७ वरून]

दोन : हे झाले फक्त सुप्याबाबत. पण आपण अधिक व्यापक विचारही केला पाहिजे. ' माणूस प्रतिष्ठान ' सुरू केले तेव्हा आपण कोणता हेतू मनाशी बाळगला होता ? आपल्याला काही शेतकरी व्हायचे नाही, विहिरींच्या कामाचे ठेकेदार व्हायचे नाही, की दानशूर व्यक्ती किंवा संस्था म्हणूनही नावलौकिक मिळवायचा नाही. १५ जुलै १९६६ च्या अंकात या प्रवासाचे प्रस्थान ठेवताना लिहिले होते...

" माणूस "ची प्रकृती विधायक, राजकीय–सांस्कृतिक आचारविचारांची आहे.

" आज अन्नस्वावलंबनाची निकड आहे. निदान ' माणूसला 'ला असे वाटते, की आज या एका प्रश्नावर तरी मतभेद नसावेत. सर्व विरोध बाजूस सारले जावेत, सरकारी प्रयत्नांना पूरक ठरतील असे धान्योत्पादन वाढीचे उपक्रम व्यक्तीव्यक्तीने, गटागटाने, पक्षोपपक्षाने आपल्या हिंमतीवर अंगावर घेऊन पूर्ण करावेत. स्वावलंबनाचे, स्वयंपूर्णतेचे देशव्यापी उद्दिष्ट साध्य होण्यासाठी अशा छोटयाछोटया, लहान सहान, स्वयंप्रेरित उपक्रमांचेही खूप साहाय्य होऊ शकेल. निदान एक वेगळी हवा निर्माण होईल. "

म्हणजे स्वावलंबनाची हवा देशात सर्वत्र निर्माण करणे हे आपले उद्दिष्ट आहे. सर्वांनाच आज हे उद्दिष्ट मान्य आहे, पण कोणीही यासाठी प्रत्यक्ष कृती करण्यास पुढे येत नाही. मग ते पक्ष उजवे की डावे असोत, राज्यकर्ते वा विरोधी असोत. अन्नप्रश्नाच्या सोडवणुकीतून या स्वावलंबनाची सुरुवात व्हावी असे आपण मानले, आणि त्या दृष्टीने शेतावर–शेतकऱ्यांकडे गेलो. प्रचलित कोंडी फोडण्यासाठी आपण हे क्षेत्र निवडले. त्यातही गेल्या वीस वर्षांत सरकारी व सहकारी यंत्रणेच्या साहाय्याने गबर बनलेला मूठभर श्रीमंत बागायतदार शेतकरी वर्ग आपण वगळला व २–४ एकरात जिराईत जमिनीवर नशीब घासणाऱ्या बहुसंख्य शेतकरी–मजूर वर्गाचा प्रतिनिधी आपण कामासाठी निवडला. याला कार्यप्रवृत्त करावे, अवश्य असणारी साधनसामग्री त्याला पुरवून अन्नोत्पादनवाढीला चालना द्यावी अशी आपली दृष्टी होती. यासाठी आपला प्रत्यक्ष संपर्क हवा म्हणून थोडा धोका, अधिक खर्च व त्रास सोसून ठेकेदाराऐवजी आपण स्वतःच काम अंगावर घेतले. यामुळे प्रथम सुप्यात, सुप्याच्या आसपास, नंतर इतरत्रही स्वावलंबनाची एक हवा निर्माण व्हावी अशी आपली अपेक्षा होती. यात मात्र आपल्याला यश लाभले नाही. ' दुसऱ्या विहिरीचे काम केव्हा सुरू करता ' असे आपल्याला प्रथम विचारले जाते याचा अर्थ काय ? वास्तविक, ' तुम्ही एवढे केले, आम्ही आता एवढे पुरे करतो, मग पुढचे ठरवू ' अशा स्वरूपाची काहीतरी भाषा हवी होती. म्हणजे आणखी हुरूप आला असता. एक अपवाद आहे आणि तो आपल्या तेथील कामामुळे घडला असे तुम्ही म्हणता हे ठीक आहे. सरकार इतकी वर्षे बांधावर लावण्यासाठी एरंडी मोफत वाटीत

होते. पण सुपे भागात कोणीही बांधावर लावण्यासाठी एरंडी सरकारकडे मागितली नव्हती. यंदा आपल्या विहिरीच्या रस्त्यावरील शेतकऱ्यांनी हा उपक्रम केला. थोडाफार रस्ताही सुधारला. पण काही झाले तरी हा अपवादच. वर्षभरातील प्रयत्नांतून यापेक्षा अधिक काहीतरी उगवायला हवे होते. आपले सातत्य कमी पडले हे तर खरेच. पण कामाच्या पद्धतीत थोडी सुधारणा करणेही अवश्य आहे असे वाटते.

ही सुधारणा अशी : एकीकडे आपले विहिरींचे ठराविक काम सुपे भागात चालू राहीलच. पण त्याचबरोबर लोकशिक्षणाचा एक स्वतंत्र व निराळा कार्यक्रमही आपल्याला हाती घेतला पाहिजे. प्रत्यक्ष विधायक कार्य व आंदोलनात्मक उठाव अशा दुहेरी कार्यपद्धतीचा अवलंब केल्याशिवाय आपली कोंडी फुटणार नाही असे वाटते. त्या दृष्टीने मी शोधाशोध व हालचाल सुरूही केली आहे. गेल्या जुलैतच मी 'सातपुडा सर्वोदय मंडळा'चे काम पाहण्यासाठी धुळे जिल्ह्यातील अक्राणी महालात गेलो होतो. सात वर्षे हा गिरिजन भाग दुष्काळाच्या छायेत वावरतो आहे—त्याची ना दाद, ना फिर्याद. 'सातपुडा सर्वोदय मंडळा'ने सरकारच्या तोडीस तोड असे काम तेथे उभे केले म्हणून आज काहीतरी जागृती तेथे दिसत आहे. पण याही जागृतीचे स्वरूप आपल्यासारखेच आढळते. लोक कोणाच्या तरी मदतीकडे सारखे डोळे लावून बसलेले. स्वत: उठायची प्रेरणाच नाहीशी झालेली. आपल्या सर्व योजनांमुळे, मदतकार्यांमुळे ही परधार्जिणेपणाची, आत्मविस्मरणाची वृत्तीच सर्वत्र वाढीस लागणार असेल, तर मला नाही वाटत हा देश स्वतंत्र, स्वावलंबी व समर्थ राष्ट्र म्हणून केव्हाही जगात मानाने उभा राहिलेला दिसेल. जनतेचे डोळे सरकारकडे आणि सरकारचे श्रीमंत परदेशांकडे ! ही जर वीस वर्षांनंतर आपल्या विकास-योजनांची फलश्रुती असेल तर इथेच थांबून आपण सर्वांनी मुळापासून विचार करण्याची वेळ आली आहे असे मला वाटते. 'उपाशी, अर्धपोटी राहू, गरीबीत आणखी काही वर्षे काढू, पण परदेशी मदत घेणार नाही' हा निग्रह लोकांनी, लोकनेत्यांनी आणि राज्यकर्त्यांनी केला आणि त्या दिशेने आहे त्या साधनसामग्रीतच देशउभारणीचे कार्य अंगीकारले तरच काही नवे तेज येथे दृष्टीस पडेल असे वाटते. सातपुड्याच्या जंगलातून, गावांतून हिंडत असता निदान मी तरी हाच विचार मांडीत होतो—"जंगलच्या राजांनो ! तुम्ही तरी भिकेची झोळी पसरू नका. स्वत:च्या पायावर उभे राहायला शिका. खरेखुरे राजे व्हा; राज्य करा."

आणि लागली की मंडळी कामाला ! हात पसरण्याऐवजी सरकारशी देवाणघेवाणीची भाषा बोलण्याएवढे धैर्य त्यांच्यापाशी कुठून आले याचे मला आश्चर्यच वाटते. १५ ऑगस्टला जवळजवळ हजार-बाराशे माणूस अक्राणी विभागाचे मुख्य तालुका ठिकाण धडगाव येथे जमला होता. ग्रामस्वराज्य परिषद भरली. तीन मुख्य ठराव झाले. १ : सरकारने जंगले पूर्वीप्रमाणे गिरिजनांच्याच मालकीची केली

तर कुठलीही मदत सरकारकडे मागू नये. २ : शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी गावा-गावाने उचलावी. ३ : या विभागावर आज शिक्षणासाठी जो सरकारी पैसा खर्च होत आहे तो रस्त्यांच्या कामासाठी सरकारने वापरावा. तीन तास या ठरावावर मोठी हमरीतुमरीची खुली चर्चा झडली. परिषदेला उपस्थित राहिलेले काही सरकारी अधिकारीही चाट पडले की अशा पावसाच्या दिवसांत, तीस–तीस मैल चालून इतके लोक जमले कसे, एवढ्या समजुतदारपणाने वागले–बोलले कसे ? सात वर्षांची ' सातपुडा सर्वोदय मंडळा 'ची व विशेषत: मंडळाचे अध्यक्ष श्री. दामोदरदासजी मुंदडा यांची तपश्चर्या, हेच या प्रश्नाचे खरे उत्तर. दुसरे काय ?

आणि आता ही मंडळी स्वस्थ राहू इच्छित नाहीत. जंगले स्वाधीन करा, शिक्षणातून दूर व्हा आणि शिक्षणाचा खर्च रस्त्यांकडे वळवा हा तीन ठरावांचा त्रिशूळ घेऊन मंडळी आता गावोगाव प्रचाराला निघू लागली आहेत. सध्या फक्त सातपुडा भागातील आदिवासी समाजातच ही हालचाल उत्पन्न झाली आहे, पण लवकरच या विचाराला व्यापक कृतीचे रूप देण्याचेही प्रयत्न सुरू आहेत. परवाच म्हणजे १० नोव्हेंबरला, धुळे येथे निवडक कार्यकर्त्यांची बैठक भरली होती. मीही होतोच. परिषदेची उद्दिष्टे, घटना, निधी पुढील कार्यक्रम यांसंबंधी बराच खल झाला. ' ग्रामस्वराज्य परिषद ' ही मुख्यत: स्वावलंबी समाजनिर्मितीची चळवळ असल्यान तिचे कार्य व कक्षा फक्त आदिवासी भागापुरतीच मर्यादित असू नये, शक्यतो लवकर इतरही ग्रामीण व नागरी भागातही तिचा प्रसार होणे अगत्याचे आहे; दुर्लक्षिलेला, मागासलेला समाज फक्त सातपुडा भागातच नाही, शहरात–खेड्यांतही तो पसरलेला आहे; एकतृतीयांश लोकसंख्येलाच स्वातंत्र्याची फळे चाखावयाला मिळाली आहेत, भारतातील जवळजवळ दोनतृतीयांश समाज हा अन्न-वस्त्र-निवारा-शिक्षणाच्या बाबतीत वंचितच आहे–मग तो शहरातला असो, खेड्यातला असो, वा डोंगरातला असो, हरिजन असो, गिरिजन असो वा पुरजन असो. या सर्वांचा संयोग होऊन काही प्रबळ उत्थापन घडून आले तरच आदिवासींचेही प्रश्न सुटतील. एरव्ही वेगवेगळ्या प्रयत्नांनी, तुकड्यातुकड्यांनी प्रश्न सुटणार नाहीत. आपल्याला सध्यातरी सरकारच्या दाराशी जायचे मुळीच कारण नाही. प्रथम हिंदुस्थानभर पसरलेल्या आपल्या भाऊबंदांना भेटू, त्यांची दुःखे ऐकू, आपली त्यांना सांगू आणि समान आशाआकांक्षांच्या बंधनांनी एकत्रित येऊन प्रगतीची पुढची पावले टाकू हा विचार उपस्थितांना बहुत मानवलेला दिसला.

धुळे बैठकीची ही माझ्या मते मुख्य फलश्रुती. आदिवासी समाज हा वेगळा समजून त्याच्या उन्नतिसाठी प्रयत्न हा दृष्टिकोन बदलून तो व्यापक समाजपुरुषाचा अवयव या दृष्टीने त्याकडे पाहिले गेले व इतर अवयवांशी त्याचा संबंध जुळून अवघ्या राष्ट्रीय उत्थानाचा येथे प्रथमच विचार झाला. धडगाव परिषदेत तीन ठराव जरी संमत केले, त्याच्या प्रचारासाठी मंडळी जरी बाहेर पडली तरी यांना आज, आत्ताचा

मुख्य भेडसावणारा प्रश्न आहे अन्नधान्याचा, दुष्काळाचा. परंतु आम्ही सात वर्षे अर्धपोटी–उपाशी आहोत, यंदाही उपासमार चालू आहे, आम्हांला अन्न हवे एवढीच या बैठकीसाठी जमलेल्या मंडळींची पूर्वीप्रमाणे मागणी नव्हती. पाच–दहा किलो धान्य या जिल्ह्यातून त्या जिल्ह्यात नेले तर गोरगरिबाला पोलिस छळतात आणि शेकडो पोती या प्रांतातून त्या प्रांतात उघडपणे, बिनबोभाट जात-येत राहतात, हे कसे ? आज काश्मिरात चाळीस पैसे किलो दराने तांदूळ मिळतो आणि आमच्या भागात तीन रुपयांचा भाव का ? केरळात माणशी सहा-सहा किलो तांदूळ आणि मुंबईच्या सर्व-सामान्य जनतेला ऐन दिवाळीतही मूठभर तांदूळ का नाही ? बिहारात एकीकडे दुष्काळाचे थैमान चालू असताना, परक्या देशांतून कोटयवधी रुपयांची मदत बिहारमध्ये ओतली जाऊन तेथील समाज अधिकच दीनवाणा, लाचार बनवून टाकला जात असताना, इकडे पंजाबमध्ये गहू गुरांना खायला घातला जात होता, ही विसंगती का ? हे सवाल बैठकीत उपस्थित झाले हे मला विशेष महत्त्वाचे वाटते. ही मंडळी त्यांना ग्रासणाऱ्या अन्नप्रश्नाचा असा व्यापक बैठकीवरून विचार करू लागली की लवकरच यांचा आजचा तुटकपणा, वेगळेपणा संपेल, इतर समदु:खी उपेक्षितांना व वंचितांनाही बरोबर घेण्याची गरज त्यांना भासू लागेल व स्वावलंबनासाठी (' ग्रामस्वराज्य ' म्हणजे तरी आजच्या संदर्भात वेगळे काय असू शकते ?) एकीकडे करावयाच्या दीर्घमुदतीच्या विधायक प्रयत्नांबरोबरच (जे प्रयत्न ही मंडळी सातपुडा सर्वोदय मंडळाच्या मार्गदर्शनाखाली गेली ५-७ वर्षे करी-तच आहेत) काही अडथळे, विसंगती दूर करण्याचे अल्पमुदतीचे आंदोलनाचे मार्गही यांना हाताळावेसे वाटतील अशी शक्यता आहे. दोन्ही अंगांनी असा उठाव होत असेल तर आपणही साथ दिली पाहिजे. कारण आपल्याला तरी वेगळे काय अभिप्रेत आहे ?

' पुढे काय ' या आपण विचारलेल्या प्रश्नाचे माझे उत्तर सध्या इतकेच. तरी बरेच सविस्तर लिहिले. कारण तुमची शंका व 'तगमग' मी समजू शकलो. धुळ्या-नंतर आता डिसेंबरात औरंगाबादला पुन्हा सर्व मंडळी एकत्रित येणार आहेत. मीही जात आहे. पुढचा मार्ग आणखी स्पष्ट झाला तर पाहूचे. आल्यावर भेटूच. तोपर्यंत दुसऱ्या विहिरीचे ठरवून ठेवण्यास हरकत नाही. कळावे.

आपला

**श्री. ग. माजगावकर.**

पटवर्धन शिक्षक आहेत. आपल्या त्यागशील सेवेबद्दल त्यांना राष्ट्रपती पदक मिळाले आहे. तथापि त्यांच्या आनंदी, समाधानी वृत्तीचे रहस्य ह्या सन्मानात नाही. ते म्हणतात, "मी सुखी आहे याचे कारण म्हणजे माझी मुले मार्गी लागली आहेत. मला दोनच अपत्ये आहेत. थोरला विजय प्राध्यापक असून धाकटी नलिनी लवकरच डॉक्टर होईल. मुले थोडीच असणे बरे.



कारण त्यामुळेच पालक त्यांना सुस्थितीप्रत नेऊ शकतात. ह्या दृष्टीने मी सुखी आहे."

## पटवर्धन सुखी आहेत —

# तसेच तुम्हीही?



67/183

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H–649

चवथी सचित्र आवृत्ति

# राजा शिवछत्रपती

ब. मो. पुरंदरे

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

पूर्वग्राहकांनी कार्यालयातून आपल्या प्रती
पावती दाखवून घेऊन जाव्यात.

परगावच्या पूर्वग्राहकांना व व्यापारी
ग्राहकांना प्रती रवाना करण्यास
सुरुवात झाली आहे.

राजहंस प्रकाशन
उंबऱ्या गणपती चौक, लक्ष्मी रोड,
४१९ नारायण पेठ, पुणे २.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ. पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.